# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०६/२००६.** **दिनांक ३.०६.२००६**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ३ जुन, २००६ रोजी दुपारी २.३० वाजता शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-७००८-२००६, दिनांक २७ मे, २००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ३ जून, २००६ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. |
| ०३. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव | ०४. | मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे |
| ०५. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | ०६. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ०७. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय | ०८. | मा.डॉ.पी.एल.तिवारी |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

मा.विश्वस्त श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय, यांचे वयाचे ४६ वर्ष पुर्ण झालेबद्दल मा.श्री.जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष, यांनी शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.

दिनांक ३०.५.२००६ रोजी सायंकाळी मा.विश्वस्त श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय, हे श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे आले असता संस्थानचे साईनिवास अतिथीगृहाचे पार्कींगमध्ये त्यांनी स्वतःचे वाहन उभे करुन श्री चे दर्शन घेऊन परत जाणेसाठी निघाले असता तेथील पोलिस कॉन्स्टेबल श्री.सय्यद यांनी त्यांना अपशब्द वापरुन त्यांना अपमानास्पद वागणूक दिली. तसेच पोलिस स्टेशनमध्ये संस्थान परिसरात कार पार्किंग केली म्हणून गुन्हा दाखल केला. याबाबत सभेने तीव्र शब्दात नापसंती व्यक्त केली. सदर प्रकरणाची शहानिशा करणेबाबत शिर्डी पोलिस स्टेशनचे पी.आय. श्री.पिंगळे यांना समक्ष चर्चेसाठी बोलविणेत आले असता त्यांनी या प्रकरणाबाबत सभेस सविस्तर माहीती दिली. सभेने श्री.पिंगळे यांना नोंदविण्यात आलेली केस मागे घेणेबाबत विनंती केली ती त्यांनी मान्य केली. याचवेळी मा.विश्वस्तांसाठी नवीन ओळखपत्र तसेच त्यांचे वाहनांसाठी स्टीकर्स तयार करणेत यावे असे ठरले.

याचवेळी मा.विश्वस्त श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी मे. महिर एजन्सीज प्रा.लि. मुंबई यांनी मा.कार्यकारी अधिकारी व सर्व मा.विश्वस्तांना दिनांक ११.०५.२००६ रोजी पाठविलेल्या पत्राकडे लक्ष वेधले. या पत्रात मे. महिर एजन्सीस, मुंबई यांचेकडे दिनांक ०५.०५.२००६ रोजी प्रकाशने विभागचे लिपिक श्री अशोक पवार हे संस्थानकरीता तयार करावयाचे मे.महिर एजन्सीस, मुंबई यांनी भरलेले डीव्हीडीचे कोटेशन समक्ष घेऊन गेले व त्यांनी मे.महिर एजन्सीस, मुंबई यांना त्यांनी दिलेल्या कोटेशन्समधील दर इतर कोटेशनधारकापेक्षा कमी दराने भरणेबाबत सांगितले. संस्थान कर्मचारी संस्थानकडे आलेले कोटेशन्स घेऊन उघडून ते संबधिताकडे जाणे गैर आहे. याची चौकशी होणे आवश्यक आहे.

याबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी श्री अशोक पवार, लिपिक यांना समक्ष विचारणा केली असता मे.महिर एजन्सीस, मुंबई यांनी मी ओळखतही नाही व मी मुंबई येथे गेलेलो नाही. तसेच डीव्हीडीचे कोटेशन्स पोस्टाने मागविण्यात आलेले आहे असे सांगितले.

याबाबत चर्चा होऊन, मे.महिर एजन्सीस, मुंबई यांना मा.कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष बोलावून झालेल्या प्रकाराची शहानिशा करावी व संबधितांना योग्य ते शासन करावे तसेच श्री अशोक संभू पवार, लिपिक, प्रकाशने विभाग यांची प्रकाशने विभागतून अन्य विभागात बदली करण्यात यावी असे ठरले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष मा.श्री प्रकाश रामदास काळे, मा.श्री समि खतिब, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी पत्राने तसेच मा.श्री.राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील, मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा.श्रीमती रिम्पल लोहिया व मा.श्री.कैलास गोविंद कोते यांनी दुरध्वनीव्दारे कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं. ०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.१५.०५.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३२७.** व्यवस्थापन समितीचे दि.१५.०५.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात घेंत असतांना निर्णय क्र.३०८ मधील दिनांक ३.५.२००६ चे उपसमितीचे इतिवृत्तातील पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर तूर्त मे.नालकर, तीसगाव तसेच गुरुकृपा सेल्स, कोपरगाव यांचेकडूनही खरेदी करण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक-खरेदी )

**विषय नं. ०२. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०५.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३२८.** व्यवस्थापन समितीचे दि.२५.०५.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१. श्रीसाईबाबा हॉस्पिटल औषधे दुकानसाठी रॅक व काऊंटर तयार करणेसाठी आलेल्या निविदांबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पीटल मधील कार्डीयक ओ.टी. व कॅथलॅबचे कन्झुमेबल साहित्य ठेवणेसाठी रॅक तयार करणे व औषध दुकानासाठी काउंटर फर्निचर तयार करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०४/२००६ रोजीचे सभेत निर्णय क्र.२९७ अन्वये निविदा मागविणे करीता मंजुरी देणेत आली होती. त्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा दि.१२/०५/२००६ पर्यंत मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे एकूण ५ सिलबंद निविदा मूदतीत प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

**अ.नं. निविदा सादरकर्त्याचे नांव**

०१ श्री आदेश नामदेव लाडवंशी, निघोज
०२ शिवशंकर फर्निचर, नाशिक
०३ सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजिंग, नाशिक
०४ उत्तम फर्निचर वर्क्स , श्रीरामपूर
०५ रोहन फर्निचर्स, नाशिक

उपरोक्तप्रमाणे आलेल्या एकूण ५ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उघडण्यात येऊन, निविदासादकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**Estimate cost :-** Rs. 3,42,862/- **E.M.D. :-** Rs. 3500**/-**

**Comparative statement of tenders.**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर (रुपये) | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर (रुपये) |
|---|---|---|---|
| ०१. | श्री आदेश नामदेव लाडवंशी, निघोज | २,९९,६४५/- | १,८५,०००/- |
| ०२. | शिवशंकर फर्निचर, नाशिक | २,७२,१९७/- | १,८४,०००/- |
| ०३. | सुदर्शन फ्लेक्झीबल पॅकेजिंग, नाशिक | ३,०६,५००/- | अनुपस्थित |
| ०४. | उत्तम फर्निचर वर्क्स , श्रीरामपूर | १,९०,०३०/- | १,९०,०३०/- |
| ०५. | रोहन फर्निचर्स, नाशिक | २,४६,२७५/- | २,४०,११८/- |

वरील अ.नं. ०२ चे निविदासादरकर्ते मे.शिवशंकर फर्निचर, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी शिफारस करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ०२. व्यवस्थापन समितीचे दि.२५.०५.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३२८.** व्यवस्थापन समितीचे दि.२५.०५.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना आकारावयाच्या दरांची निश्चिती होणेबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटल दि.१५/०५/२००६ पासून सुरु झाले असून या रुग्णालयात रुग्णांना द्यावयाच्या सेवा दरांसंबंधी अद्याप निश्चिती झालेली नाही, ती होणे आवश्यक असून, श्रीसाईबाबा हॉस्पिटल ना नफा ना तोटा या तत्वावर चालविणे असल्याने इतर व्यावसायिक रुग्णालयाच्या सेवादरांशी तुलना करणे शक्य नसले तरी खालील रुग्णालयांचे दर हे संदर्भासाठी आजचे सभेपुढे सादर केले होते.

१) निरामय हॉस्पिटल,पुणे
२) रुबी हॉस्पिटल,पुणे ३) कमल नयन बजाज हॉस्पिटल,औरंगाबाद
४) धुत हॉस्पिटल,औरंगाबाद व
५) आनंद ऋषीजी हॉस्पिटल,अहमदनगर.

सादर केलेल्या सेवा दरांचे तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करुन त्याआधारे श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना द्यावयाच्या सेवा दरांसंबंधी चर्चा होउन खालीलप्रमाणे दर निश्चिती करण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली. त्यानुसार तयार करण्यात आलेल्या दरांचा तूलनात्मक सोबत परिशिष्ट "अ" म्हणून ठेवण्यात आलेला आहे.

SCHEDULE OF CHARGES

**MEDICAL CONSULTATION**

| Services | Proposed | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| First Consultation. | 50 | 50 |
| Follow up for 15 Days | 30 | 20 |
| Super Spl. | 100 | 100 |
| Follow up for 15 Days | 75 | 50 |
| Patient Visit Charges | 20-100 | 20-100 |
| Ref. Charges | | 30 |
| Casualty Charges | 10 | 10 |
| MLC Charges (If admited) | 100 | 100 |

**BED CHARGES**

| Services | Proposed | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| GW | 10 | 50 |
| Semi PVT | 150 | 100 |
| PVT Non AC | 300 | 250 |
| PVT AC | 500 | 400 |
| Delux | 750 | 750 |
| ICU | 1000 | 800 |
| + If Ventilator | | 800 |
| NICU | 600 | 500 |
| Casualty 4Hrs | | |

WARD PROCEDURES

| Services | Proposed | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| Dressings Minor -Major | Minor-Major 10-80 | Minor-Major 10-80 |
| CLW Suturings | 50 Per stich | 50 Per stich |
| Plaster Cast ( Below & Above Knee) | 100 | 100 |
| Plaster Cast ( Below & Above Elbow) | 100 | 100 |
| Plaster Slabs ( Below & Above Knee) | 100 | 100 |
| Plaster Slabs ( Below & Above Elbow) | 100 | 100 |
| Intubation | 150 | 100 |
| Subclavian / Jugular / Femoral Insertion | 500 | 300 |
| VS | 100 | 100 |
| Pericardial tap | 550 | 300 |
| Pleural Tap | 100 | 100 |
| Ascitic Tap | 100 | 100 |
| ICD | 600 | 400 |
| Bone Marrow | 300 | 250 |
| Liver Biopsy | 600 | 400 |
| Renal Biopsy | 600 | 500 |
| Skin Biopsy | 100 | 100 |
| Oxygn 24 Hrs. | 300 | 200 |
| Lumbar Puncture | 100 | 100 |
| IV Injection | 15 | 15 |
| IM Injection | 5 | 5 |
| Ventilator for 12 Hrs. | 900 | 800 |
| Infusion Pump per Day | 150 | 150 |
| Multi Para Monitor 12 Hrs. | 150 | 150 ( ICU चार्जेस सोडून) |
| CPR | 500 | 500 |
| Holter Monitor | 1000 | 1000 |
| Defibrillator | 300 | 300 |

**ENDOSCOPY**

| Services | Proposed | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| Gastroscopy | 600 | 600 |
| Bronchoscopy | 600 | 600 |

| | | |
|---|---|---|
| Laparoscopic Procedures & Operations to be Categorised by the Operating Surgeons from Cat.I to Cat.X | | |

**SURGICAL OPERATIVE CHARGES**

| Category | PROPOSED | | | Sanctioned by Sub Committee | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Semi Pvt. | Pvt. | Delux | Semi Pvt. | Pvt. | Delux |
| I | 800 | 1000 | 1200 | 800 | 1000 | 1200 |
| II | 2100 | 2300 | 2800 | 2100 | 2300 | 2800 |
| III | 3500 | 4000 | 4200 | 3500 | 4000 | 4200 |
| IV | 4500 | 5500 | 6000 | 4500 | 5500 | 6000 |
| V | 7000 | 7800 | 8800 | 7000 | 7800 | 8800 |
| VI | 8500 | 9500 | 11000 | 8500 | 9500 | 11000 |
| VII | 12000 | 13000 | 14500 | 12000 | 13000 | 14500 |
| VIII | 12500 | 13800 | 16000 | 12500 | 13800 | 16000 |
| IX | 17000 | 18000 | 20000 | 17000 | 18000 | 20000 |
| X | 22000 | 25000 | 28000 | 22000 | 25000 | 28000 |

**CATH LAB & CARDIO-VASCULAR SURGERY**

| Services | Proposed. | | Sanctioned by Sub Committee | |
|---|---|---|---|---|
| CATH LAB | Sansthan | Doctors Charges | Sansthan | Doctors Charges |
| Coronary Angiography | 6000 | 1000 | 6000 | 1000 |
| Coronary Angioplasty | 50000-75000 | 8000 | 50000-75000 | 8000 |
| Renal & Peripheral Angiogr. | 6000 | 1000 | 7500 | 750 |
| Renal & Peripheral Angioplasty | 50000 | 8000 | 50000 | 8000 |
| BMV | 25000 | 7500 | 25000 | 7500 |
| Permanant Pacemaker Charges | 125000-200000 | 2000 | 125000-200000 | 2000 |
| Temporary Pacing | 4000 | 500 | 4000 | 500 |
| CVTS | | | | |
| CABG | 80000 | 8000 | 60000 | 8000 |
| Single Valve Replacement | 100000 | 12000 | 100000 | 12000 |
| Double Valve Replacement | 150000 | 18000 | 150000 | 18000 |
| ASD/ VSD, / TOF | 110000 | 12000 | 100000 | 12000 |
| BTshunt | 25000 | 2500 | 25000 | 2500 |
| PDA Ligation | 25000 | 5000 | 25000 | 5000 |

Note ;- 1. Anaesthist's share -30% of the Surgeon's Charges
2. Assistant Surgeon 10% of the Surgeon's Charges

**DIALYSIS**

| Services | Proposed | Sanctioned |
|---|---|---|
| Dialysis | 800 | 500 |

**X-RAY**

| Services | Proposed | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| **Plain X-Ray** | 100-250 | 100-250 |
| IVP | 600 | 1000 |
| Ba. Swallow | 1000 | 800 |
| Ba. Follow Through | 1000 | 1000 |
| Ba. Enema | 1000 | 1000 |
| MCU | 800 | 600 |
| HSG | 600 | 600 |
| Myelogram | 800 | 800 |

**ULTRA SONOGRAPHY**

| Services | Proposed | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| Abdomen + Pelvis | 500 | 350 |
| Obstetrics | 300 | 250 |
| Urology | 300 | 250 |

| | | |
|---|---|---|
| Scrotum | 300 | 250 |
| Neck + Thyroid | 500 | 450 |
| Thorax | 400 | 350 |
| Single Organ | 300 | 250 |
| Obsterics With Cong. Abn. | 500 | 350 |

**COLOUR DOPPLER**

| Services | Suggested | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| Peripheral Single Limb. | 1200 | 1000 |
| Two Limb | 1800 | 1500 |
| Abdomen | 1000 | 1000 |
| Renal | 800 | 800 |
| Carotid | 800 | 800 |
| Scrotum | 600 | 600 |
| Small Parts | 600 | 600 |

**CT SCAN**

| Items | Suggested | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| Plain Head | 1200 | 1200 |
| Plain With Contrast Head | 1400 | 1400 |
| PC Adomen / Pelvis/PNS | 1800 | 1800 |
| PC Chest | 1800 | 1800 |
| HRCT Thorax | 2600 | 2600 |
| CT Extremities | 2200 | 2200 |
| CT Spine | 2500 | 2500 |
| CT Myelo | 3000 | 3000 |
| CT Orbit | 1400 | 1400 |
| CT Angiography | 6000 | 6000 |

**2D ECHO - PFT - TMT - ECG**

| Services | Proposed | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| **2 D ECHO** | 600 | 600 |
| **PFT** | 400 | 400 |
| Stress Test ( TMT) | 800 | 800 |
| ECG | 50 | 50 |

Note;- 2 D ECHO & Stress Test - Cardiologist's Share 40% of Charges levied

**PATHOLOGY**

| Services | Proposed | Sanctioned by Sub Committee |
|---|---|---|
| CBC | 50 | 50 |
| ESR | 20 | 20 |
| Blood Sugar | 40 | 40 |
| Glycosylated Hb | 300 | 300 |
| **LFT** | | |
| S.Bilirubin | 100 | 100 |
| SGOT | 110 | 110 |
| SGPT | 110 | 110 |
| S.Proteins | 80 | 80 |
| LDH | 130 | 130 |
| CPK | 120 | 120 |
| **RFT** | | |
| B.Urea | 70 | 70 |
| S. Creatinine | 80 | 80 |
| S. Electrolytes | 250 | 250 |
| S. Phosphorus | 70 | 70 |
| **Lipid profile** | | |
| S. Cholestrol | 100 | 100 |
| HDL, LDL, VLDL | 500 | 500 |
| S.Triglycerids. | 110 | 110 |
| Urine Protines 24 Hrs. | | |
| S. Ammonia | | |

| | | |
|---|---|---|
| S. Amylase | 150 | 150 |
| S. Alk. Phosphatase | 120 | 120 |
| S. uric Acid | 120 | 120 |
| S. acid Phospatse | 140 | 140 |
| Urine-Routine | 40 | 40 |
| Sputun AFB | 65 | 65 |
| Stool Routine | 20 | 20 |
| Stool Hanging Drop | 20 | 20 |
| Stool Occult Blood | 30 | 30 |
| Malarial Parasite | 60 | 60 |
| Sickle Test | 60 | 60 |
| Hb. Electro pharesis | 400 | 400 |
| G6PD | 150 | 150 |
| ASO Titre | 150 | 150 |
| HBV | 140 | 140 |
| HCV | 400 | 400 |
| HIV | 250 | 250 |
| HIV Western Blot | 1400 | 1400 |
| CRP | 110 | 110 |
| Direct Coombs<br>Indirect Coombs | 180 | 180 |
| Widal Test | 60 | 60 |
| VDRL | 60 | 60 |
| UPT | 120 | 120 |
| RA Factor | 100 | 100 |
| ANA | 700 | 700 |
| LECells | 80 | 80 |
| T3, T4, TSH | 600 | 600 |
| M.T. | 60 | 60 |
| CSF | 150 | 150 |
| Ascitic Fluid | 150 | 150 |
| Pleural Fluid | 150 | 150 |
| Bronchial Fluid | 150 | 150 |
| Semen Analysis | 120 | 120 |
| BL. Gases | 300 | 300 |
| IgG<br>IgA<br>IgM | 700 | 700 |
| CPK | 150 | 150 |
| CPK MB | 300 | 300 |
| Digoxin Level | 400 | 400 |
| TORCH | 2500 | 2500 |
| Dengue Test | 700 | 700 |
| BT, CT, PT, PTT. | 180 | 180 |
| S. Fibrinogin | 300 | 300 |
| Trop- T | 700 | 700 |

चर्चेदरम्यान खालीलप्रमाणे शिफारसी करण्यात आल्या होत्या, त्या मान्य करण्यात आल्या-

- प्रत्येक आयसीयु बेडला स्वतंत्र मॉनिटर उपलब्ध करावा.
- इमर्जन्सीचे वेळी तातडीचे प्राथमिक उपचार करावेत. पेशंटला पैसे भरणे शक्य नसल्यास सरकारी रुग्णालयाकडे पाठवावे.
- दारिद्र्य रेषेखालील कार्डधारकांना बीलात सवलत द्यावी.
- ऑपरेशन फी मध्ये सर्जन व संस्थानला खालीलप्रमाणे हिस्सा द्यावा.

| अ.नं. | तपशील | सर्जन | संस्थान |
|---|---|---|---|
| ०१. | रुपये १ लाखापर्यंत | ६० % | ४० % |
| ०२. | रुपये २ लाखापर्यंत | ७० % | ३० % |
| ०३. | रुपये ३ लाखापर्यंत | ८० % | २० % |

- सर्जिकल ऑपरेटीव्ह चार्जेस पॅकेजमध्ये ३० % रुग्णालय आकार गृहीत धरलेला आहे. सदर आकाराच्या ५०% हिस्सा सर्जनला देण्यात यावा. तसेच भूलतज्ज्ञ यांना नफ्याच्या १५% हिस्सा त्यांच्या वेतनानंतरच्या रकमेवर द्यावा.

- कार्डीॲक सर्जरीमध्ये पेशंटने एक स्टेट आणल्यास एकूण पॅकेज चार्जेसपैकी रुपये २५ हजार कमी आकारण्यात येतील. त्यापेक्षा जास्त गरज लागल्यास त्याप्रमाणात आकारणी होईल.
- चॅरिटी बाबत शासकीय नियमावलीनुसार संस्थान नियमावली ठरविण्यात यावी.
- सर्जनने स्वतःच्या मदतीला डॉक्टर आणल्यास त्याला स्वतः चार्जेस द्यावेत.
- शिर्डी, कोपरगाव, नाशिक इ. ठिकाणी केबल टी.व्ही. वर श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोग उपचाराबाबत डॉ.सोनवणे, नाशिक व डॉ.साबळे, श्रीसाईनाथ रुग्णालय यांची जाहिरात येत आहे. त्यांनी याबाबत संस्थानची परवानगी घेतलेली नाही. तरी सदर जाहीराती तातडीने बंद कराव्यात. संबंधितांकडून याबाबत लेखी खुलासा मागवावा.

सदर चर्चेचेवेळी मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी वरीलप्रमाणे प्रस्तावित दर पुन्हा तपासून त्यामध्ये काही सुधारणा कराव्या लागतील असे सुचविले त्यास मान्यता देण्यात आली. अंतिम दर निश्चित होईपर्यन्त वरीलप्रमाणे दर आकारणी करावी असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय/कामगार अधिकारी)

**०३. तातडीच्या डॉक्टर्स व तंत्रज्ञ नियुक्तीबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे दि.१५/०५/२००६ रोजी उदघाटन झालेले असून येथील काही विभागही सुरु करणेत आलेले आहेत. त्याकरिता कामकाज सुलभ होणेचे दृष्टीने खालीलप्रमाणे स्टाफची अत्यंत आवश्यकता भासत आहे. तरी सदरची उणीव दूर करणेकामी खाली दर्शविलेल्या पदांमधून यापूर्वी मुलाखत घेउन निवड केलेल्या योग्य उमेदवारांना तातडीने नेमणूक आदेश देणेस व उर्वरित पदांकरिता पुनश्च वर्तमानपत्रात जाहिरात देउन सदर पदे भरण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**Full Time -Posts to be filled on urgent basis**

| No. | Name of the Posts | Qualifications | No.of Posts |
|---|---|---|---|
| 01 | Cardiologists | MD, DM | 02 |
| 02 | Intensivist | MD, (Anae. Chest) with Experience | 03 |
| 03 | General Surgery | MS (GS) Laparoscopes Trained | 02 |
| 04 | Physicians | MD (Med.) | 02 |
| 05 | Anesthetist | MD (Anae) | 10 |
| 06 | Pediatrician | MD (Paed) | 02 |
| 07 | Urologist | MS, M.Ch. (Urology) | 02 |
| 08 | Nephrologists | MD, DM, (Nephro) | 02 |
| 09 | Neurologist | MD, DM (Neurology) | 02 |

यावर चर्चा होऊन श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या उपरोक्त पदांकरिता टाईम्स ऑफ इंडिया, टाईम्स इ.वर्तमानपत्रात पुनश्च जाहिरात देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/आस्थापना)

**०४. श्रीसाईबाबा हॉस्टिलमध्ये प्रसादालयामार्फत जेवण पुरविणेबाबत.**

दि.१५/०५/२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलचे उदघाटन झाले असून हॉस्पिटलमधील काही विभागही कार्यान्वित करण्यात आले आहेत. हॉस्पिटलमध्ये परिसरातील व बाहेरगावाहून येउन अनेक रुग्ण स्वतःची तपासणी करुन डॉक्टरांच्या सल्ल्याने हॉस्पिटलमध्ये दाखल होत आहेत. हॉस्पिटलमध्ये दाखल झालेल्या पेशंटकरिता जेवण व चहाची व्यवस्था नाही. त्यामुळे रुग्णांची व नातेवाईकांची अत्यंत गैरसोय होत आहे.

श्रीसाईनाथ हॅस्पिटलमध्ये दाखल झालेल्या रुग्णांना संस्थानतर्फे प्रसादालय विभागामार्फत दोन वेळेचे जेवण व कॅन्टीन विभागामार्फत चहा विना मोबदला पुरविणेत येत आहे. अशीच व्यवस्था श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील ज्या रुग्णास विशिष्ट डाएट आवश्यक नाही अशा रुग्णांना दोन वेळेचे जेवण प्रसादालयामार्फत व दोन वेळेचा चहा कॅन्टीन विभागामार्फत मोफत पुरविणेस मान्यता देणेची शिफारस करण्यात आली ती मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक /अधिक्षक,प्रसादालय/कॅन्टीन विभाग प्रमुख)

**०५. साईबाबा रुग्णालय प्रयोगशाळेसाठी मायक्रोस्कोप खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागात दैनंदिन वापरासाठी एक मायक्रोस्कोप मिळणेबाबत दि. १९/०५/२००६ डि.पी. अन्वये तातडीने मागणी केलेली आहे.

सदरचे मायक्रोस्कोपचे खरेदीकामी खालील अधिकृत विक्रेते यांना फॅक्सवरून कोटेशन पाठवणेबाबत सांगण्यात आले होते.

०१. मे. संजय सायंटिफीक कं., मुंबई

०२. मे. निधी लाईफकेअर, ठाणे

०३. मे. युनीक केमीकल्स, नाशिक

वरील अधिकृत विक्रेते यांनी फॅक्सवर कोटेशन पाठवले असून त्यांच्या तुलनात्मक दरांचा तक्ता खालीलप्रमाणे-

Laboratory Microscope-

| Make | Sanjay Scientific Co.Mumbai | | Nidhi Life Care, Thane | | **Unique Chem, Nashik** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Rate | Model | Rate | Model | Rate | Model |
| Olympus | 39938 OR | CHI-120 | 25875 - OR | MLX B | 41512.5 OR | CH-201 |
| Olympus | 26,213 | MLX B | **39,262.50** | **CH 20-I** | 1,04,287.50 | CX-21 |

सदरचे तत्क्यात पॅथोलॉजिस्ट डॉ. न्यायाधीश यांनी मे. निधी लाईफकेअर, ठाणे यांचेकडील *CH२०-I* या मॉडेलचा मायक्रोस्कोप घेण्याबाबतची शिफारस केली आहे.
त्यानुसार *CH२०-I* या मॉडेलचा मायक्रोस्कोप खरेदीस व याकामी येणारे रु.३९,२६२.५० चे खर्चास मान्यता देणेची शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**०६. पोर्टेबल फ्लश स्टरिलायझर खरेदीबाबत.**

श्रीसाईबाबा रुग्णालयात ऑपरेशन थिएटर विभागात अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लास्टी आणि बायपास शस्त्रक्रिया कार्यान्वीत झालेल्या आहेत.

सदर शस्त्रक्रिया करण्यासाठी वापरात येणारे सर्जीकल मटेरियल हे शस्त्रक्रियेपुर्वी स्टरलाईज करावे लागते. सदर स्टरलायजेशन तातडीने करण्यासाठी ऑपरेशन थिएटर विभागाने दि.१३.०५.२००६ च्या डी.पी. नं.८९०७ अन्वये प्लॅश अॅटोक्लेव्ह मशिनची मागणी केलेली आहे.

सदर मशिनची दैनंदिन शस्त्रक्रिया करण्यापुर्वी सर्जीकल मटेरियल स्टरलायजेशनसाठी आवश्यकता असल्यामुळे याकामी मे.एम.शहा अॅण्ड कंपनी,पुणे यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांचे कोटेशन पाठविले आहे. त्याचे कोटेशन क्र.SMS/AB/QTN/००५ दि.०९.०५.२००६ अन्वये एका मशिनची किंमत रु.८४,४००/- (सर्व करांसह) इतकी कळवली आहे.

तरी एक मशिन मे.एम.शहा अॅण्ड कंपनी,पुणे यांचेकडून तातडीने ०१ मशिन खरेदी करण्यास व रु.८४४००/- चे खर्चास व खरेदीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी एकाच स्टँडर्ड कंपनीच्या मशिनसाठी निविदा मागविण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**०७. हॉस्पिटल जनरल साहित्य मान्य दराने खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयात सर्व वॉर्ड, ऑपरेशन थिएटर, डॉक्टरांच्या कॅबीन इत्यादीसाठी बी.पी. अॅप्रटस, टेथोस्कोप, किडणी ट्रे, स्टेनलेस स्टील ट्रे इत्यादी साहित्याची मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/०४/२००५ निर्णय क्र. ४७७ अन्वये मे. वॉर्डन सर्जिकल, मुंबई यांना इकडील पत्र क्र. १०६३७ दि. २७/०९/२००५ अन्वये रु. १,१३,६४६.६६ इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

मे. वॉर्डन सर्जिकल, मुंबई यांनी आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. परंतु सदर आदेशातील साहित्य कमी पडल्याने त्यातील आणखी काही साहित्य खरेदी करावी लागणार आहे. सदरचे खरेदीकामी मंजुर दराने रु. ६१५११.६६ इतका खर्च येणार आहे.

तरी मे. वॉर्डन सर्जिकल, मुंबई यांचेकडून कमी पडत असलेले आवश्यक साहित्य मंजुर दराने खरेदीस व रु.६१,५११.६६ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी फेरनिविदा मागवुन कमी पडत असलेले आवश्यक साहित्य खरेदी करण्यात यावे , अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**०८.श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे विविध भागात बसवावयाचे पडद्यांचे खरेदीकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल सुरु झाले असून या हॉस्पीटलसाठी आवश्यक ते कापड सेंच्युरी मिल्स लि. मुंबई यांचेकडून खरेदी करणेचे ठरले होते मात्र सेंच्युरी मिल्स लि. मुंबई यांचेकडे कापड नसलेने सदर कापड खरेदीकामी कोटेशन्स मागविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर |
| ०२. | मे.मंगल क्लॉथ स्टोअर्स, नाशिक |
| ०३. | मे.मनिषा टेक्सटाईल्स,नाशिक |
| ०४. | मे.साई गादी भांडार, मेनरोड नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**०९. स्टेशनरी छपाईबाबत**

श्रीसाईबाबा हॉस्पिटल सुरु झालेमुळे दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणारे रजिष्टर्स व इतर महत्वाच्या पुस्तकांचे छपाई करणे तसेच इतर आवश्यक स्टेशनरी (भांडारमध्ये उपलब्ध नसणारी) खरेदी करणे इ. अत्यंत आवश्यक झाले आहे.

सदर कामी तातडीची गरज म्हणून अंदाजे सहा महिने पुरेल अशा स्टेशनरीचे स्थानिक छपाईदारांकडून समक्ष जाउन कोटेशन्स मागवून छपाई करून घेणेस व याकामी लागणा-या अंदाजे रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) रकमेपर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१०. श्रीसाईबाबा हॉस्पिटलसाठी नॅपकिन खरेदीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल सुरु झाले असून हॉस्पिटलसाठी लिनन खरेदी झालेली आहे. लिनन खरेदीमध्ये नॅपकीन १०० नग मागविले होते. मात्र इकडील सर्व वॉर्ड व ऑपरेशन थिएटरसाठी १०० नॅपकीन अपुरे पडत आहेत.

लिनन खरेदी सेंच्युरी टेक्सटाईल्स मिल्स, मुंबई यांचेकडून केलेली होती व त्या खरेदीमध्येच नॅपकीनही खरेदी केले होते. त्यावेळी रु.२७.१७ प्रती नगाप्रमाणे १०० नग नॅपकीन खरेदी केले होते. सेंच्युरी मिल्स पूर्वीचेच मान्य दरामध्ये आणखी २०० नॅपकीन देणेस तयार आहे.

तरी सेंच्युरी टेक्सटाईल मिल्स,मुंबई यांचेकडून आणखी २०० नग नॅपकीन पूर्वीचेच मान्य रु.२७.१७ प्रती नग दराने खरेदीस व याकामी येणारे रक्कम रु.५,४३४/- (अक्षरी रुपये पाच हजार चारशे चौतीस मात्र) चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली.

तसेच याचवेळी, संस्थानचे इतर विभागातही नॅपकिन वापरण्यात येतात. तरी सर्व मागणी एकत्र करुन लहान मोठ्या साईजच्या संस्थानसाठी आवश्यक असणाऱ्या नॅपकिन थेट टेक्सटाईल मिल्स कडून कोटेशन्स मागवुन खरेदी करण्यात यावेत. तसेच या नॅपकिनवर संस्थानचे नांवाची छपाई करुन घेण्यात यावी.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय/अधिक्षक,खरेदी विभाग)

**११. श्रीसाईबाबा रुग्णालयातील डेंटल ओ.पी.डी.साठी मशिनरी,साहित्य,हत्यारे इ.खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयात डेंटल ओ.पी.डी. विभाग कार्यान्वीत करण्यात आलेला असून या विभागासाठी नियुक्त करण्यात आलेले डेंटल सर्जन डॉ.लिना पाटील व डॉ.व्ही.व्ही.विखे यांनी मशिनरी/उपकरणे / हत्यारे, इत्यादीची यादी दिलेली आहे. त्यांनी दिलेल्या मशिनरी/ उपकरणे , हत्यारे इत्यादी साहित्य, हत्यारे इ. साठी स्टॅंडर्ड कंपनी ठरवून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रु.११,२१,०००/- खर्चास मान्यता देण्याची शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१२. मा.वैद्यकीय संचालक यांचेकरिता लॅपटॉपबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पिटल दि.१५/०५/२००६ पासून सुरु झालेले आहे. आय.टी.विभागामार्फत हॉस्पिटलचे विविध विभागात संगणक बसविण्याचे काम सुरु झाले असून त्याचे नेटवर्कींग करण्याचे काम चालु आहे. मात्र संगणकांमार्फत संपूर्ण हॉस्पिटलचे काम सुरळीत होणेकामी आवश्यक ते सॉफ्टवेअर अद्याप आय.टी. विभागामार्फत बसविण्यात आलेले नाही.

दि.०३/०५/२००६ पासून मेडीकल डायरेक्टर या पदावर डॉ.श्री.के.एन.टिंगरे (न्युरो सर्जन) हे रुजु झाले आहेत. त्यांना इतर हॉस्पिटलमध्ये जाउन वैद्यकीय तंत्रज्ञानातील अद्ययावत माहिती गोळा करणे, मा.व्यवस्थापन समितीच्या व इतर वेळोवेळी आयोजित होणा-या सभेंना उपस्थित राहणे, नवनवीन माहिती गोळा करुन संग्रहित करणे, छोटया-मोठया मिटींगमध्ये स्लाईड्स दाखविणे, हॉस्पिटलचा डाटा प्रदर्शित करणे,व इतर महत्त्वाचे प्रसंगी आपले माहितीची देवाणघेवाण करणे, कार्यालयीन वेळेत अपूर्ण राहिलेले कामकाज आपल्या निवासस्थानी करता यावे इत्यादी करिता आय.बी.एम. कंपनीचे अद्ययावत (P४) किंवा त्यापेक्षा वरील आवृत्तीचे एक लॅपटॉप मशिन (संपूर्ण संचासह) आय.टी. विभागाकडून शक्य तितक्या लवकर खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७५,०००/-चे खर्चास मान्यता देणेची शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**१३. तीन चाकी सायकल खरेदीबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.८७ नुसार संस्थानमार्फत अहमदनगर जिल्हयातील अपंगांना ३००० नग तिन चाकी सायकली देणेकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी व त्यासाठीची नियमावली तयार करण्यात यावी असे ठरलेले आहे. त्यानुसार प्रशासन शाखेस दि.२२.०४.२००६ चे प्रस्तावाने सध्या १००० सायकली टप्प्याटप्याने खरेदी करणेस व त्याकामी रु.३५ लाख मात्रचे खर्चास मंजूरी मिळालेली आहे.

त्यानुसार दि.११-१३.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.१५.०५.२००६ ते दि.२४.०५.२००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.२५.०५.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली आहे. दरम्यानचे काळात दि.१५.०५.२००६ रोजी संस्थानचे सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख यांचे हस्ते होणार असल्याने काही सायकली तातडीने खरेदी करणेत येऊन त्याच दिवशी सायकलीचे वाटप करणेत यावे असे ठरले. परिणामी वेळ कमी असल्याने पुणे येथील सायकली पुरवठादारांशी संपर्क साधून २५ नग सायकलीसाठी दरपत्रके पाठविण्यास सांगणेत आलेले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या दरपत्रकांतील दरांचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **दर प्रती नग** | **डिलेव्हरी** |
|---|---|---|---|
| ०१. | हरबन्स सायकल इंडस्ट्रीज, शिरुर, पुणे | रु.३५००/- | पुणे किंवा वहातुक भाडे |
| ०२. | हरबन्स सायकल ट्रेडींग कं, पुणे | रु.३८००/- | पुणे |
| ०३. | गणेश सायकल मार्ट, पुणे | रु.३९००/- | अधिक वहातुक भाडे |
| ०४. | हरबन्स सेल्स कार्पोरेशन, पुणे | रु.३६४०/- | पुणे |

उपरोक्त दरांमधील मे.हरबन्स सायकल इंडस्ट्रीज, शिरुर यांचे दर रु.३५००/-न्युनतम असल्याने त्यांना जा.क्र.६२४९ दि.१३.०५.२००६ अन्वये २५ नग सायकलीसाठी पुरवठा आदेश देणेत आलेला असून त्यांनी मागणीप्रमाणे सायकलीचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. तसेच दि.१५.०५.२००६ रोजी मा.मुख्यमंत्र्याचे हस्ते सायकलीचे वाटपही झालेले आहे. सदरील २५ नग सायकली रु.३५००/- प्र.नग दराने खरेदीकामी रु.८७,५००/-खर्च आलेला आहे.

तरी तिन चाकी सायकली-२५ नग खरेदी करणेस आलेल्या रक्कम रु.८७,५००/-चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा वशी-०३)

**१४. संस्थान कर्मचारी गणवेष कापड खरेदी निविदा उघडणे.**

संस्थानमधील कायम कर्मचा-यांसाठी (स्त्री व पुरुष) गणवेषाचे कापड, साडया इ.खरेदी तसेच शिलाई विहीत पद्धतीने करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१३,१६,४५०/-चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ निर्णय क्र.१६३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०५-०८.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.०८.०५.२००६ ते दि.१८.०५. २००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१९.०५.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली होती. सदरील निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची मागणी करणेत आलेली आहे. तसेच स्वतंत्र कापडी पिशवीत नमुन्यांची मागणी केलेली आहे. दोन्ही लिफाफे सभेत उघडणेत येवून संबंधितांना पुढील सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत येईल. दरम्यानचे काळात निविदाधारकांच्या कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. मागणीनुसार बयाणा रक्कम व कागदपत्रे नसल्यास त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करण्यात येणार नाही. प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव व गांव** |
|---|---|
| ०१ | एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिकरोड |
| ०२ | राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०३ | किसान वस्त्र भांडार, सटाणा |
| ०४ | बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे |
| ०५ | बिर्ला युनिफॉर्म्स, औरंगाबाद |
| ०६ | सुपारीबाग एम.एस.जी संघ लि.,मुंबई |
| ०७ | मोता वुलन हाऊस, बारामती |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपूढे समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा, अशी शिफारस करण्यात आली होती, ती मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाख, वशी-०५)

**१५. लोखंडी बॅरिकेटस् करिता जी.आय.पाईप, एम.एस. अँगल, शिट व पेंट..खरेदी निविदा उघडणे..**

श्रीसाईबाबांच्या दर्शनाच्या वेळी वाहतुकीचे नियमन करण्याकरीता पोलीस स्टेशन, शिरडी यांना २०० लोखंडी बॅरीकेटस तयार करुन देणेकामी आवश्यक असणारे जी.आय.पाईप, एम.एस.हार्डवेअर साहित्य, ऑईलपेंट खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.७,०३,६००/-चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.१२.२००४ निर्णय क्र.१६३ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली होती. त्यानुसार मागविणेत आलेल्या निविदांवर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ मध्ये निर्णय होऊन संबंधितांना न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत आलेले होते. मात्र मे.एशियन सेल्स, नाशिक यांनी साहित्य पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्याने त्यांचेकडील साहित्यासाठी फेरनिविदा मागणी करावी असे मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ मध्ये निर्णय झालेला आहे.

त्यानुसार दि.०५-०८.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.०८.०५.२००६ ते दि.१८.०५. २००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१९.०५.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली होती. सदरील निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची मागणी करणेत आलेले दोन्ही लिफाफे सभेत उघडणेत येवून संबंधितांना पुढील सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत येईल. दरम्यानचे काळात निविदाधारकांच्या कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. मागणीनुसार बयाणा रक्कम व कागदपत्रे नसल्यास त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करण्यात येणार नाही. प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव व गांव** |
|---|---|
| ०१ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०२ | क्विक सप्लायर्स, नाशिक |
| ०३ | प्राईम एंटरप्राईजेस, संगमनेर |
| ०४ | शाह ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर |
| ०५ | टयुब्स एन टुब्स, जळगांव |
| ०६ | सुपारीबाग एम.एस.जी संघ लि.,मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**१६. पाणी पुरवठा विभाग..नविन स्टाफ क्वार्टरला पाणी पुरवठा करणेकामी जी.आय.पाईप व इतर साहित्य खरेदी निविदा उघडणे**

संस्थानचे निमगांव को-हाळे शिवारामध्ये खरेदी केलेल्या सर्व्हे नंबर १६९ मध्ये स्टॉफ क्वार्टरचे निवासाकरीता पाईपलाईन टाकणेत येणार आहे. सदरील पाईपलाईनसाठी आवश्यक असणारा जी.आय.पाईप व इतर साहित्य खरेदीस व त्याकामी येणारे रु.८,५२,९५८/-चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.३३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०५-०८.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.०८.०५.२००६ ते दि.१८.०५. २००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१९.०५.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली होती. सदरील निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची मागणी करणेत आलेले दोन्ही लिफाफे सभेत उघडणेत येवून संबंधितांना पुढील सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत येईल. दरम्यानचे काळात निविदाधारकांच्या कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. मागणीनुसार बयाणा रक्कम व कागदपत्रे नसल्यास त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करण्यात येणार नाही. प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव व गांव** |
|---|---|
| ०१ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक |
| ०२ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०३ | क्विक सप्लायर्स, नाशिक |
| ०४ | प्राईम एन्टरप्राईजेस, संगमनेर |
| ०५ | नितीन एंटरप्राईजेस, नाशिक |
| ०६ | शाह ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर |
| ०७. | सयाजी सेल्स कार्पोरेशन, कोपरगांव |
| ०८. | टयुब्स एन टयुब्स, जळगांव |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपूढे समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा, अशी शिफारस करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**१७. गुरुपौर्णिमा उत्सव-२००६ निमत्रंण पत्रिका छपाई कोटेशन्स उघडणेबाबत.**

गुरुपौर्णिमा उत्सव-२००६, मध्ये अजिव व आश्रयदाते सभासदांना देणेकामी १,१५,०००/- व सन्माननीय पाहुण्यांना देणेकरिता २,०००/- अशा एकूण १,१७,०००/- निमत्रंण पत्रिका छपाईकामी स्थानिक प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील प्रेसधारकांनी कोटेशन्स सादर केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | मे.स्वामी समर्थ ऑफसेट, साकुरी-राहाता |
| ०२ | मे.कमल प्रिन्टीग प्रेस, राहाता |
| ०३ | मे.शिवशक्ती ऑफसेट प्रिन्टर्स, राहाता. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेपूढे समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव व गांव | देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | मे.स्वामी समर्थ ऑफसेट, साकुरी-राहाता | ७३,५८०/- |
| ०२ | मे.कमल प्रिन्टीग प्रेस, राहाता | ९५,२५०/- |
| ०३ | मे.शिवशक्ती ऑफसेट प्रिन्टर्स, राहाता. | १,११,५००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०१ प्रेसधारक मे.स्वामी समर्थ ऑफसेट, साकुरी-राहाता यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी शिफारस करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाख, वशी-०५)

**१८. श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२००६ कार्यक्रम ठरविणेबाबत.**

श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२००६ मध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रम निश्चित करण्यात आले.

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| ०१. | श्रीमती पुनम खन्ना, नवी दिल्ली यांचे "साईभजन" कार्यक्रम |
| ०२. | सौ.गितांजली अरोरा, पुणे यांचा " सुगम संगीत" कार्यक्रम |
| ०३. | श्रीमती रागेश्वरी लाईव्ह यांचा "गायन" कार्यक्रम |
| ०४. | ह.भ.प.प्रा.डॉ. माधवराव दीक्षित, पूणे, यांचा " किर्तन" कार्यक्रम |

उपरोक्त कार्यक्रमाच्या तारखा नंतर निश्चित करण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासन शाख, वशी-०५)

**विषय नं.०३. दिनांक ४.०३.२००६ व १.०४.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.३२९.** दिनांक ४.०३.२००६ व १.०४.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता मार्च-एप्रिल, २००६.**

**(ब) माहे मार्च-एप्रिल, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.३३०.** (A) )माहे मार्च व एप्रिल, २००६ मधील जमा-खर्चाचे तक्ते, माहे मार्च व एप्रिल, २००६ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाचे तक्ते माहे २२ मे,२००६ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. रुग्णालयातील रुग्णांना माहे एप्रिल- २००६ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.३३०. (B).** माहे एप्रिल,२००६ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३. माहे एप्रिल,२००६ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.३३०. (C).**माहे एप्रिल, २००६मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.३३०. (D)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता ज्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र.३३०. (E).** माहे मे, २००६ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५. साईनाथ छाया या इमारतीत युनियन बँक ऑफ इंडिया,शाखा राहाता यांचे करार नुतनीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.३३१.** संस्थानचे स्थानिक राष्ट्रीयकृत बॅकेमार्फत होणारे दैनंदिन आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात आहेत. युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा राहाता यांचेकडे संस्थानचे बचत खाते असून त्यांचेकडून संस्थानला विविध बँक सेवा पुरविण्यात येतात. उदा. दैनंदिन रोख रक्कम संस्थान कार्यालयातून घेऊन जाणे, वटणावळ न आकारता चेक/डी.डी. ची रक्कम संस्थान खाती लगेचच जमा करणे, कोणतेही कमिशन न आकारता डी.डी.देणे, दक्षिणापेटी मोजणीसाठी बँक अधिकारी/कर्मचारी पाठविणे, दक्षिणापेटीतून मिळणारी रोख रक्कम /नाणी स्विकारणे आदि. युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा राहाता यांनी खास संस्थानचे सुविधेच्यादृष्टीने शिर्डी येथे संस्थानच्या 'साईनाथ छाया' इमारतीमध्ये संपूर्ण संगणकीय विस्तारित कक्ष सुरु करत आहे. युनियन बँक ऑफ इंडियाच्या विस्तारीत कक्षासाठी मा. व्यवस्थापन समितीने दिनांक २७ डिसेंबर २००४ च्या सभेतील निर्णय क्र. १७२ नुसार 'साईनाथ छाया' इमारतीमधील तळमजल्यावरील ३६४.४६ स्क्वे. फुट जागा भाड्याने देण्यास मान्यता दिली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) कायदा २००४ कलम १७(३) प्रमाणे कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षापेक्षा जास्त काळासाठी भाड्याने देता येणार नाही. या कायद्यातील कलमास अनुसरुन व मा. व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयानुसार युनियन बँक ऑफ इंडिया यांना 'साईनाथ छाया' इमारतीमधील तळमजल्यावरील ३६४.४६ स्क्वेअर फुट जागा एक वर्षासाठी रुपये ७,५००/- प्रतिमहा भाड्याने देण्याचा करार १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६ या कालावधीसाठी करण्यात आला आहे.

उपरोक्त मुदतीसाठी करण्यात आलेल्या कराराचा एक वर्षाचा कालावधी ३१ मार्च २००६ रोजी संपलेला आहे. बँकेने दिनांक २४.०४.२००६ च्या पत्रान्वये सदर जागेच्या करारनाम्याचे पुढील एक वर्षासाठी नुतनीकरण करण्यात यावे, अशी विनंती केली आहे. युनियन बँक ऑफ इंडिया संस्थानला देत असलेल्या सेवांचा विचार करता, बँकेला 'साईनाथ छाया' इमारतीमधील तळमजल्यावरील ३६४.४६ स्क्वेअर फुट जागा पुर्वीप्रमाणेच रुपये ७,५००/- प्रतिमहा भाडे आकारुन पुढील एक वर्षासाठी भाडेतत्वावर देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०६. सन २००५-०६ साठी वैधानिक लेखापरिक्षकाची निवड करुन शासनास कळविणेबाबत.**

**निर्णय क्र.३३२.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम -२००४ मधील कलम नं.१७(२) (ग) आणि कलम नं.२९(१)(२) अन्वये संस्थानच्या लेखापरिक्षणाचा अहवाल महाराष्ट्र शासनास व मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना दिनांक ३० जून २००६ पूर्वी सादर करणे बंधनकारक असल्याने जा.नं.एसएसएस-वशी-लेखा-१३०४१/२००५ दिनांक ११ नोव्हेंबर,२००५ अन्वये सन २००५-२००६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखपरिक्षकाच्या नेमणूकीबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात आला होता.

त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासन पत्र क्र.सासवि२००५/७२९/प्रक्र.१२८/का.सोळा विधी व न्या विभाग मंत्रालय मुंबई ४ मे,२००६ अन्वये महाराष्ट्र शासनाने पत्र पाठविलेले असून ते दिनांक ५ मे २००६ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदरील पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणाबाबत वृत्तपत्रात सर्व अटी व शर्तीसह तात्काळ जाहिरात देण्यात येऊन येणाऱ्या अर्जातून योग्य त्या लेखापरिक्षकाची निवड कारणमिमांसेसह करुन त्यांच्या नियुक्तीबाबतचा प्रस्ताव तपशिलासहित शासन मान्यतेकरीता पाठविण्यात यावा असे कळविलेले आहे.

त्या अनुषंगाने दिनांक ४ मे २००६ चे पत्रातील सूचनेनुसार दिनांक १२ मे २००६ रोजी दैनिक सार्वमत व दैनिक गावकरी, नाशिक दिनांक १३ मे २००६ रोजी, दैनिक इंडियन एक्सप्रेस व दिनांक १५ मे,२००६ रोजीच्या दैनिक महाराष्ट्र टाईम्स अशा एकूण चार वृत्तपत्रामधून जाहिरात प्रसिध्द करण्यात

आली होती. सदरील जाहिरातीनुसार वैधानिक लेखापरिक्षकांनी करावयाच्या अर्जाची मुदत दिनांक १९ मे,२००६ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन एकूण २३ संस्थांचे अर्ज मूदतीत प्राप्त झाले असून मुदतीनंतर आणखी ६ संस्थांचे असे खालीलप्रमाणे एकूण २९ अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| ०१. | मे.अभिषेक ए.शहा,पुणे |
| ०२ | मे.सहस्त्रबुध्दे बापट ॲण्ड कंपनी, मुंबई |
| ०३ | मे.सबद्रा ॲण्ड सबद्रा, नाशिक |
| ०४ | मे.अनमोल असोसिएटस् नाशिक |
| ०५ | मे.खंडेलवाल गांधी ॲण्ड असोसिएटस्, पुणे |
| ०६ | मे.एल.सी. बेरी ॲण्ड कंपनी, कलकत्ता |
| ०७ | मे.व्ही.ए.दुधेडिया ॲण्ड कंपनी, पुणे |
| ०८ | मे.संजय डी.नावंदर,अहमदनगर |
| ०९ | मे.आर.एन.खैरनार ॲण्ड कंपनी,जळगांव |
| १० | मे.अभ्यंकर ॲण्ड कंपनी, सांगली |
| ११ | मे.एस.एल.कुलकर्णी ॲण्ड कपंनी,कोपरगांव |
| १२ | मे.एफ एच. मुनोल ॲण्ड कंपनी,पुणे |
| १३ | मे.ए.के.चिंधडे ॲण्ड कंपनी,नाशिक |
| १४ | मे.एम.आर टिळे ॲण्ड कंपनी, मालेगांव जि.नाशिक |
| १५ | मे.बी.एस.डांगले ॲण्ड कंपनी,पुणे |
| १६ | मे.खुराणा राजीव ॲण्ड असोसिएटस्, मुंबई |
| १७ | मे.के.बी.कासलीवाल,नाशिक |
| १८ | मे.बी.जी.टाक ॲण्ड कंपनी, संगमनेर |
| १९ | मे.शरद एस.गायकवाड ॲण्ड कंपनी, मुंबई |
| २० | मे.ए.आय.कोठारी ॲण्ड असोसिएटस, जळगांव |
| २१ | मे.एस.आर बाटलीबॉय ॲण्ड असोसिएटस, मुंबई |
| २२ | मे.संजय जाजू,नांदेड |
| २३ | मे.पाटील हिरण जाजू ॲण्ड कंपनी,नाशिक |
| २४ | मे.एम.पी.चितळे ॲण्ड कंपनी,पुणे- (उशिरा प्राप्त झालेले) |
| २५ | मे.ए.टी. उपाध्ये ॲण्ड कंपनी, पनवेल जि.रायगड - (उशिरा प्राप्त झालेले) |
| २६ | मे.तुषार पगार ॲण्ड कंपनी,नाशिक - (उशिरा प्राप्त झालेले) |
| २७ | मे.बी.डी.खैरनार ॲण्ड कंपनी,नाशिक - (उशिरा प्राप्त झालेले) |
| २८ | मे.खर्डे -सदावर्ते ॲण्ड कंपनी,पुणे - (उशिरा प्राप्त झालेले) |
| २९ | मे.एन.एस.हापसे ॲण्ड कंपनी,पुणे - (उशिरा प्राप्त झालेले) |

सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्त लवकरात लवकर होऊन, लेखापरिक्षणाचा अहवाल राज्य शासनास मुदतीत सादर करणे गरजेचे असल्याने उपरोक्तपैकी पात्र अशा एका संस्थेची मानधन तसेच कारणमिमांसेसह नियुक्त होणेस आणि त्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास सादर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

त्यानुसार उपरोक्त यादीतील अ.नं.१९ मे.शरद एस. गायकवाड ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौटंटस्, मुंबई यांचे नाव निश्चित करण्यात आले व तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करावा, असें ठरलें. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०७. स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे ATM करार नुतनीकरणबाबत.**

**निर्णय क्र.३३३.** संस्थानला दक्षिणा पेटीशिवाय देणगीदार भक्तांकडून देणगी काऊंटरवर रोख स्वरुपात जमा होणाऱ्या, तसेच टपालाद्वारे प्राप्त होणारे चेक्स, डी.डी., मनिऑर्डर्स, पोस्टल ऑर्डर्स आदी माध्यमांद्वारे, देणग्या प्राप्त होत आहेत. हे देणगीदार भक्त देशाच्या विविध राज्यातील असून त्याशिवाय परदेशस्थ (विशेषतः अनिवासी भारतीय एन.आर.आय.) भक्तांचाही त्यामध्ये सहभाग आहे. या सर्व माध्यमांद्वारे मिळणाऱ्या देणग्यांमध्ये मोठी वाढ होत असून, विशेषतः परकीय चलनाचे स्वरुपात मिळणाऱ्या देणग्यांमधील वाढ लक्षणीय आहे.

मात्र टपालाद्वारे प्राप्त होणाऱ्या देणग्या जमा करण्याच्या सध्याच्या कार्यपध्दतीअंतर्गत देणगीदाराने देणगी पाठविल्यानंतर ती रक्कम संस्थानखाती जमा होऊन त्याची पावती देणगीदाराला मिळेपर्यंत बराचसा कालावधी लागतो. काही वेळेस, देणगीचा चेक/डी.डी./मनिऑर्डर गहाळ होणे, विहित मुदतीत संस्थानखाती जमा न होणे, देणगीची पावती गहाळ होणे, भक्तांनी व्यक्त केलेल्या इच्छेशिवाय दुसऱ्याच उद्देशासाठी देणगीची रक्कम जमा होणे अशाप्रकारच्या त्रुटी उदभवतात. या त्रुटींमुळे देणगीदार भक्तांची नाहक नाराजी उद्‌भवते. या कार्यपध्दतीमुळे बहुतांशी परदेशस्थ व काही

उच्चशिक्षित भारतीय साईभक्त देणगीदारांनी वेळोवेळी अशा सूचना केल्या आहेत की, संस्थानने इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर पद्धतीने देणगी स्वीकारावी, जेणे करुन वरील बहुतांशी त्रुटी कमी होतील.

भक्तांच्या आलेल्या सूचनेप्रमाणे व भक्तांना ऑन लाईन देणगी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक २७ डिसेंबर २००४ च्या बैठकीतील निर्णय क्र. १३९ नुसार श्री साईभक्तांना ऑन लाईन देणगी सुविधा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ATM वर सुरु करण्यास व त्यांना मंदिर परिसरामध्ये ATM साठी ८६.३८ स्क्वेअर फुट जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयानुसार बँकेस मंदिर परिसरामध्ये ATM साठी जागा देण्यात येऊन प्रतिमहा भाडे रुपये ५,०००/- आकारण्यात आले आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) कायदा २००४ कलम १७(३) प्रमाणे कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षापेक्षा जास्त काळासाठी भाड्याने देता येणार नाही. सदर कलमानुसार स्टेट बँक ऑफ इंडियाशी दिनांक १ जून २००५ ते ३१ मे २००६ अशा एक वर्षाच्या कालावधीसाठी जागा भाडे करार करण्यात आला आहे. यास महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्र. सासविं-२००५/४०८/(६५)का.सोळा दिनांक १८ मे २००६ अन्वये बँकेस जागा भाड्याने देणेस मान्यता मिळाली आहे. या कराराची मुदत ३१ मे २००६ रोजी संपत असल्याने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या श्रीरामपूर शाखेच्या उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये त्यांनी पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ करण्याची विनंती केली आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया त्यांच्या देशभरातील ५००० पेक्षा जास्त असलेल्या ATM नेटवर्कव्दारे श्री साईभक्तांना ऑन लाईन देणगी देण्याची सुविधा पुरवत आहे. या सुविधांना श्री साईभक्तांकडून दिवसेंदिवस चांगला प्रतिसादही मिळत आहे. बँक संस्थानला ही सेवा पूर्णपणे मोफत पुरवित आहे. त्यांच्या या सेवांचा विचार करता व श्री साईभक्तांना ऑन लाईन देणगी देण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने बॅकेस पुढील एक वर्षासाठी मंदिर परिसरात त्यांच्या ATM साठी सध्या आकारत असलेल्या मासिक भाडे रुपये ५,०००/- प्रमाणे पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देणे आवश्यक वाटते. या संदर्भात बँकेशी पुढील एक वर्षासाठी करावयाच्या करारनाम्याची कार्यवाही संस्थानच्या विधी अधिकारी यांचेकडून करण्यात येईल.

उपरोक्तप्रमाणे स्टेट बॅक ऑफ इंडियाच्या ATM साठी मंदिर परिसरामध्ये पुढील एक वर्षासाठी जागा भाड्याने देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/विधी अधिकारी)

**विषय नं.०८.** **शिर्डी सर्व्हे क्र.१२५/६, १२५/७ व १२५/८ मधील श्री.लोढा यांचेकडून खरेदी केलेल्या जागेत रुग्णालय इमारतीचे बांधकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३४.** **०१.** श्री साईनाथ रुग्णलयाचे जुन्या इमारतीचे नुतनीकरण करण्यात आले असून सदर ठिकाणी काही नविन वाढीव इमारतींचे बांधकाम करण्यात आले आहे. या संकुलामध्ये दि.१५.०५.२००६ पासून श्री साईबाबा (सुपर स्पेशालिटी) हॉस्पीटल सुरु करण्यात आले आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालय हे सध्या धर्मशाळा इमारतींमध्ये कार्यरत आहे.

**०२.** श्री साईबाबा हॉस्पीटल या नविन रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी, अधिकारी व इतर पॅरामेडीकल कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधणेबाबत दि. ०२.१०.२००५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६१२ अन्वये रुग्णालय जवळील मोकळया जागेची पहाणी करुन बांधकाम विभागाने सादर केलेल्या एकूण क्षेत्रफळ २४५३५० चौ. फुट बांधकामासाठी जमीन खर्च वगळता रु. १३.६८ कोटी मात्र अपेक्षित खर्चाचे प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.

**०३.** संस्थान तर्फे अलीकडेच स.नं.१२५ (आरक्षण क्र.३४) मधील श्री. लोढा यांचे क्षेत्र खरेदी करण्यात आलेले आहे. शिर्डी विकास योजनेनुसार आरक्षण क्र.३४ खालील क्षेत्र हे रुग्णालय विस्तारीकरणासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. शिर्डी विकास योजना अहवालानुसार सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र ६ हेक्टर इतके आहे. त्यापैकी ५ हे.४८.७३ आर. इतके क्षेत्र संस्थान मालकीचे असून उर्वरित ५१.२७ आर. क्षेत्र भुसंपादन करण्याची कार्यवाही चालू आहे. आरक्षणाखालील संस्थान मालकीचे क्षेत्रापैकी सुमारे १ हे. ६७.७३ आर इतक्या क्षेत्रामध्ये सध्याचे नविन ए व बी टाईप स्टाफ क्वार्टस् व जनरेटर रुम ही बांधकामे आहेत. तसेच साईनगर मैदानाचा काही भाग आहे.

**०४** आरक्षण क्र.३४ मधील संस्थान मालकीचे ३ हे. ८१ आर क्षेत्र व भुसंपादन कार्यवाही चालू असलेले ५१.२७ आर क्षेत्र हे दोन्ही मिळून एकूण ४ हे. ३२.२७ आर क्षेत्राचा सलग भुखंड हॉस्पीटल बांधकामासाठी उपलब्ध होईल. सदर जागेवर श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी नविन इमारतीचे बांधकाम करता येईल.

**०५.**साईनगर परिसरासाठी यापूर्वीचे मंजूर रेखांकनानुसार साईनगर मैदानाचे क्षेत्रापैकी ओपन स्पेस दर्शविलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त उर्वरित सुमारे ७० आर क्षेत्राचा भुखंड बांधकामासाठी उपलब्ध आहे. सदर ठिकाणी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील तातडीची वैद्यकिय सेवा देणाऱ्या वैद्यकिय अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधता येतील.

**०६.** रुग्णालयातील उर्वरित वर्ग-३ व वर्ग- ४ च्या कर्मचाऱ्यांसाठी निमगाव- कोऱ्हाळे शिवारातील गट नं. १७२ मधील जागेत सध्या संस्थानच्या वर्ग- ४ च्या कर्मचाऱ्यांसाठी बांधकाम सुरु असलेल्या इमारतीच्या जवळील जागेत निवासस्थाने बांधता येतील. याच ठिकाणी नर्सेस प्रशिक्षण केंद्र व त्यांचे वस्तीगृहाचे बांधकाम करता येईल.

**०७.** दि. ०५.११.२००५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ७३० अन्वये सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलसाठी नविन इमारतीचे बांधकाम करणे या कामासाठी आर्किटेक्ट म्हणून सेवा पुरविण्याकरिता श्री.डी. ओ. निकम, पुणे यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वैद्यकिय अधिकारी व हॉस्पीटल कर्मचारी निवासस्थानाचे बांधकामासाठी संस्थान पॅनलवरील अथवा इतर नामांकित आर्किटेक्टची नेमणूक होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याबाबत झालेल्या चर्चेत मा.विश्वस्त डॉ.तिवारी यांनी सदर प्रकल्पासाठी श्री.डी.ओ.निकम पुणे, यांचे ऐवजी नामांकित आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांची नेमणूक करण्यात यावी असे सांगितले, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०९.** **सिंकदराबाद (आंध्र प्रदेश) येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३५.** कार्यकारी विश्वस्त, एस.राधास्वामी फौडेंशन, सिंकदराबाद यांनी त्यांचे दिनांक १४ एप्रिल,२००६ रोजीचे पत्रानुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव दिला आहे :

श्री साईंचे दर्शनासाठी ४५ टक्क्यापेक्षा जास्त भक्त आंध्रप्रदेशातून येतात. आंध्रप्रदेशातील या साईभक्तांसाठी एक मध्यवर्ती माहिती केंद्र असणे आवश्यक आहे. सिंकदराबाद शहरातील, अंदाजे १९० चौरस फुट जागा त्यांनी फौडेंशनच्या कार्यालयासाठी घेतलेली आहे. ही जागा सिंकदराबाद शहराच्या मध्यवर्ती भागात असून, या जागेपासून १ किमी अंतरावर सिंकदराबाद रेल्वे स्टेशन, ५०० मीटर अंतरावर एपीएसआरटीसीचे ज्युबिली बस स्टॅण्ड, २ किमी अंतरावर विमानतळ व ०१ किमी अंतरावर आंध्रप्रदेश पर्यटन विभागाचे यात्रीनिवास व कार्यालय आहे. याच ठिकाणाहून शिर्डीकडे जाणाऱ्या बसेसचे आरक्षण होऊन, तेथूनच शिर्डीकडे रवाना होतात.

साईभक्तांच्या सेवा-सुविधेसाठी, उपरोक्त १९० चौरस फुट जागा मध्यवर्ती माहिती केंद्रासाठी आजीवन विनामोबदला भाडेपट्टयाने देणेस तयार आहोत. मात्र ही जागा फक्त माहिती केंद्रासाठी वापरता येईल, त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी अगर व्यक्तीस ही जागा वापरता येणार नाही. याबाबत आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबी पूर्ण करण्यास तयार आहोत.

उपरोक्तप्रमाणे एस.राधास्वामी फौडेंशन, सिंकदराबाद यांनी १९० चौरस फुट जागा आजीवन विनामोबदला भाडेपट्टयाने देणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार ही जागा मध्यतवर्ती माहिती केंद्रासाठी घेणेस काही हरकत नाही. याकामी मा.व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता मिळालेस, एस.राधास्वामी फौडेंशन, सिंकदराबाद यांचेशी पुढील कायदेशीर बाबी संस्थान वकिलांचे मार्गदर्शन घेऊन पूर्ण करता येतील, तसेच तांदुळ खरेदीसाठी आंध्रप्रदेश येथे मा.व्यवस्थापन समीती सदस्य जाणार आहेत त्यावेळी सदर जागेची पहणी करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याबाबत समिती सदस्य मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी सांगितले की, तांदूळ खरेदीसाठी दिनांक २९.५.२००६ रोजी हैद्राबाद येथे दिलेल्या भेटीत मी व समिती सदस्य मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी सदर सिकंदराबाद येथील जागा व हैद्राबाद येथील श्री.श्रीराम नायडू व्ही.के. व श्री.श्रीनिवास यादव यांचेकडील इमारतीमधील जागेची पहाणी केली. पैकी श्री.नायडू यांची जागा योग्य आहे असे सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा होऊन, श्री.नायडू यांचे बांधकाम असलेली जागा विकत घेण्याच्या दृष्टीने आवश्यक माहितीसह प्रस्ताव घेण्यात येऊन यथावकाश मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करावा.

तसेच सिकंदराबाद येथील देणगी मिळणारे जागेबाबत योग्य ती कायदेशीर पुर्तता करुन जागा ताब्यात घेणेबाबत कार्यवाही करणेत यावी,असें ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१०.** **दिल्ली येथे संस्थानचे माहिती केंद्र सुरु करणेसाठी महाराष्ट्र परिचय केंद्र इमारतीमध्ये अंतर्गत नुतनीकरण व उदवाहन बसविणे कामासाठी आलेल्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र.३३६.** नवी दिल्ली येथिल महाराष्ट्र परिचय केंद्राचे गणेश रामदासी यांनी दि. २७/०२/२००६ रोजीचे पत्रान्वये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या मार्गदर्शनानुसार आपले विश्वस्त व्यवस्थेकडे माहिती केंद्राची जागा तात्पुरत्या स्वरुपात ५ वर्षासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. करीता आवश्यक कामे तातडीने हाती घेण्यास हरकत नाही असे कळविले आहे.

सदरची जागा तात्पुरत्या स्वरुपात संस्थानकडे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधिल कलम २१(२) अन्वये संस्थान निधीतून काम हाती घेणेसाठी मान्यता मिळणेकामी न्याय व विधी विभागाकडे प्रस्ताव सादर

करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४/०३/२००६ चे सभेत निर्णय क्र. १७१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रस्ताव मा. प्रधान सचिव प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, मंत्रालय , मुंबई यांना जा.क्र. एसएसएसटी/वशी-बांध/३४६२/०६ दि. ११/०३/२००६ रोजी मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवी दिल्ली यांनी सदर केंद्राचे सुशोभिकरण व इतर कामाकरीता रुपये २९,७२,८३५.०० खर्चाचे एस्टिमेटनुसार सविस्तर प्लॅन व टेंडर फॉर्म तयार करुन, आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे यांनी संस्थान मार्फत सिलबंद निविदा मागविण्यात यावेत असे मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०१/०४/२००६ निर्णय क्र. २५८ अन्वये ठरले आहे.

त्यानुसार मा. अध्यक्ष यांनी आर्किटेक्ट काप्रे यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा करुन नवी दिल्ली येथील स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणे बाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे यांनी निविदा तयार करुन निविदा सूचना दिल्ली येथील वृत्तपत्रात प्रसिध्द केली आहे. कोरे निविदा फॉर्म विक्री मूदत दि.२३/०५/२००६ ते दि. ३०/०५/२००६ अशी आहे व सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. ०१/०६/२००६ अशी आहे.

विहित मुदतीत खालीलप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे मा. व्यवस्थापन समितीपुढे समक्ष उघडण्यात आल्या.

**अ) माहिती केंद्र अंतर्गत नुतनीकरण करणे-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१. | मे.अबरेस्ट कंन्स्क्ट्रक्शन, दिल्ली |
| ०२. | मे.संजय कुमार भाटीया, दिल्ली |
| ०३ | मे.अल्ट्रा टेक कंन्स्क्ट्रक्शन, दिल्ली |
| ०४ | मे.शालीमार इन्टेरिअर, नवी दिल्ली |
| ०५ | मे.जेनिसेस सिस्टिम, दिल्ली |

**ब) लिफ्ट बसविणे-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१. | मे.अपेक्स इलेव्हेटर्स, नवी दिल्ली |
| ०२. | मे.कोन इलेव्हेटर्स, नोयडा |
| ०३ | मे.ओमेगा इलेव्हेटर्स,अहमदाबाद |
| ०४ | मे.ऐशिया लिफ्ट, नवी दिल्ली |
| ०५ | मे.जॉन्सन लिफ्ट प्रा.लि.,नवी दिल्ली |

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त निविदासादरकर्त्यांशी मा.विश्वस्त श्री.शैलेश श्रीहरी कुटे व मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुदंर पाण्डेय यांनी दिल्ली येथे जाऊन, समक्ष चर्चा/वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.११.** **जि.प.शाळा इमारत बांधकाम ठेकेदार मे.एन.बी.औताडे, पोहेगांव यांचे मूदतवाढ मागणीबाबत.**

**निर्णय क्र.३३७.** शिर्डी येथील सर्व्हे क्र. ०६ (आ.क्र.०८) मधील जि.प. शाळा इमारतीचे बांधकाम ठेकेदार मे. एन.बी. औताडे, पोहेगांव यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर काम हे पूर्णत्वाचे मार्गावर असून सुमारे ८०% काम पूर्ण झालेले आहे. निविदा शर्तीनुसार सदर काम पूर्ण करण्यासाठी ०९ महिने इतकी मूदत देण्यात आली आहे. सदर मूदत दिनांक १९/०१/२००६ रोजी संपुष्टात आलेली आहे. तथापी सदर मूदतीत ठेकेदार यांनी बांधकाम पूर्ण केलेले नाही.

ठेकेदार मे. एन.बी.औताडे यांनी दिनांक २९/०३/२००६ चे पत्राव्दारे सदर काम पूर्ण करण्यासाठी दिनांक ३०/०५/२००६ पर्यंत मूदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. त्यासाठी त्यांनी खालील कारणे नमूद केली आहेत.

०१) सदरहू कामावर स्थानीक रहिवाशांची रस्त्याची अडचण असल्यामुळे खोदाई काम दि. १८/०५/२००६ रोजी चालू झाले.

०२) तसेच सदर खोदाई काम चालू झाल्यानंतर माहे जून, जुलै व ऑगस्ट -२००५ मध्ये पाउस असल्याने व साईटवर जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्यामुळे बांधकाम मटेरीअल वाहतूक करण्यास विलंब होत गेला.

०३) सदर इमारतीचे जागेमधून MSEB ची विद्युतवाहीनी गेलेली होती. सदर विद्युतवाहीनीमुळे तळमजल्याचे स्लॅबचे कामास अडथळा आला.

ठेकेदार यांचे वरील विनंती बाबत सदर कामाचे आर्किटेक्ट श्री. चंद्रकांत कदम,नाशिक यांनी दिनांक २७/०४/२००६ चे पत्रान्वये असा अभिप्राय दिलेला आहे की, साईटवरील एम.एस.ई.बी. ची विद्युत वाहिनी हलविण्यासाठी जेवढा कालावधी लागलेला आहे, तेवढ्या कालावधीची मूदतवाढ ठेकेदार यांना देण्यास हरकत नाही. तथापी सदर मूदतवाढीमुळे कुठल्याही अटी व शर्तीचा भंग होणार नाही तसेच त्यामुळे कुठलीही भाववाढ देय होणार नाही असे आर्किटेक्ट यांनी वरील पत्रात नमूद केले आहे.

आता ठेकेदार यांनी दि. ३०/०५/२००६ चे पत्राव्दारे दि.३०/०७/२००६ अखेर मूदतवाढ मागणी केली आहे. तथापी दिनांक ३०/०७/२००६ अखेरपर्यंत काम पूर्ण होणे आवश्यक आहे. वरील बाबींचा विचार करता ठेकेदार यांना दि.३०/०७/२००६ पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,जिल्हा परिषद शाळा इमारत बांधकाम ठेकेदार मे.एन.बी.औताडे, पोहेगाव यांना मुख्य इमारत बांधकामासाठी दिनांक ३०.६.२००६ व टॉयलेट ब्लॉक, मुख्याध्यापक निवासस्थान, कम्पाऊंड भिंत बांधणेसाठी दिनांक ३१.७.२००६ पर्यात मुदतवाढ देण्यात यावी. यावी, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१२. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मध्यवर्ती संगणक प्रशिक्षण विभागासाठी इंटेरिअर व फर्निचरचे कामासाठी आलेल्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र.३३८.** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्राशासनाच्या सी.टी. एस स्कीम अंतर्गत सूरु असलेल्या नउ व्यवसायांच्या १८ तुकड्यांमधील ३०० विद्यार्थाना समाजशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रम समाविष्ट करुन तो आनिवार्य केला असल्याचे प्राचार्य औद्योगीक प्रशिक्षण संस्था यांनी कळविले आहे. याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि. ५-११-२००५ निर्णय क्र. ६८२ अन्वये निर्णय झालेला आहे. त्यानुसार मध्यवर्ती संगणक लॅब अद्यावत करणेकामी अंदाजे रुपये ३,२०,०००.०० चे खर्चास मा. व्यवस्थापन समितीने मान्यता दिली आहे.

याकामी आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून डिटेल प्लॅन व एस्टीमेट व कोरे निविदा फॉर्म तयार करुन घेणेत आले आहे. याकामी वर्तमान पत्रात जाहीरात देउन निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा विक्री दि.२५/०५/२००६ ते ३१/०५/२००६ अशी आहे. सिलबंद निविदा दि. ०१/०६/ २००६ पर्यंत सादर करावायाच्या होत्या. या मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | मे.जेठाराम एम.सुतार, नाशिक रोड |
| ०२. | मे.श्रीसाई प्लायवूड ॲण्ड मटेरियल मालेगाव, नाशिक |
| ०३. | मे.मगर जायभाये असोसिएटस, नाशिक |
| ०४. | मे.निक्की फर्निचर ॲण्ड फॅब्रिकेटर्स, श्रीरामपूर |
| ०५. | मे.सुदर्शन फ्लेग्झीबल पॅक प्रा.लि.,नाशिक |
| ०६. | मे.शिवशंकर फर्निचर्स, नाशिक |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेंत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.जेठाराम एम.सुतार, नाशिक रोड | ८,४२,५३७.७० | ७,५८,२८३.३० |
| ०२. | मे.श्रीसाई प्लायवूड ॲण्ड मटेरियल मालेगाव, नाशिक | ५,०५,८८४.०० | ४,७०,४७२.१२ |
| ०३. | मे.मगर जायभाये असोसिएटस, नाशिक | ६,८३,३४४.०५ | ६,३५,५०९.९२ |
| ०४. | मे.निक्की फर्निचर ॲण्ड फॅब्रिकेटर्स, श्रीरामपूर | ९,६१,१२५.०० | ४,०६,९०८.०० |
| ०५. | मे.सुदर्शन फ्लेग्झीबल पॅक प्रा.लि.,नाशिक | ६,१९,८२८.०० | अनुपस्थित |
| ०६. | मे.शिवशंकर फर्निचर्स, नाशिक | ३,०२,७७०.००<br>(७ %डिस्काऊंटसह ) | ३,००,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,अ.नं.०६ चे निविदासादरकर्ते मे.शिवशंकर फर्निचर्स,नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१३. संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालय व प्राथमिक शाळा नियोजित इमारतीसाठी जागा निश्‍चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३९.** श्री साईबाबा कन्या विद्यामंदीर शिर्डी, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी तसेच नव्याने सुरु करावयाच्या श्री साईबाबा प्राथमीक शाळा आणि वसतीगृह यांचेसाठी भविष्यातील विस्तार गृहीत धरुन शैक्षणीक प्रकल्पासाठी नविन इमारत आवश्यक असल्याचे प्राचार्या श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी दि. २०/१०/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे.

सदर इमारतीमध्ये खालीलप्रमाणे खोल्यांची आवश्यकता असल्याचे त्यांनी कळविले आहे.

**अ) प्राथमीक शाळा इमारत :- (इयत्ता १ ली ते ४ थी )**

| **अ.नं.** | **तपशिल** | **वर्ग संख्या** |
|---|---|---|
| ०१. | क्लास रुम | २० |
| ०२. | विज्ञान प्रयोगशाळा | ०१ |
| ०३. | कार्यालय | ०१ |
| ०४. | स्टाफ रुम | ०२ |
| ०५. | टॉयलेट ब्लॉक | ०४ |
| ०६. | प्राचार्य कॅबीन | ०१ |
| ०७. | संगणक प्रयोगशाळा | ०१ |

| | | |
|---|---|---|
| ०८. | अतिथी कक्ष | ०१ |
| ०९. | परिक्षा विभाग | ०२ |
| | एकूण- | ३३ |

**ब) कनिष्ठ महाविद्यालय इमारत :- (कला ,विज्ञान,वाणिज्य शाखा इयत्ता ११,१२ वी )**

| अ.नं. | तपशिल | वर्ग संख्या |
|---|---|---|
| ०१. | क्लास रुम | २० |
| ०२. | विज्ञान प्रयोगशाळा | ०३ |
| ०३. | कार्यालय | ०१ |
| ०४. | स्टाफ रुम | ०२ |
| ०५. | टॉयलेट ब्लॉक | ०४ |
| ०६. | प्राचार्य कॅबीन | ०१ |
| ०७. | संगणक प्रयोगशाळा | ०१ |
| ०८. | सभागृह | ०१ |
| ०९. | अतिथी कक्ष | ०१ |
| १०. | कॅन्टीन | ०१ |
| ११. | परिक्षा विभाग | ०२ |
| १२. | लेडीज कॉमन रुम | ०१ |
| १३. | वाचनालय | ०१ |
| १४. | ग्रंथालय | ०१ |
| | एकुण- | ४० |

**क) कनिष्ठ महाविद्यालयासाठी वसतीगृह इमारत :-**

| अ.नं. | तपशिल | वर्ग संख्या |
|---|---|---|
| ०१. | मुलांचे वसतीगृह | ३० |
| ०२. | मुलींचे वसतीगृह | ३० |
| ०३. | डायनिक हॉल व किचन | ०१ |
| ०४. | जिमनॅशियम हॉल | ०१ |
| ०५. | स्टोअर रुम | ०१ |
| ०६. | प्रार्चाय निवास | ०१ |
| ०७. | रेक्टर निवास | ०२ |
| ०८. | अतिथी कक्ष | ०२ |
| ०९. | टॉयलेट ब्लॉक | ०२ |
| | एकूण- | ७० |

उपरोक्तप्रमाणे बांधकाम करणेसाठी तसेच खेळाचे मैदान इत्यादीसाठी अंदाजे किमान २ हे.२० आर (५.५० एकर) जागेची आवश्यकता आहे. प्रत्यक्ष बांधकामासाठी ढोबळमानाने ४००० चौ.मी. जागेची आवश्यकता आहे. क्रिडांगण व मोकळयाजागेसाठी १८००० चौ.मी. जागेची आवश्यकता आहे. प्राथमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वसतीगृह यांचे परिसर स्वतंत्र व वेगवेगळे असणे व्यवस्थापनाचे दृष्टीने सोयीचे होईल. उपरोक्तप्रमाणे बांधकाम करणेसाठी शैक्षणीक संकूल परिसरात पुरेशी जागा उपलब्ध नाही. शैक्षणिक संकूल जागेलगत सर्व्हे क्र. १०८ मध्ये श्री. बच्छानी यांची जागा भूसंपादीत करणेबाबत कार्यवाही चालु आहे. सदर जागेत अथवा वाहन विभागाचे जागेत किंवा दुसरी जागा खरेदी करुन कनिष्ठ महाविद्यालय व प्राथमिक शाळेसाठी इमारत बांधता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन, प्राथमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयासाठी जागेच्या किंमतीचा विचार करता, थोड्या दूर अंतरावर जमीन खरेदी करुन उपरोक्त बांधकाम प्रस्तावित करण्यात यावे, असे ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१४. क्ष किरण विभागासाठी कॅसेट व स्क्रिन चे खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४०.** श्री साईबाबा रुग्णालयामध्ये नविन ५०० एम.अे. क्ष-किरण मशिन कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदर मशिनवर रुग्णांचे क्ष-किरण (फोटो) काढणेकामी सोबतच्या यादीतील कॅसेट व स्क्रिनची मागणी सी.टी. स्कॅन विभागाने केली होती. याकामी विहीत पध्दतीने जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर मागणी गट क प्रकारच्या आयटम मध्ये करण्यात आली होती.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ चे सभेत मशिनरी / उपकरणे हत्यारे इत्यादी खरेदीकामी तज्ञ सल्लागार म्हणून ५ रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनिअर यांचे मदतीने निर्णय घेण्यात आला होता. परंतू गट क मधील कोणत्याही साहित्यावर निर्णय घेण्यात आला नव्हता.

निविदेमध्ये गट क मधील कॅसेट स्क्रिनसह व इतर साहित्यासाठी देखील दर प्राप्त झालेले होते. परंतू सदरचे प्राप्त दरामध्ये किरण कंपनीच्या कॅसेट व स्क्रिन या कंपनीचे दर प्राप्त झालेले नव्हते.

त्यामुळे खरेदी करण्यात आलेली नाही . तेंव्हा सदर कंपनीचे दर कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स,पुणे व अनिता एंटरप्रायजेस,मुंबई यांचेकडुन फॅक्सवर मागवण्यात आले होते. त्यांनी दि.११/०५/२००६ चे फॅक्स पत्रा अन्वये दर पाठविले आहे. सदर तक्त्यातील अ.नं.१, ८, ९ व १० याकरिता एकाचेच दर प्राप्त झालेली आहे. त्यांचे दर योग्य असल्याने तेथे त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे. अ.नं. ४ करीता मे.युनिव्हर्सल, पुणे व अनिता, मुंबई दोघांचेही दर सारखेच असल्याने तेथे दोघांनाही समप्रमाणात ऑर्डर विभागुन देता येईल. उर्वरित ठिकाणी निम्नतम दरांची शिफारस केलेली आहे.

मे.किरण कंपनीचे साहित्य चांगल्या दर्जेचे असल्याने त्याच कंपनीचे साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी वरील शिफारसीनुसार कोटेशनमधील दराने खरेदीकामी रु.२,८२,३९१.१९ इतका खर्च येणार आहे.

तरी वरील प्रमाणे साहित्य खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.२,८२,३९१.१९ चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.१५. बायपास सर्जरीकरिता तातडीचे सर्जिकल साहित्य खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४१.** दि. २७/०४/२००६ चे मंजुर टिपणीन्वये बायपास सर्जरीचे तातडीचे सर्जिकल साहित्य खरेदीकामी रु. १,८७,४६०/- चे खर्चास मंजुरी घेण्यात आली होती. त्यानुसार खालील अधिकृत विक्रेते यांचेकडून फॅक्सवर कोटेशन मागविण्यात आले होते.

०१. मे. स्पंदन सर्जिकल, औरंगाबाद
०२. मे. झेनीथ सर्जिकल, मुंबई
०३. मे. कॉसमॉस, मुंबई
०४. मे. लाईफ लाईन, दिल्ली

वरील पुरवठा धारकांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो आजचे सभेत सादर केला होता. एकुण मागणी केलेल्या ४२ आयटमपैकी १४ साठी कोणाचेही दर प्राप्त झालेले नाही. तर २८ आयटमसाठी निम्नत्तम दरानुसार शिफारस केलेली आहे. त्यासाठी रु. १,८६,७६३.८८/- इतका खर्च येणार आहे. त्यानुसार पुरवठा धारकांना पुरवठा आदेश देण्यात आला असून त्यांचेकडून मालाचा पुरवठा काही प्रमाणात झाला असून बाकीचा पुरवठा होत आहे. तरी रु. १,८६,७६३.८८ चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.१६. गट ब मधील पॅथोलॉजी/मायक्रोबायोलॉजी मशिनरी/उपकरणे खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३४२.** श्रीसाईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील मशिनरी/उपकरणे खरेदीकामी श्री साईबाबा रुग्णालयाचे इतर मशिनरी/उपकरणे/सर्जिकल हत्यारे इत्यादी खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१२/२००५ चे सभेत निर्णय क्रमांक ८२० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन विहित पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांचा दि. ११/०२/२००६ चे सभेत झालेल्या वाटाघाटीनंतरचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ रोजीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता. यावेळी चर्चा/वाटाघाटीसाठी संस्थानने तज्ञ सल्लागार म्हणून बोलविलेले ०५ बायोमेडीकल इंजिनीअर, विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी, रुग्णालयाचे प्रोजेक्ट रिपोर्ट करणारे डॉ. विनय कोठारी हे उपस्थित होते. त्यांचे उपस्थितीत मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदीबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु गट ब मधील वरील पॅथोलॉजी/मायक्रोबायोलॉजीची मशिनरी/उपकरणे खरेदीबाबतचा निर्णय घेण्यात आलेला नव्हता.

त्यानुसार रुग्णालयात नव्याने रुजू झालेले डॉ. न्यायाधीश, पॅथोलॉजिस्ट यांनी गट ब मधील सदर विभागासाठी लागणाऱ्या मशिनरी/उपकरणे साहित्याचे तक्त्यामधील दर, पुरवठाधारकाचे टेंडर याचा अभ्यास करुन कोणत्या कंपनीचे मशिनरी/उपकरणे खरेदी करावयाची याची शिफारस केली आहे.

डॉ. न्यायाधीश यांनी शिफारस केलेली यादी मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांना फॅक्सव्दारे पाठवून त्यांचेकडून मान्य करुन घेण्यात आलेली असून डॉ. न्यायाधीश यांनी शिफारस केलेली साहित्याचे दर ठळक अक्षरात दर्शविलेली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी रु. २,६७,२४२.९३ इतका खर्च येणार आहे.

मा.विश्वस्त समिती सभा दि.४/०३/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १२६ अन्वये सदरचे साहित्य आवश्यकतेनुसार नंतर तज्ञ डॉक्टरांचे सल्ल्यानुसार खरेदी करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार रुग्णालयातील तज्ञ डॉक्टर न्यायाधीश यांनी अभ्यास करुन खरेदी बाबत शिफारस केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.१७. डिजीटल रेडिओग्राफी मशिनच्या निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३४३.** श्री साईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी करावयाचे अंदाजे रु. २५ लाख किंमतीचे डिजीटल रेडीओग्राफी मशिन खरेदीबाबत मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ चे सभेतील निर्णय क्रमांक १३४ अन्वये वर्तमान पत्रात जाहीरात देऊन दि. २०/०४/२००६ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदरच्या निविदा विक्रीकामी संस्थानचे शिर्डी व मुंबई कार्यालयात एकुण १५ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यापैकी ०३ निविदांची विक्री होऊन तिनच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १ | अनिता मेडीकल सिस्टीम, मुंबई |
| २ | अगफा इंडीया प्रा.लि., मुंबई |
| ३ | कोडॅक इंडीया प्रा. लि., मुंबई |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेंत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | अनिता मेडीकल सिस्टीम, मुंबई | 20,81,250.00<br>Fuji FCR Capsula X JAPAN<br>01.AMC 40,000 + Tax = 1st Year<br>02.CMC-160000+Tax = per Year | 18,50,000.00<br>Fuji FCR Capsula X JAPAN<br>01.AMC 40,000 + Tax = 1st Year<br>02.CMC-160000+Tax = per Year |
| ०२. | अगफा इंडीया प्रा. लि., मुंबई | 39,37,500.00<br>CR 250 Digitizer<br>01. AMC Charges 1.20 Laks<br>02. CMC Charges 2.50 Laks | अनुपस्थित |
| ०३. | कोडॅक इंडीया प्रा. लि., मुंबई | 35,00,000.00<br>CR 500<br>01. Annual Contract labour 175000.00<br>02. Annual Comprehensive Contract 350000.00 | 30,00,000.00<br>CR 500<br>01. Annual Contract labour 175000.00<br>02. Annual Comprehensive Contract 275000.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अनिता मेडिकल सिस्टम,मुंबई यांनी सादर केलेले मशिन मागणीनुसार नसल्याने अ.नं.०३ चे निविदासादरकर्ते मे.कोडॅक इंडिया प्रा.लि.,मुंबई यांची निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेशासोबत २५% रक्कम आगाऊ देण्यात यावी व उर्वरित रक्कम मशिन रुग्णालयात प्राप्त झाल्यावर अदा करण्यात यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालये)

**विषय नं.१८. सेन्टीनिल कंपनीचे सुचर्सचे खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४४.** श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीयाक शस्त्रक्रियेसाठी लागणारे विविध प्रकारचे सुचर्सचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यानुसार सदरचे सभेत निर्णय क्रमांक १३२ अन्वये जॉन्सन ॲन्ड जॉन्सन कंपनीचे व बी.ब्रॉन कंपनीचे निम्मी निम्मी सुचर्स खरेदी करावीत असे ठरले होते. त्यानुसार खालील प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेले होते.

| | | |
|---|---|---|
| १) मे. जॉन्सन ॲन्ड जॉन्सन, मुंबई | - | रु. ८२८८६.०० |
| २) मे. बी.ब्रॉन कंपनी, मुंबई | - | रु. १७१३२२.०० |
| ३) मे. ओम साई सर्जिकल, मुंबई<br>(जॉन्सन ॲन्ड जॉन्सन कंपनीचे अधिकृत विक्रते) | - | रु. ५४७१५.७८ |
| **एकुण रक्कम रु.** | **-** | **रु. ३०८९२३.७८** |

डॉ. अभय वालीया हे मानद कार्डीयाक सर्जन म्हणून संस्थानमध्ये नियुक्त केलेले आहे. ते दि.०६/०५/२००६ रोजी आपले रुग्णालयात पहिली कार्डीयाक सर्जरी करणार असल्याने त्यासाठी त्यांनी सेन्टीनील कंपनीचे सुचर्स लागतील असे सांगितले होते.

त्यानुसार सेन्टीनील कंपनीस आपणास लागणाऱ्या सुचर्सच्या यादीचा फॅक्स करुन त्यांचे दर मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. २,०३,६०१/- इतका खर्च येणार असल्याने सदरची यादी मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांना फॅक्स करुन त्यांची सदर यादीवर मान्यता घेण्यात आलेली होती. त्यांनी सध्या वरीलप्रमाणे सुचर्स तातडीने खरेदी करण्यात येऊन सदरचे खरेदीस कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे अशा सुचना दिल्या होत्या.

तरी वरीलप्रमाणे सुचर्स तातडीने मे.सेन्टीनील, मुंबई या कंपनीकडून खरेदी केलेले आहे. सदरचे खरेदीकामी रु.२,०३,६०१/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.१९. गट क मधील आवश्यक सर्जिकल साहित्य व इतर साहित्य खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४५.** श्री साईबाबा रुग्णालयात ऑपरेशन थिएटर व इतर वार्डात लागणारे सर्जिकल साहित्य इत्यादी खरेदीबाबत मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१२/२००५ चे सभेत निर्णय क्र. ८२० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन विहित पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदांवर दि. ११/०२/२००६ चे सभेत झालेल्या वाटाघाटीनंतरचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ रोजीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता. याच वेळी चर्चा/वाटाघाटीसाठी संस्थानने तज्ञ सल्लागार म्हणून ०५ रुग्णालयाचे ०५ बायोमेडीकल इंजिनीअर, विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी, रुग्णालयाचे प्रोजेक्ट रिपोर्ट करणारे डॉ. विनय कोठारी हे उपस्थित होते. त्यांचे उपस्थितीत मशिनरी / उपकरणे / हत्यारे खरेदीबाबतचा निर्णय घेण्यात आला होता.

गट-क मधील आवश्यक तितके सर्जिकल साहित्य खरेदीबाबत दि. ०४/०३/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १२३ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठाधारकांकडून सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे. महेश सर्जिकल, पुणे | - | रु. ५३८.४० |
| २) मे. लाईफ लाईन सिस्टीम, दिल्ली | - | रु. ७३०४.०० |
| ३) मे. कॉसमॉस एंटरप्रायजेस, मुंबई | - | रु. १५१३.०० |
| ४) मे. आनंद मार्केटींग, डोंबिवली | - | रु. २४३३६.०० |
| ५) मे. राहुल एंटरप्रायजेस, नाशिक | - | रु. ३७६३४.०० |

सदरचे साहित्य व्यतिरीक्त गट क मधील साहित्याची सध्या तातडीने आवश्यकता आहे. त्यासाठी निविदेमधील मंजुर दराने एकुण रु. २७९९४२.८७ इतका खर्च येणार आहे. सदरचे साहित्याची यादी मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी साहेब यांना फॅक्सव्दारे पाठवून त्यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे साहित्य खरेदी व खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०४/०३/२००६ चे सभेत निर्णय क्र.१२३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.या तक्त्यामध्ये जे दर प्राप्त झालेले आहे त्यामध्ये निम्नतम दरांचा विचार न करता यापुर्वीचा वापराचा अनुभव , तांत्रिक क्षमता इत्यादी विचार करुन शिफारस केलेली आहे. त्यासाठी निविदेतील मंजुर दराने रु. २,७९,९४२.८७ खर्च येणार आहे. त्यानुसार संबंधीत निविदा धारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. तरी रु. २,७९,९४२.८७ चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.२०. कार्डीयाक कॅथेटर चे खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४६.** श्री साईबाबा रुग्णालयात दि. ०६/०५/२००६ रोजी पहिली बायपास सर्जरी करण्यात आलेली आहे. सदरची शस्त्रक्रिया पुर्व तयारी पाहणेसाठी नाशिक येथील डॉ. अभय वालीया हे दि. ०१/०५/२००६ रोजी आले होते. त्यांनी पाहणी केल्यानंतर सोबतच्या यादीतील कॅथेटर हे आपणास शस्त्रक्रियासाठी लागणार आहेत असे सांगितले होते. सदरची कॅथेटर हे फक्त मेडट्रॉनीक कंपनीचेच असतात.

सदरची यादी मान्यतेसाठी मा. विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी साहेब यांना मान्यतेसाठी पाठविली होती.

त्यांनी तातडीची शस्त्रक्रिया असल्याने मेडट्रॉनीक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून तातडीने खरेदी करुन कार्योत्तर मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे सुचविले होते. तसेच सदरचे खरेदीबाबत दि.०३.०५.२००६ रोजी मा.विश्वस्त उपसमिती सभेचे वेळी समक्ष चर्चा करणेत आलेली होती.

तातडीची गरज असल्याने डॉ.तिवारी , विश्वस्त यांचे सुचनेनुसार कॅथेटर तातडीने मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून खरेदी करण्यात आलेली असून त्यांनी आतापर्यंत रु. १,०२,२८५/- इतक्या रक्कमेच्या मालाचा पुरवठा केला असून उर्वरीत माल त्यांचेकडून गरजेनुसार मागविता येईल. तरी मे. कांचन ड्रग्ज, पुणे यांचेकडून एकुण रु. १,७८,४२०/- चे साहित्य खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.२१. ॲनास्थेशिया साहित्य खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४७.** श्रीसाईबाबा रुग्णालयात आय.सी.सी.यु. कार्डीयाक ओ.टी.,कॅथलॅब ओ.टी. रीकव्हरी वार्ड इत्यादीमध्ये लागणारे साहित्यकामी डॉ. नरोडे यांनी मागणी केलेली आहे. सदरचे साहित्य तातडीचे असल्यामुळे याकामी फॅक्सवरुन कोटेशन मागवण्यात आले होते.

डॉ.नरोडे यांनी मागणी केलेल्या साहित्यापैकी काही साहित्य आपणाकडे उपलब्ध आहे तर काहीचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे. त्यांनी मागणी केलेल्या साहित्यापैकी खालील साहित्यांची नविन मागणी करावी लागणार आहे. त्यासाठी फॅक्स व पत्राद्वारे प्राप्त झालेल्या ०३ कोटेशनचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| Sr No. | Name of Items | Qty. | Kanchan Drug Pune | C.Natvarlal, Mumbai | Bombay Sergical, Mumbai | Total Rs |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Ambu bag Aduelt | 15 nos | 2,500.00 | 6,356..25 | **2,250.00** | 33,750.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 02. | Ambu bag Pad | 04 nos | **1.665.00** | 6.637.50 | N.Q. | 6.660.00 |
| 03. | Laryngoscope with blade set | 10 nos | **1,350.00** | N.Q. | 1,378.12 | 13,500.00 |
| | | | | | Total Amount | 53,910.00 |

वरीलपैकी अ.नं. १ बॉम्बे सर्जीकल,मुंबई यांचे दर निम्नतम आहे. अ.नं. २ व ३ करीता मे.कांचन ड्रग्ज,पुणे यांचे दर निम्नतम आहे. वरील शिफारसीनुसार सदरचे खरेदीकामी एकुण रु.५३,९१०/- इतका खर्च येणार आहे. तरी सदरचे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.२२. वैद्यकीय संचालक यांना तातडीचे औषधे खरेदीचे अधिकार देणेबाबत.**

**निर्णय क्र.३४८.** श्रीसाईबाबा सुपरस्पेशालिटी रुग्णालय नुकतेच कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. सदरचे रुग्णालयात कॅथलॅब ओ.टी. कार्डीयाक ओ.टी.,रिकव्हरी वार्ड, ऑप्थॅलमीक ओ.टी., वार्ड , जनरल सर्जरी ओ.टी.वार्ड, आर्थोपेडीक ओ.टी. वार्ड व इतर वार्ड आणि विभाग इत्यादी कार्यान्वीत करण्यात आलेली आहेत. रुग्णालय हे नविनच सुरु होत असल्यामुळे बरीचशी औषधे, सर्जीकल साहित्य, व्हाल्व, स्टेंन्ट, कॅथेटर, किरकोळ साहित्य इत्यादी खरेदी करावी लागत आहे व पुढेही देखील वेळोवेळी आवश्यकतेनुसार खरेदी करावी लागतील .

वरील सर्व औषधे, साहित्य ही बरीच महागडी असतात. उदाः- स्टेन्ट, व्हाल्व, डायग्नोस्टीक कॅथेटर इत्यादी, कामकाज सुरळीत चालवण्याचे दृष्टीने व रुग्णांची गैरसोय टाळण्याचे दृष्टीने वैद्यकिय संचालक यांना अशा प्रकारची औषधे / साहित्य इत्यादी तातडीने खरेदीकामी दरमहा रु.१,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख मात्र ) चे अधिकार दिल्यास कामकाज सुरळीत चालू शकेल व रुग्णांची गैरसोय टाळण्यास मदत होईल.

वैद्यकिय संचालक हे आवश्यक ते औषधे , साहित्य, सर्जीकल साहित्य, किरकोळ साहित्य इत्यादी क्रेडीटवर तातडीने खरेदी करुन झालेल्या खर्चास मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची कार्योत्तर मंजूरी घेऊन संबंधीत पुरवठाधारकास लेखाशाखेमार्फत बीले चेक / डी.डी.ने अदा करता येईल त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक यांनी मा.उपसमितीच्या सभेमध्ये तातडीच्या खरेदीस मान्यता घेऊन विहीत पध्दतीने आवश्यक ते औषधे, साहित्य, सर्जीकल साहित्य, किरकोळ साहित्य शक्य असल्यास क्रेडीटवर अथवा रोखीने खरेदी करुन तातडीची गरज भागवावी, असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)

**विषय नं.२३. हॉस्पिटल फर्निचर खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३४९.** श्रीसाईबाबा रुग्णालयाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे मंजूरीने विहीत पध्दतीने एकुण रु.६५,५५,०८९/- चे फर्निचर मे.जनक हेल्थकेअर, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात आले होते.

त्याप्रमाणे मे.जनक हेल्थकेअर,मुंबई यांनी मालाचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सदरचे फर्निचर रुग्णालयामध्ये प्रत्यक्षात वापरावयास सुरुवात केली आहे. परंतू कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व वॉर्डमध्ये सोबतच्या यादीतील खालील फर्निचर कमी पडल्यामुळे मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांनी मे.जनक हेल्थकेअर, मुंबई यांना दि.१०.०५.२००६ रोजी पत्र देऊन खालील प्रमाणे फर्निचरचा पुरवठा करण्यास सांगितले होते.

टेबल नं. ०१-

| Sr.No. | Name of Item | Code No. | Qty. | Rate | Total Amount | Qty. Already Purchased |
|---|---|---|---|---|---|---|
| 01. | Medicine Trolley | 9003 | 10 | 19730.00 | 197300.00 | 3 |
| 02. | Maya s Trolley | 1632 | 12 | 4665.00 | 55980.00 | - |
| 03. | Dressing Trolley | 1068 | 15 | 11050.00 | 165750.00 | - |
| 04. | Soiled Line Trolley | 1064 | 05 | 2960.00 | 14800.00 | 6 |
| 05. | Ward Care Saline Stand | 1044 | 10 | 1795.00 | 17950.00 | - |
| | | | | एकूण | 451780.00 | |

परंतु सर्व वॉर्ड व थिएटरची पाहणी केल्यानंतर वरीलप्रमाणे मागणी देखील कमी पडणार आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे मागणीमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी रु. ७,००,४८५/- इतका खर्च येणार आहे.

टेबल नं. ०२ -

| Sr.No. | Name of Item | Code No. | Qty. | Rate | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01. | Medicine Trolley | 9003 | 15 | 19730.00 | 295950.00 |
| 02. | Maya s Trolley | 1632 | 15 | 4665.00 | 69975.00 |
| 03. | Dressing Trolley | 1068 | 20 | 11050.00 | 221000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04. | Soiled Line Trolley | 1064 | 06 | 2960.00 | 17760.00 |
| 05. | Ward Care Saline Stand | 1044 | 40 | 1795.00 | 71800.00 |
| 06. | Trolly Mattress (for Stretcher Trolly) | 1703 | 12 | 2000.00(अंदाजे) | 24000.00 |
| | | | | एकूण | 700485.00 |

मे. जनक हेल्थकेअर, मुंबई यांनी सदर फर्निचरचे कोटेशन पाठविलेले असून त्यानुसार टेबल नं. २ मध्ये सुचविल्याप्रमाणे सदरच्या खरेदीकामी रु.७,००,४८५/-(सर्व करांसह) खर्च येणार आहे.

तरी वरील टेबल नं.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे फर्निचर मे.जनक हेल्थ केअर,मुंबई यांचेकडून खरेदीस व रु.७,००,४८५/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)

**विषय नं.२४. बायपास सर्जरीचे वेळेस तातडीने खरेदी केलेली औषधे/सर्जिकल साहित्य, हत्यारे, किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३५०.** श्री साईबाबा रुग्णालयात नुकतेच कार्यान्वीत झालेले आहे. दि.०६.०५.२००६ व दि.०७.०५.२००६ रोजी अशा मिळुन ०३ बायपास सर्जरी रुग्णालयात प्रथमच यशस्वीरित्या पार पाडण्यात आल्या. ही ऑपरेशन्स श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्रथमच होणार असल्यामुळे मुंबईचे हृदयशस्त्रक्रिया करणारे विशारद डॉ.रमाकांत पांडा, डॉ.सक्सेना, डॉ.उंबरकर व डॉ वालिया आले होते. सदर ह्दयाच्या शस्त्रक्रियांसाठी वरील तज्ञांना काही वेगळी उपकरणे आवश्यक होती.

सदर शस्त्रक्रिया या व्हीडीओ कॉन्फ्रन्स व्दारे दि.०७.०५.२००६ प्रेस कॉन्फ्रन्स नंतर विविध पत्रकारांना व इतर मान्यवरांना दाखविण्यात आली. परंतू काही वेगळी शस्त्रक्रिया व कार्डीयाक सर्जीकल उपकरणे ही अत्यावश्यक असून ती विकत घेण्यास कालावधी फारच कमी होता. त्यामुळे ही उपकरणे संबंधीत पुरवठाधारकांकडून विहीत पध्दतीने खरेदी करता येऊ शकत नव्हती व ती तातडीने खरेदी करण्याशिवाय पर्याय नव्हता.

सदरची खरेदी उपरानिर्दिष्ट विशारद व मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचे सुचनेनुसार मुंबई, नाशिक, औरंगाबाद दिल्ली, पुणे, येथून तातडीने ती खरेदी करावी लागली. काही साहित्य मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांनी मुंबई येऊन खरेदी करुन पाठविली होती. तसेच इतर वार्ड ऑपरेशन थिएटरसाठी सुध्दा काही किरकोळ साहित्य खरेदी केलेली आहे. अशा प्रकारच्या खरेदीबाबत दि. ०३/०५/२००६ चे स्थानिक विश्वस्त समितीचे सभेत चर्चा होऊन बायपास सर्जरीसाठी आवश्यक ती औषधे, सर्जिकल साहित्य, खरेदी करावीत अशा सुचना मा. विश्वस्तांनी केलेल्या आहेत.त्यानुसार खरेदी केलेल्या पुरवठाधारकांच्या बीलाचे यादी नुसार रु.१५,७४,५५९.६३ इतका खर्च आलेला आहे. तरी सदरचे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.२५. साईबाबा रुग्णालयासाठी पडदे कापड खरेदीकामी निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३५१.** श्री साईबाबा हॉस्पिटल दिनांक १५.०५.२००६ रोजी सुरु झाले असून हॉस्पिटलसाठी पडद्यासाठी कपडा खरेदी केलेला नसून दिनांक ११.०४.२००६ च्या टिपणीअन्वये कपडा खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दिनांक ११.५.२००६ रोजी नाशिकहून ३ व दिनांक १७.०५.२००६ रोजी नगरहून १ कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत ते खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.मनिषा टेक्सटाईल्स,नाशिक |
| ०२ | मे.मंगल क्लॉथ स्टोअर्स,नाशिक |
| ०३ | मे.प्रसाद गादी भांडार,नाशिक |
| ०४ | मे.सारडा इंटेरिअर,अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स दिनांक २५.५.२००६ चे स्थानिक विश्वस्त समिती सभेपूढे समक्ष उघडण्यात आलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहे.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कापडाची मागणी | कोटेशन्समधील दर प्र.मि. रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेल दर प्र.मि रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.सारडा इंटेरिअर,अहमदनगर | ३२०० स्के.मी. | ३५ ते ११०.०० प्र.मि. | ६४.०० प्र.मि. |
| ०२ | मे.मंगल क्लॉथ स्टोअर्स,नाशिक | ३२०० स्के.मी. | ७०.०० प्र.मि.(४८"पन्हा) | ६६.५० |
| ०३ | मे.मनिषा टेक्सटाईल्स,नाशिक | ३२०० स्के.मी. | ७५.०० प्र.मि.(४८"पन्हा) | अनुपस्थित |
| ०४ | मे.प्रसाद गादी भांडार,नाशिक | ३२०० स्के.मी. | ७०.०० प्र.मि.(४८"पन्हा) | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे सारडा इंटेरिअर्स, अहमदनगर यांचे रुपये ६४.०० प्र.मि. हे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक, रुग्णालये)

**विषय नं.२६. श्रीसाई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डी.व्ही.डी.तयार करणे कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३५२.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीद्वारा श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डी.व्ही.डी. १०,००० नग तयार करणेसाठी अंदाजे दर रुपये ३५/- प्रमाणे येणारे अंदाजे रुपये ३,५०,०००/- मात्र खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०३.२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १३८ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डी.व्ही.डी. १०,००० नग तयार करणेकामी मुंबई येथील खालील नामांकित सी.डी. निर्मात्यांना जा.न.एसएसएस-वशी-प्रकाशने-५६७०-२००६ दि.०१.०५.२००६ अन्वये कोटेशन्स पाठवून त्यांना भरुन जमा करणेबाबत कळविण्यात आले आहे.

| Sr.No | Name & Address | Sr.No. | Name & Address |
|---|---|---|---|
| 01 | MELEI MEDIA,MUMBAI | 02 | SUNRISE INDUSTRIES, MUMBAI |
| 03 | SONY MUSIC ENTERTAINMENT (INDIA) PVT.LTD, MUMBAI | 04 | VANDANA ELECTRONICS, MUMBAI |
| 05 | MHIR AGENCEIS (P) LTD. MUMBAI | 06 | AFTAB ELECTRONICS PVT LTD, MUMBAI |
| 07 | KRCD INDIA PVT LTD, MUMBAI | 08 | DATACOPS TECHNOLOGIES , PUNE. |

उपरोक्त प्रमाणे एकूण ८ सी. डी. निर्मात्यांना कोटेशन पाठविण्यात आली होती त्यापैकी खालील निर्मात्यांची सिलबंद ५ कोटेशन प्राप्त झाले आहे.

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01 | Melei Media , Mumbai |
| 02 | M/s. Vandana Electronics, Mumbai |
| 03 | Aftab Electronics Pvt.Ltd., Mumbai |
| 04 | Mihir Agencies Pvt Ltd., Mumbai |
| 05 | KRCD (India) Pvt.Ltd., Mumbai |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आले असता कोटेशन्सधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| Sr.No | Name & Address | कोटशन मध्ये देऊ केलेले दर (सर्व करांसह प्रत संच दर रुपये) |
|---|---|---|
| 01 | Melei Media , Mumbai | 36.97 |
| 02 | M/s. Vandana Electronics, Mumbai | 35.51 |
| 03 | Aftab Electronics Pvt.Ltd., Mumbai | 37.18 |
| 04 | Mihir Agencies Pvt Ltd., Mumbai | 39.52 |
| 05 | KRCD (India) Pvt.Ltd., Mumbai | 38.48 |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.वंदना इलेक्ट्रॉनिक्स, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डी.व्ही.डी. तयार करणेकामी आदेश देण्यात यावा असे ठरले. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०३.२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १३८ नुसार श्रीसाई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार डी.व्ही.डी.तयार करणेकामी रुपये ३,५०,०००/- खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात रुपये ३,५५,१००.०० मात्र खर्च येत आहे त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२७. श्रीमती टी.शैलेजा, हैद्राबाद लिखील "मातृ साई" हे तेलगू भाषेतील पुस्तक प्रकाशित करणे बाबत.**

**निर्णय क्र.३५३.** श्रीमती टी.शैलेजा, हैद्राबाद यांचे दि.२८.०२.२००५ रोजी दाखल झालेले पत्राअन्वये त्यांनी स्वत: लिहिलेले " मातृ साई " हे तेलगू भाषेतील लहान मुलांसाठी असलेले पुस्तक संस्थानद्वारे प्रकाशित करणेसाठी दाखल केले आहे.सदरचे पुस्तक हे गोष्टीरूप असून, ते हेमाडपंतांच्या साईसच्चरितावर अधारित असून ते ११ भागात विभागलेले आहे.श्रीमती टी.शैलेजा, हैद्राबाद लिखीत " मातृ साई " हे तेलगू भाषेतील पुस्तक प्रकाशनास योग्य असलेबाबत डॉ. के. निलकंठम, असोसिएट प्रोफेसर संस्कृत डिपार्टमेंट, ओसमानिया विद्यापिठ, हैद्राबाद यांचेकडून प्राप्त झालेले शिफारस पत्र वरील संदर्भिय पत्रासोबत अवलोकनार्थ जोडले आहे. उपरोक्त पुस्तक प्रकाशना बाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८.१२.२००५ रोजीचे सभेतील विषय नं. २८ निर्णय ७५८ नुसार श्रीमती टी.शैलेजा लिखीत मातृ साई हे तेलगू भाषेतील पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेपूर्वी ते पुणे विद्यापिठातून तपासणी करुन घेऊन त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा. त्यानंतर निर्णय घेण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार सदरचे पुस्तक पुणे विद्यापिठास इकडील जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/ ४५७२/२००६ दि.०५.०४.२००६ अन्वये तपासणी करणेकामी पाठविण्यात आले होते. परंतु पुणे विद्यापिठाने दि.१५.०४.२००६ अन्वये पुणे विद्यापिठात तेलगू विभाग नसल्याने तेलगू भाषेतील मातृसाई हे पुस्तक तपासणी करुन देता येणार नसलेबाबत कळविले आहे

उपरोक्त पुस्तकाबाबत श्रीमती टी शैलेजा यांनी हैद्राबाद येथील Dr. K. Venkat Reddy, Head Professor of Telugu University collage of Arte & Social Self Osamania University Hyderabad यांनी त्यांचे दि.२६.०४.२००६ चे शिफारस पत्राअन्वये श्रीमती टी. शैलेजा लिखीत मातृ साई पुस्तक प्रकाशनास योग्य असल्याचे कळविले आहे.तसेच डॉ.प्रमोद गणेश लाळे , उपाध्यक्ष, नियामकमंडळ, भांडारकर प्राच्य विद्या मंदिर, पुणे यांनीही त्यांचे दि.२९.०४.२००६ चे शिफारस पत्रात सदरचे पुस्तक श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा प्रकाशित करण्याची शिफारस केली आहे.

श्रीमती टी.शैलेजा, हैद्राबाद यांनी " मातृ साई " हे तेलगू भाषेतील पुस्तक प्रकाशनाबाबतचे सर्व हक्क संस्थानला देण्यास तयार असलेबाबत वरील संदर्भिय पत्राद्वारे कळविले आहे.तसेच सदर पुस्तक छपाई कामाच्या कव्हरसह, आतिल छपाई कामाच्या मजकूरासह सी.डी. तयार करुन पुस्तकाच्या नमुन्यासह त्यांनी दाखल केले आहे. सदरचे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करण्याचे ठरल्यास, प्रथम आवृत्ती असल्याने ५,००० प्रतींची छपाई करुन घेता येईल.

तरी श्रीमती टी.शैलेजा, हैद्राबाद लिखीत " मातृ साई " हे तेलगू भाषेतील पुस्तक श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत प्रकाशित करणेस, तसेच सदरचे पुस्तक छपाईसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील विषय नं.२६ निर्णय क्र.१३८ नुसार १८ प्रेसधारक व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ चे सभेतील विषय नं.२९ निर्णय क्र.६७८ नुसार ११ प्रेसधारक असे एकूण २९ निवडक प्रेसधारकांकडून छपाई कामाचे कोटशन्स मागवून ५,००० प्रती अंदाजे छपाई प्रती नग दर रुपये ६०/- नुसार करुन घेणेसाठी येणा-या अंदाजे रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२८. गादीपाट, गादी खोळ, बेडशीट व उशी कव्हर कापड खरेदीकामी निविदासादरकर्त्यांशी चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३५४.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णयानुसार चौकशी व निवासस्थान विभागासाठी आवश्यक असणारे गादीखोळ, बेडशीट व उशीकव्हर कापड खरेदीस व त्याकामी येणारे रु.९,५२,५००/-चे खर्चास तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०८.२००५ निर्णय क्र.४१५ नुसार श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी आवश्यक असणारे गादीखोळ व गादीपाट कापड खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.५,२५,०००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०१-०४.०३.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.०६.०३.२००६ ते दि.१६.०३.२००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१७.०३.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदरील निविदा मा.व्यवस्थापन समिती दि.०१.०४.२००६ चे सभेत उघडणेत आलेल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव व गांव** |
|---|---|
| ०१ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर |
| ०२ | मोता वुलन हाऊस, बारामती |
| ०३ | पुजा एन्टरप्रायजेस, मुंबई |
| ०४ | राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०५ | सारडा फर्निशींग, अहमदनगर |
| ०६ | बाबुभाई कलेक्शन्स, नाशिक |
| ०७ | एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिकरोड |
| ०८ | एन.एस.अरोरा ॲण्ड कंपनी, मुंबई |
| ०९ | महेश एन्टरप्रायजेस, अहमदनगर |

उपरोक्त निविदापैकी मे.मोता वुलन हाऊस, बारामती यांची निविदा उशीराने प्राप्त झालेली आहे. तसेच मे.सारडा फर्निशींग, अहमदनगर यांनी निविदेची विक्री मुदत संपल्याने, निविदा प्राप्त न झाल्याने त्यांनी त्यांचे लेटरहेडवर दर दिलेले आहे. उपरोक्त सर्व निविदाधारकांनी नियमाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेली आहे. मात्र प्राप्त निविदापैकी क्र.६ ते ९ यांनी मागणीप्रमाणे कंपनीचे दर न दिल्याने त्यांना आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आलेले नाही. उर्वरीत निविदांचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात येऊन खालील निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव व गांव** |
|---|---|
| ०१ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर |
| ०२ | मोता वुलन हाऊस, बारामती |
| ०३ | पुजा एन्टरप्रायजेस, मुंबई |
| ०४ | राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०५ | सारडा फर्निशींग, अहमदनगर |

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्या ांना एकत्रित बोलावून देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत सांगणेत येऊन त्यांना सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुट देऊ केली.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | देऊ केलेली सूट |
|---|---|---|
| ०१ | शिंगी ट्रेडींग कंपनी, अहमदनगर | ३% सुट |
| ०२ | मोता वुलन हाऊस, बारामती | आयटेमवाईज सूट |
| ०३ | पुजा एन्टरप्रायजेस, मुंबई | आयटेमवाईज सूट |
| ०४ | राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक | आयटेमवाईज सूट |
| ०५ | सारडा फर्निशींग, अहमदनगर | आयटेमवाईज सूट |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदाधारकांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन व्यवस्थापन समितीचे स्थानिक समिती सदस्यांनी नमुन्यांची पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.२९. विद्युत विभागासाठी जी.आय.पाईप, एम.एस.हार्डवेअर व ऑईल पेंट खरेदीकामी निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३५५.** श्रीसाईबाबांच्या दर्शनाच्या वेळी वाहतुकीचे नियमन करण्याकरीता पोलीस स्टेशन, शिरडी यांना २०० लोखंडी बॅरीकेटस तयार करुन देणेकामी आवश्यक असणारे जी.आय.पाईप, एम.एस.हार्डवेअर साहित्य, ऑईलपेंट खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.७,०३,६००/-चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.१२.२००४ निर्णय क्र.१६३ अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली होती. त्यानुसार मागविणेत आलेल्या निविदांवर मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०३.२००६ मध्ये निर्णय होऊन संबंधितांना न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत आलेले होते. मात्र मे.एशियन सेल्स, नाशिक यांनी साहित्य पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्याने त्यांचेकडील साहित्यासाठी फेरनिविदा मागणी करावी असे मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ मध्ये निर्णय झालेला आहे.

सदरील साहित्य खरेदीकामी दि.०५-०८.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.०८.०५.२००६ ते दि.१८.०५.२००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१९.०५.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या असून सदरील निविदा मा.स्थानिक विश्वस्त समितीचे दि.२५.०५.२००६ चे सभेत उघडणेत आलेल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक |
| ०२ | क्विक सप्लायर्स, नाशिक |
| ०३ | प्राईम एंटरप्राईजेस, संगमनेर |
| ०४ | शाह ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर |
| ०५ | टयुब्स एन ट्रब्स, जळगांव |
| ०६ | सुपारीबाग एम.एस.जी संघ लि.,मुंबई |
| ०७ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |

उपरोक्त सर्व निविदाधारकांनी नियमाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेली आहे. अ.नं.७ चे मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांनी जी.आय.पाईप व इतर साहित्याचा पुरवठा न केल्याने त्यांचे दराचा विचार करता येणार नाही. उर्वरीत सर्व निविदाधारकांना आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आले होते.

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना एकत्रित बोलावून देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत सांगणेत येऊन त्यांना सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले. त्यानंतर त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निम्नतम दर स्वीकारणेत येऊन कार्यादेश देण्यात यावेत असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३०. पाणी पुरवठा विभागासाठी जी.आय.पाईप व जी.आय साहित्य पुरविणे कामी निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३५६.** संस्थानचे निमगांव को-हाळे शिवारामध्ये खरेदी केलेल्या सर्व्हे नंबर १६९ मध्ये स्टॉफ क्वार्टरचे निवासाकरीता पाईपलाईन टाकणेत येणार आहे. सदरील पाईपलाईनसाठी आवश्यक असणारा जी.आय.पाईप व इतर साहित्य खरेदीस व त्याकामी येणारे रु.८,५२,९५८/-चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.३३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील साहित्य खरेदीकामी दि.०५-०८.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.०८.०५.२००६ ते दि.१८.०५.२००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१९.०५.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या असून सदरील निविदा मा.स्थानिक विश्वस्त समितीचे दि.२५.०५.२००६ चे सभेत उघडणेत आलेल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक |
| ०२ | क्विक सप्लायर्स, नाशिक |
| ०३ | प्राईम एन्टरप्राईजेस, संगमनेर |
| ०४ | नितीन एंटरप्राईजेस, नाशिक |
| ०५ | शाह ट्रेडींग कंपनी, श्रीरामपूर |
| ०६ | सयाजी सेल्स कार्पोरेशन, कोपरगांव |
| ०७ | टयुब्स एन टयुब्स, जळगांव |
| ०८ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |

उपरोक्त सर्व निविदाधारकांनी नियमाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेली आहे. अ.नं.८ चे मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांनी जी.आय.पाईप व इतर साहित्याचा पुरवठा न केल्याने त्यांचे दराचा विचार करता येणार नाही. उर्वरीत सर्व निविदाधारकांना आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आलेले आहे. तसेच प्राप्त निविदातील दरांचा तुलनात्मक तक्ता सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता.

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्या ंना एकत्रित बोलावून देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत सांगणेत येऊन त्यांना सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले. त्यांनी देऊ केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन निम्नतम दर स्वीकारणेत येऊन कार्यादेश देण्यात यावेत असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३१. संस्थान कर्मचारी गणवेश कापड खरेदीकामी निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३५७.** संस्थानमधील कायम कर्मचाऱ्यांसाठी (स्त्री व पुरुष) गणवेषाचे कापड, साड्या इ.खरेदी तसेच शिलाई विहित पद्धतीने करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १३,१६,४५०/- चे खर्चास दि.४.३.२००६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थान समितीचे सभेतील निर्णय क्र.१६३ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

सदरील गणवेष खरेदीकामी दिनांक ५-८.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दिनांक ८.५.२००६ ते दिनांक १८.५.२०६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून,दिनांक १९.५.२००६ निविदा स्वीकारणेची अंतीम मुदत ठेवणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या असून सदरील निविदा दिनांक २५.५.२००६ चे उपसमितीचे सभेत उघडण्यात आलेल्या असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव व गांव |
|---|---|
| ०१. | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी,नाशिकरोड |
| ०२. | मे.राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०३. | मे.किसान वस्त्र भांडार, सटाणा |
| ०४. | मे.बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे |
| ०५. | मे.बिर्ला युनिफॉर्म्स औरंगाबाद |
| ०६. | मे.सुपारीबाग एम.एस.जी संघ लि.,मुंबई |
| ०७. | मे.मोता वुलन हाऊन, बारामती |

उपरोक्त सर्व निविदासादरकर्त्यांनी नियमाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेली असून, त्यांना आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आलेले आहे. तसेच निविदांतील दरांचा तुलनात्मक तक्ता सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता.

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्या ंना एकत्रित बोलावून देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत सांगणेत येऊन त्यांना सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहे.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव व गांव | देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी,नाशिकरोड | आयटेमवाईज |
| ०२. | मे.राज सेल्स कार्पोरेशन, नाशिक | २% सुट |
| ०३. | मे.किसान वस्त्र भांडार, सटाणा | ७.५% सुट |
| ०४. | मे.बांठीया एन्टरप्राईजेस, पुणे | सुट नाही |
| ०५. | मे.बिर्ला युनिफॉर्म्स औरंगाबाद | १% सुट |
| ०६. | मे.सुपारीबाग एम.एस.जी संघ लि.,मुंबई | सुट नाही |
| ०७. | मे.मोता वुलन हाऊन, बारामती | आयटेमवाईज |

याचवेळेस मा.विश्वस्त श्री शैलेश श्रीहरी कुटे यांनी सभेस अशी माहिती दिली की, रेमंड कंपनीचे मालक हे साईभक्त आहेत व वारंवार शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येत असतात. ते संस्थानसाठी कंपनीमार्फत रेमंड कंपनीचे कापड बाजारातील दरापेक्षा जास्तीत जास्त सवलतीचे दराने देतील. तरी त्या दराने संस्थान कर्मचाऱ्यांकरीता गणवेश कापड खरेदी करता येईल ,त्याची नोंद घेण्यात आली व त्यानुसार मा. विश्वस्त शैलेश श्रीहरी कुटे यांनी पुढील कार्यवाही करावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३२. तीन चाकी सायकल खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.३५८.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.८७ नुसार संस्थानमार्फत अहमदनगर जिल्हयातील अपंगांना ३००० नग तिन चाकी सायकली देणेकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी व त्यासाठीची नियमावली तयार करण्यात यावी असे ठरलेले आहे. त्यानुसार प्रशासन शाखेस दि.२२.०४.२००६ चे प्रस्तावाने सध्या १००० सायकली टप्प्याटप्याने खरेदी करणेस व त्याकामी रु.३५ लाख मात्रचे खर्चास मंजूरी मिळालेली आहे.

सदरील सायकली खरेदीकामी दि.११-१३.०५.२००६ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.१५.०५.२००६ ते दि.२४.०५.२००६ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.२५.०५.२००६ अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली आहे. तसेच निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची मागणी करणेत आलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१. | हरबन्स सायकल इंडस्ट्रीज, पुणे |
| ०२. | जयहिंद सायकल मार्ट, कोपरगांव |
| ०३. | मिना एंटरप्राईजेस, नाशिक |
| ०४. | कृषी मशिनरी, धुळे |
| ०५. | लक्ष्मी इंडस्ट्रीज, इंदौर |
| ०६ | मनिष स्टील वर्क्स, इंदौर |
| ०७. | डायनॅमिक स्टील क्राफ्टस, नाशिक |
| ०८. | शाह एंटरप्राईजेस, इंदौर |
| ०९ | महागुज स्टील कंपनी, औरंगाबाद |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन ता व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३३. माल वाहतूक दोन वाहने खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३५९.** संस्थानकडील कार्यालयीन वापरात व मालवाहतुक वापरात सु-सुत्रता यावी म्हणून सर्व वाहने एकत्रीत करून सन-१९९९ला वाहन विभाग नव्याने सुरूवात करण्यात आलेले आहे.

सध्या वाहन विभागात मालवाहतुकी करीता खालील प्रमाणे वाहने उपलब्ध आहेत.

| अ.नं | वाहन क्रं. | वाहन प्रकार | खरेदी दिनांक | शेरा | वापर |
|---|---|---|---|---|---|
| १ | एमएच-१७/सी-७३८१ | ४०७ टेम्पो | २०/०५/१९९९ | चालु स्थितीत | डिझेल, साखर, गहु, भाजी-पाला इ. वाहतुकी करीता. |
| २ | एमएच-१७/एच-५५०१ | ७०९ टेम्पो | ०७/१२/२००० | चालु स्थितीत | साखर, गहु, तुप, मनुका, ॲलम, इ. वाहतुकी करीता. |
| ३ | एमएच-१७/के-९९०९ | महिंद्रा मॅक्स | ०६/०३/२००५ | चालु स्थितीत | प्रसादालय मालवाहतुक |
| ४ | एमएच-१७/के-९९१० | महिंद्रा कॅम्पर | ०६/०३/२००५ | चालु स्थितीत | लाडू प्रसाद वाहतुक |
| ५ | एमएच-१७/एच-२८४ | स्वराज ट्रॅक्टर | १४/०२/२००० | चालु स्थितीत | बांधकाम,बगीचा कामकरीता |
| ६ | एमएच-१७/सी-७०७८ | मिनीडोर | २८/१२/१९९९ | लिलावा करीता | - |
| ७ | एमएच-१७/सी-७०७९ | मिनीडोर | २८/१२/१९९९ | लिलावा करीता | - |
| ८ | एमजीएम-६८६२ | एस्कॉर्ट ट्रॅक्टर | १२/०१/१९८५ | लिलावा करीता | - |

उपलब्ध ०८ वाहनांचा विचारकरता ०५ वाहने चालु स्थितीत आहेत. नियोजित प्रसादालय, पाणी पुरवठा योजना (कनकुरीतळे), मुख्यभांडार व रुग्णालय दुर असल्याने तसेच संस्थान उत्सव, संस्थान तर्फे वेळो-वेळी आयोजित केलेले कार्यक्रम इ. कामा करीता वाहने अपुरी पडत असल्याने मालवाहतुकी करीता महिंद्रा कंपनीची दोन मॅक्स वाहने खरेदी कंपनीचे अधिकृत डिलर्सकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.३४. नवीन बसेस खरेदी कामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३६०.** संस्थान कडील उपलब्ध बसेस पैकी श्रीसाईभक्तांचे सोयी करीता मा.व्यवस्थापन समितीचे दि. १७/०४/२००५ चे सभेतील निर्णय क्रं.१५९ अन्वये दि.०६/०८/२००५ पासून भक्तनिवास कडील दोन बसेस शिरडी-नगरसुल रेल्वेस्टेशन- शिरडी करीता सवलतीचे दरात प्रति सिट रू.२५/- प्रमाणे सुरू करण्यात आलेल्या आहेत.

नगरसुल रेल्वेस्टेशन करीता कायम दोन बसेस नफा-तोटयाचा विचार न करता श्री साई भक्तांचे सोयी करीता चालू ठेवावयाच्या असल्यास नवीन दोन बसेस खरेदीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२००६रोजी पुढील निर्णया करीता सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.४७अ नुसार नवीन दोन बसेस खरेदीस व येणारा खर्च अंदाजे रू.२५ ते ३० लाख मात्र तसेच टाटा कंपनीचे अधिकृत डिलर कडून कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार जा.नं.वाहन/४९३०/दि.०४/०५/२००६ व जा.नं.वाहन/६०३८/ दिनांक ०५/०५/२००६ ने खालील प्रमाणे टाटा कंपनीच्या अधिकृत डिलर्स कडून कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत.

०१ शुभायन मोटर्स, अहमदनगर.
०२ स्टर्लिग मोटर्स, नाशिक.
०३ स्टर्लिग मोटर्स, बाभळेश्वर.
०४ मे. पंडीत ऑटोमोटीव्ह, लि.सातारा.
०५ सतिष मोटर्स, प्रा लि. औ.बाद
०६ उज्जवल अॅटोमोटीव्ह, धुळे.
०७ युनायटेड मोटर्स लि.मुंबई.

वरील टाटा कंपनीच्या सात अधिकृत डिलर्स पैकी खालील प्रमाणे तिन कोटेशन प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | शुभायन मोटर्स, अहमदनगर. |
| ०२. | स्टर्लिग मोटर्स, नाशिक. |
| ०३. | सतिष मोटर्स, प्रा लि. औरंगाबाद |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन,कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | वाहनाचा तपशील | कोटेशनमधील दर रुपये प्रती | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१. | शुभायन मोटर्स, अहमदनगर. | TATA ,LPO 1510 Starbus Standard-54 Seats (ओनिडा टी.व्ही., डी.व्ही.डी. प्लेअर,साऊंड सिस्टीम, फिटींग सह) | १५,५५,१५५.०० | १५,२०,०००.०० |
| ०२. | स्टर्लिग मोटर्स, नाशिक. | TATA ,LPO 1510 Starbus Standard-54 Seats (ओनिडा टी.व्ही., डी.व्ही.डी. प्लेअर,साऊंड सिस्टीम, फिटींग सह) | १५,४५,१८८.०० | १५,३०,१८८.०० |
| ०३. | सतिष मोटर्स, प्रा लि. औरंगाबाद | TATA ,LPO 1510 Starbus Standard-54 Seats (ओनिडा टी.व्ही., डी.व्ही.डी. प्लेअर,साऊंड सिस्टीम, फिटींग सह) | १५,६६,३९३.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन,अ.नं.०१ चे कोटेशनसादरकर्ते मे.शुभायन मोटर्स, अहमदनगर यांचे निम्नतम दराचे रुपये १५,२०,०००/- प्रती वाहन हे स्वीकारणेत येऊन त्यांना दोन बसेस पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात यावा,असे ठरलें. याकामी ५०% अॅडव्हान्स देण्यात यावा असेही ठरले.

याचवेळी सध्या संस्थानचे वापरात असलेल्या वाहनांपैकी ज्या वाहनांचे कि.मी. १ लाख किंवा त्यापेक्षा जादा रनिंग झालेले आहे अशा वाहनांची लिलावाने विक्री करण्यात यावी व त्याऐवजी नविन वाहनांची खरेदी करणेकामी प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा,असें ठरलें.

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.३५. साईबाबा हॉस्पिटल ए.सी.करिता लागणारी केबल,मेनस्विच, ग्लॅण्ड व लग्ज खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३६१.** मा.विश्वस्त, श्री. डॉ.तिवारीसाहेब यांचा दि.२२-०४-२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलकडे राऊंड झाला असता त्यांनी सर्व डॉक्टरांचे कन्सल्टटेशन रुममधून २२ ए.सी. बसविण्याबाबत आदेश दिलेले आहेत. हे ए.सी. पुर्वीच्या कामात नव्हते. त्यामुळे आता या ए.सी.साठी वीजपुरवठा करण्यासाठी सबस्टेशन -जनरेटररूमपासून स्वतंत्र केबल टाकावी लागणार असून उपरोक्त संदर्भीय विषयान्वये श्री साईबाबा हॉस्पिटलच्या प्रस्तावित २२ ए.सी.साठी लागणारी केबल,मेनस्विच, ग्लँड व लग्ज खरेदीसाठी रु.२,८८,६३१.००इतक्या खर्चास मान्यता मिळणेसाठी दिनांक २४-०४-२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेत या प्रस्तावावर चर्चा होऊन श्री साईबाबा हॉस्पिटलच्या प्रस्तावित २२ ए.सी.साठी लागणारी केबल,मेनस्विच, ग्लँड व लग्ज खरेदीसाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार कोटेशन्स मागविण्यात आले असून मुदतीत खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१. | मे.श्रीधर अनंत मुळे , अहमदनगर |
| ०२. | मे.दिपक इलेक्ट्रिकल्स, कोपरगाव |
| ०३. | मे.श्री साई श्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.श्रीधर अनंत मुळे , अहमदनगर | ३,६८,०८५.४८ | ३,६८,०८५.४८ |
| ०२. | मे.दिपक इलेक्ट्रिकल्स, कोपरगाव | ४,३७,१८०.०० | ३,७१,६०३.०० |
| ०३. | मे.श्री साई श्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ३,३६,९७३.४० | ३,३६,९७३.४० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.३ चे निविदासादरकर्ते मे. मे.श्री साई श्रद्धा इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.३६. गादी पाट कापड खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३६२.** चौकशी व निवासस्थान विभागाकडील गाद्या जिर्ण झालेल्या आहेत. याकरिता गादीपाट कापड खरेदी करणे गरजेचे आहे. सध्या चौकशी व निवासस्थान विभागामध्ये ८०० नग गाद्यांचे कापड जीर्ण झालेले आहे व कापूस गोळा झालेल्या ८०० नग गाद्यांसाठी प्रती गादी गादी २०५ मीटर कापड आवश्यक आहे. याकरिता ७२ इंच पन्हा असलेले २००० मीटर कापड खरेदी करावे लागणार असून याकामी रक्कम रुपये ६००/- प्रती मीटर दराने अंदाजे रक्कम रुपये १,२०,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. सदरहू खरेदी करावयाचे कापड वरिल निर्णय क्र.३५४ मध्ये ज्या निविदाधारकाचे दर मान्य होतील त्या निविदासादरकर्त्यांकडून त्या दराने गादीपाट कापड खरेदी करण्यात यावे. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,चौकशी व निवासस्थान विभाग/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३७. लॉण्ड्रीकरिता डिटर्जंट/केमिकल्स खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३६३.** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये निवासस्थाने, साईनाथ रुग्णालय, मंदीर इत्यादी विभागाकडील चादर, बेडशीट, गादीकव्हर, लिनन , ॲप्रन बसेसचे शिट कव्हर, आदी कपडे धुवुन इस्त्री करुन देण्यात येतात. तसेच आता नव्याने सुरु करण्यात आलेल्या श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे कपडे लॉण्ड्रीकडे धुण्यासाठी येत आहेत.याकामी रॅमसन्स कंपनीचे धुलाई मशिन असून गेले २-३ वर्षांपासून जॉन्सन डायव्हर्सी इंडीया प्रा.लि., या उत्पादक कंपनीचे क्लॅक्स १००, बुस्ट, रिन्स, ब्लिचींग लिक्वीड या प्रकारचे केमिकल्स वापरण्यात येत आहेत. सदरचे डिटर्जंट वापरासाठी योग्य असून त्याचा रिझल्ट चांगला आहे.

लॉण्ड्री करिता वार्षिक (कालावधी जुलै,२००६ ते जुन,२००७) खालीलप्रमाणे केमिकल्स/ डिटर्जंट व इंधन (डिझेल) आवश्यक आहेत.

| अ.नं. | तपशील | मागणी | दर रुपये | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | क्लॅक्स-१०० | ७०० कि.ग्रॅम | ९०/- | ६३,०००/- |
| ०२. | बुस्ट | १४०० कि.ग्रॅम | ४५/- | ६३०००/- |
| ०३. | रिन्स | ३५० कि.ग्रॅम | ५०/- | १७,५००/- |
| ०४. | ब्लिचींग | ६६०/- | २२/- | १४,५२०/- |
| | | | एकूण (केमिकल्स/ डिटर्जंट)- | १,५८,०२०/- |
| ०५. | डिझेल | १५०० लिटर | ४०/- | ६०,०००/- |
| | | | एकुण रक्कम रुपये - | २,१८,०२०/- |

उपरोक्तप्रमाणे सर्व केमिकल्स हे एकाचवेळी खरेदी न करता आवश्यकतेप्रमाणे मंजूर दराने तीन टप्प्यात मागविणेत येऊन वापरणेत येईल.

तरी तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे केमिकल्स/डिटर्जंट खरेदीकामी रक्कम रुपये १,५८,०२०/- तसेच लॉण्ड्रीतील बॉयलरसाठी साधारणतः १५०० लिटर्सची आवश्यकता असून त्यासाठी अंदाजे रुपये ६०,०००/- असा एकूण रक्कम रुपये २,१८,०२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी आवश्यक असणारे लॉण्ड्री केमिकल्स/डिटर्जंट जॉन्सस डायव्हर्सी तसेच हिन्दुस्थान लिव्हर/लिव्हर होम कंपनीचे वितरकांकडून दरपत्रके मागवुन खरेदी करुन मिळणेस तसेच परिसरातील पेट्रोलपंपावरुन डिझेल खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,१८,०२०/- (अक्षरी रुपये दोन लाख अठरा हजार वीस) चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान/अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.३८. अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेची क्षमता वाढविणेबाबत.**

**निर्णय क्र.३६४.** संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, Siemens Hipath 4300 IP ही अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स

यंत्रणा मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून माहे ऑगस्ट, २००४ मध्ये खरेदी करुन, कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या आधुनिक दूरध्वनी यंत्रणेमध्ये कॉल बिलींग सॉफ्टवेअर, व्हाईस मेल सिस्टिम, कॉल वेटींग इत्यादी सुविधा आहेत. श्री साईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थानने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या उपक्रमांतर्गत नुकतेच श्री साईबाबा हॉस्पिटल (Super Speciality Hospital) सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर नविन प्रसादालय व श्री साईभक्तांच्या निवासासाठी व्दारावती या भक्तनिवासाचे कामकाजही जोरात सुरु आहे. तसेच विविध विभागांचे कामकाज वाढत असल्याने, त्यांचीही अंतर्गत दूरध्वनींची मागणी वाढत आहे. संस्थानमधील सर्व विभागांची अंतर्गत दूरध्वनींची मागणी पूर्ण करणेसाठी **Siemens Hipath 4300IP** या बसविण्यात आलेल्या अत्याधुनिक दूरध्वनी यंत्रणेची क्षमता आवश्यकतेप्रमाणे वाढविणे गरजेचे आहे.

**(अ) Siemens Hipath ४३००IP** या अत्याधुनिक अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे समाधी मंदिर परिसर, रुग्णालय व धर्मशाळा परिसर, नविन भक्तनिवासस्थान या ठिकाणी तीन एक्सचेंज बसविण्यात आलेले असून, या तीन्ही एक्सचेंजमध्ये एकूण १६ Analog कार्डस् बसविण्यात आले आहेत. या १६ Analog कार्डस्व्दारे प्रत्येक कार्डमध्ये २४ याप्रमाणे एकूण ३८४ अंतर्गत दूरध्वनी जोडण्याची सुविधा उपलब्ध असून, यापैकी ३१६ अंतर्गत दूरध्वनी जोडण्या विविध विभागांना संदेशवहनासाठी देण्यात आलेल्या आहेत. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

०१. **समाधी मंदिर परिसर-** समाधी मंदिर परिसरामध्ये बसविण्यात आलेल्या एक्सचेंजमध्ये ९ Analog कार्ड जोडलेले असून, यामध्ये एकूण २१६ अंतर्गत दूरध्वनी देण्याची सुविधा आहे. आतापर्यंत १९० अंतर्गत दूरध्वनींची जोडणी करण्यात आली आहे.

०२. **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर-** भक्तनिवासस्थान परिसरामध्ये बसविण्यात आलेल्या एक्सचेंजमध्ये ३ Analog कार्डस् जोडलेले असून, यामध्ये एकूण ७२ अंतर्गत दूरध्वनी देण्याची सुविधा आहे. त्यापैकी प्रत्यक्षात ३० दूरध्वनींचा वापर होत आहे. त्यातील ४२ दूरध्वनी जोडण्या रिकाम्या असून, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुल, संस्थान कर्मचारी निवासस्थान आदि. ठिकाणी दळणवळणसाठी अंतर्गत दूरध्वनी देणे बाकी असल्यामुळे रिकाम्या ४२ दुरध्वनी जोडण्यांची भविष्यात याच परिसरात आवश्यकता आहे.

०३. **श्री साईबाबा हॉस्पिटल परिसर-** श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये बसविण्यात आलेल्या एक्सचेंजमध्ये ४ Analog कार्डस् जोडलेले असून, यामध्ये एकूण ९६ अंतर्गत दूरध्वनी देण्याची सुविधा आहे. नव्याने सुरु झालेल्या श्री साईबाबा हॉस्पिटल (सुपर स्पेशालिटी) या ठिकाणी सर्वच्या सर्व ९६ अंतर्गत दूरध्वनी जोडण्यात आले आहेत. हॉस्पिटलमध्ये आणखी काही दूरध्वनी जोडण्यांची मागणी येत आहे. परंतु तेथील एक्सचेंजमध्ये नविन दूरध्वनींसाठी जागा शिल्लक नसल्याने,हॉस्पिटलसाठी आणखी दोन व नविन व्दारावती इमारतीसाठी एक असे एकूण तीन नविन Analog कार्डस् जोडून अंतर्गत दूरध्वनींची सुविधा उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे संस्थानची अंतर्गत दुरध्वनींची गरज पूर्ण होणेसाठी संस्थानने बसविलेल्या Siemens Hipath ४३००IP या अत्याधुनिक दूरध्वनी यंत्रणेची क्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी आणखी तीन नविन Analog कार्डस् खरेदी करण्याची आवश्यकता आहे. खरेदी करावे लागणारे Analog कार्डस् हे सिमेन्स कंपनीकडूनच खरेदी करावे लागणार आहेत. कारण या संदेशवहन यंत्रणेसाठी इतर कंपन्यांचे Analog कार्डस् बसविता येत नाहीत. त्यामुळे या यंत्रणेस अधिकृत सिमेन्स कंपनीचेच कार्डस् वापरावे लागणार आहेत. सिमेन्स कंपनीकडून सदर Analog कार्डचे दरपत्रक मागितले असता, त्यांनी प्रती कार्डची किंमत रुपये ९७,०००/-+ (कर व इतर चार्जेस) असे तीन कार्डस्साठी एकूण रुपये २,९१,०००/- + (कर व इतर चार्जेस) अंतर्भूत संगणक प्रणालीसह एवढा खर्च कळविला आहे.

**(ब) Siemens Hipath ४३००IP** ची बसविण्यात आलेली अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा अहोरात्र चालू असते. ही यंत्रणा चालविणेसाठी दोन ऑपरेटर कन्सोलची सुविधा करण्यात आलेली असून, त्या यंत्रणेवर सध्या तीन पाळयामध्ये दुरध्वनी चालक (Telephone Operators) काम करीत आहेत. अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेवर एक दिवसात (२४ तासात) सरासरी १५०० कॉल्स Outgoing होत आहेत. त्याचप्रमाणे सरासरी ३०००-३५०० कॉल्स Incoming येत आहेत. नव्याने सुरु झालेले श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ९६ अंतर्गत दूरध्वनी जोडण्यात आले आहेत. वापरात असलेले दोन टेलिफोन ऑपरेटर कन्सोल व त्यावर काम करणाऱ्या ऑपरेटरवर दळणवळण वाढल्याने, कामाचा बोजा वाढलेला आहे. संस्थानच्या वाढत चाललेल्या कामकाजाच्या स्वरुपानुसार आणखी नविन तीन Analog कार्डस् जोडल्यावर प्रत्येक कार्डमागे २४ याप्रमाणे आणखी ७२ अंतर्गत दूरध्वनी देण्याची सुविधा उपलब्ध होत आहे. यासर्व कारणास्तव सध्या चालू असलेले दोन टेलिफोन ऑपरेटर कन्सोल कमी पडणार आहेत. त्वरीत व तत्पर सेवा ठेवण्यासाठी आणखी एक टेलिफोन ऑपरेटर कन्सोल वाढविणे आवश्यक आहे. नविन घेण्यात येणारा टेलिफोन ऑपरेटर कन्सोल हाही सिमेन्स कंपनीकडून खरेदी करावा लागणार

आहे. सिमेन्स कंपनीकडून मागविण्यात आलेल्या दरपत्रकाप्रमाणे याची किंमत रुपये ४४,०००/-+(कर व इतर चार्जेस) एवढा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त परिच्छेद **अ आणि ब** मध्ये नमुद केल्याप्रमाणे Siemens Hipath 4300 IP या अत्याधुनिक अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेची क्षमता वाढविणेसाठी तीन Analog कार्डस् व एक टेलिफोन ऑपरेटर कन्सोल सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणारा एकत्रित एकूण खर्च रुपये ३,३५,०००/-+ (कर व इतर चार्जेस) मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

त्याचप्रमाणे रुग्णालयासाठी विशिष्ट नंबर्स असलेला दुरध्वनी मिळणेसाठी भारतीय दुरसंचार निगम यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावे असेही ठरले. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**विषय नं.३९. शैक्षणिक वर्ष २००६-०७ प्रात्यक्षिकासाठीचे कन्झुमेबल मटेरिअल खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३६५.** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नवीन शैक्षणिक वर्ष (१ ऑगस्ट २००६ ते ३१ जुलै,२००७) सुरु होणार आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व व्यवसायाच्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रात्यक्षिकासाठी लागणारे हार्डवेअर मटेरिअल, कटिंग टूल्स, जनरल मटेरिअल, ग्राईंडींग व्हील, वेल्डींग मटेरिअल, रेफ्रिजरेशन व इलेक्ट्रीक मटेरिअल इत्यादी कन्झ्युमेबल मटेरिअल खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५०,०००/- एवढ्या अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी मान्यतेसाठी सादर केला होता. त्याची प्रत सर्व सदस्यांना पुरविणेत येऊन तो सोबत **<u>परिशिष्ट ''ए'' म्हणून</u>** ठेवण्यात आला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी आवश्यक असणारे कन्झ्युमेबल मटेरिअल औ.प्र.संस्थेने विभागांतर्गत पुरवठाधारकांकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५०,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्य,आयटीआय)

**विषय नं.४०. शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी गणवेश व ॲप्रॉन तसेच प्रशिक्षणार्थ्यांसाठी गणवेश,कार्यशाळा गणवेश व स्टेशनरी खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.३६६.** श्री साईबाबा औद्योगिक्र प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थी यांना दरवर्षी संस्थेमार्फत प्रिंटेड स्टेशनरी व डांगरी तसेच मुलींनसाठी ॲप्रान देण्यात येतात. औ.प्र.केंद्रात एकुण १० ट्रेडच्या प्रत्येकी ०२ युनीट प्रमाणे २० युनीट आहेत. कार्यशाळेत प्रात्यक्षिकामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना शर्ट व पँट जोडुन असलेली डांगरी दिली जाते. तथापी त्या ऐवजी सोईच्या दृष्टीने व प्रशिक्षणार्थ्यांची सेल्फं इमेज उंचावण्यासाठी औद्योगिक अस्थापनांप्रमाणे गणवेश देणे श्रेयस्कर वाटते. मुलींसाठी सलवार कुर्ता ओढणी असा गणवेश असेल. प्रशिक्षणार्थी तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | ट्रेडचे नांव | युनीट | मंजूरी प्रशिक्षणार्थी प्रवेश | सुपरन्युमरी शिट प्रवेश | एकुण प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | इलेक्ट्रीशियन | ०२ | ३२ | ०६ | ३८ |
| ०२ | मोटर मेकॅनीक | ०२ | ३२ | ०६ | ३८ |
| ०३ | ट्रॅक्टर मेकॅनीक | ०२ | ३२ | ०६ | ३८ |
| ०४ | टुल ॲण्ड डाय मेकर | ०२ | ३२ | ०६ | ३७ |
| ०५ | एम.आर.एसी. | ०२ | ३२ | ०६ | ३८ |
| ०६ | फिटर | ०२ | ३२ | ०६ | ३८ |
| ०७ | वेल्डर | ०२ | २४ | ०४ | २८ |
| ०८ | टर्नर | ०२ | २४ | ०४ | २८ |
| ०९ | एम.जी.आर. | ०२ | २४ | ०४ | २८ |
| १० | आय.टी.ई.एस.एम. | ०२ | ३२ | ०६ | ३८ |
| | | एकुण प्रशिक्षणार्थी संख्या... ३४९ | | | |

वरील प्रमाणे प्रशिक्षणार्थी संख्येत ३५० गृहीत धरुन स्टेशनरी कार्यशाळा गणवेश व प्रशिक्षणार्थी गणवेश खरेदी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**अ) <u>प्रशिक्षणार्थी स्टेशनरी :-</u>**

| अ.क्र. | स्टेशनरी तपशिल | आवश्यकता | उपलब्ध | खरेदी आवश्यकता | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जॉबशिट वही १५० पानी लेजर साईज कागद, ७० जीएसएम दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग (छपाई नमुन्या प्रमाणे ) ३४ X २१ सें.मि. | ४०० नग | | ४०० नग | ५०/- | २००००.०० |
| ०२ | थेअरी रजिष्टर २०० पानी लेजर कागद ७० जीएसएम ,३४X२१ से.मि. लेजर बायडींग ( नमुन्या प्रमाणे ) | ५०० पॅड | | ५०० पॅड | ३५/- | १७५००.०० |
| ०३ | दैनंदिनी छापील ६० पेजेस(नमुन्याप्रमाणे) | ३५० नग | | ३५० नग | १०/- | ३५००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सनशईन पेपर ७० जीएसएम | | | | | |
| ०४ | २ क्वायर रजिष्टर ३४X२१ से.मि. ( नमुन्या प्रमाणे ) | ४०० नग | ४२५ नग | | २०/- | ........... |
| ०५ | ड्रॉईंग १/४ इंपेरीयल रजिष्टर ५० शिटचे एक रजिष्टर सनशाईन कागद ५६X३६ से.मि. ( कागद व छपाई नमुन्याप्रमाणे) | ४०० सेट | | ४०० सेट | ५०/- | २००००.०० |
| ०६ | सेट स्क्वेअर ओमेगा कंपनी ४५ व ६० अंश | २१० पेअर | १३५ पेअर | ७५ पेअर | २५/- | १८७५.०० |
| | एकुण रक्कम ............... | | | | | ६२८७५.०० |

वरील प्रमाणे प्रशिक्षणार्थी स्टेशनरी खरेदीकामी रक्कम रु.-६२८७५.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

**ब) गणवेश -**

| अ.क्र. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिक्षक कर्मचारी गणवेश व टाय दोन नग | ३२ | ६४ नग | १०००/- | ६४०००.०० |
| ०२ | कार्यशाळा ॲप्रॉन शिक्षकांसाठी | ३० | ३० | १५०/- | ४५००.०० |
| ०३ | प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेश | ३५० | ३३५ | ४००/- | १३४०००.०० |
| ०४ | प्रशिक्षणार्थी नियमित गणवेश | ३५० | ३३५ | ४००/- | १३४०००.०० |
| ०५ | मुलींसाठी ॲप्रॉन | ४० | १५ | १२५/- | १८७५.०० |
| ०६ | मुलींसाठी सलवार कुर्ता व ओढणी | ४० | १५ | ३५०/- | ५२५०.०० |
| | | एकुण रक्कम रुपये | | | ३४३६२५.०० |

प्रशिक्षणार्थ्याकडून आपण प्रतिवर्षी प्रत्येकी रूपये-१५००/-प्रशिक्षण शुल्क घेतो व अनामत रक्कम रूपये-३००/- घेत होतो.या वर्षीपासुन प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थ्याकडून अनामत रक्कम रूपये-५०००/- घेण्यास व्यवस्थापन समितीने मान्यता दिली आहे.

सत्र ऑगष्ट-२००६ ते जुलै २००७ साठी (अ) स्टेशनरी खर्च रक्कम रुपये ६२८७५/-अपेक्षित आहे.(ब) गणवेश खर्च रक्कम रु. ३४३६२५/-अपेक्षित आहे. वरील पैकी ब मधिल अ.क्र.-०४ व ०६ प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष मागील वर्षीपर्यत प्रशिक्षणार्थी स्वतःखर्चाने घेत होते. या वर्षीपासुन संस्थान मार्फत देणेत यावे सदरहू खरेदीकामी औ.प्र.संस्थेमार्फत कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रशिक्षणार्थ्याचे गणवेश संस्थानमार्फत तुर्त देण्यात येऊ नये. तसेच उर्वरित स्टेशनरी व इतर साहित्य नेहमीच्या पद्धतीप्रमाणे खरेदी करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं.४१. श्री.नंदु कोळपकर,रा.शिर्डी, यांना लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर गाळा मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.३६७.** नवीन भक्तनिवासस्थान इमारतीचे गाळ्यांपैकी गाळा नं.०६ प्रोव्हीजन स्टोअर्स या सुविधेसाठी श्री.नंदू गणपत कोळपकर यांना "लिव्ह ॲण्ड लायन्सेन्स" पध्दतीने ०२ वर्ष मुदतीसाठी देण्यात आलेला आहे. सदर गाळ्याच्या परवान्याची मुदत दिनांक १२.०६.२००६ अखेर संपत आहे.

श्री.कोळपकर यांनी यांचे दिनांक ९.५.२००६ चे पत्रान्वये मागीलवेळी गाळा दि. १३.४.२००४ पासून दि.१२.६.२००६ पर्यंत दोन वर्षांसाठी देण्यात आलेला आहे. सन १९९६ ते २००१ पर्यंत साईभक्तांना या गाळ्याद्वारे सेवा पुरविली जात होती. परंतू सदर भक्तनिवासमध्ये दुकानांची संख्या वाढलेली आहे. या गाळ्या शेजारील गेट जे पूर्वी उघडे होते ते बंद आहे. सदर परवाना फी इतर गाळ्यांच्या तुलनेने फारच जास्त आहे. सन १९९६ पासून प्रोव्हीजन स्टोअर्स या माध्यमातुन साईभक्तांना कुठल्याही प्रकारची तक्रार नसता उत्तम सेवा दिलेली आहे व यापुढेही देत राहील. या सर्व बाबी विचारात घेता परवाना फी रुपये १५००/- पर्यंत करण्याचा विचार करण्यात यावा व अनामत रक्कम रुपये १.२५ लाख आहेच तसेच नुतनीकरण दोन वर्षाऐवजी तीन वर्षांसाठी असावे अशी विनंती केलेली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांना या सुविधेची आवश्यकता असल्याने परवाना फी रकमेत कोणतीही भाडे वाढ न करता पूर्वीचेच मासिक परवाना फी रक्कम रुपये ४२५९/- इतकीच मात्र व मीटर रिडिंगप्रमाणे विद्युत बील वेगळे तसेच इतर अटी व शर्ती पुर्वीप्रमाणेच ठेवून एक वर्षाकरिता "लिव्ह ॲण्ड लायन्सेन्स" तत्वावर मुदतवाढ देण्यात यावी असें ठरलें. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४२. संजीवनी प्री कॅडेट ट्रेनिंग सेंटर, कोपरगाव, शिधा मदतीबाबत.**

**निर्णय क्र.३६८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४३. श्रीक्षेत्र तुळजापूर व श्रीक्षेत्र पंढरपूर या देवस्थानांना शासन मान्यतेनुसार आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.३६९.** अध्यक्ष,श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर समिती,पंढरपूर यांनी त्यांचे दि.१३/०२/२००६ चे पत्रान्वये श्री संत तुकाराम भवनाचे काम मंदिर समितीने हाती घेतलेले आहे. प्रस्तुत इमारतीचे तळमजल्याचे काम केलेले आहे. उर्वरित बांधकाम व अन्य साहित्य,फर्निचर,विद्युतीकरण इत्यादिसाठी रु.१,१०,२१,०४७/- निधीची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | उर्वरित बांधकामाचा अंदाजीत खर्च - | ६३,५१,०४७/- |
| ०२ | अन्नछत्रासाठी लागणारे साहित्य - | १,८०,०००/- |
| ०३ | दवाखाना व ग्रंथालय फर्निचर | ५,००,०००/- |
| ०४ | ग्रंथालयासाठी ग्रंथ खरेदी करणे - | १,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ०५ | विद्युतीकरण करणे - | १५,००,०००/- |
| ०६ | लिफ्ट खर्च - | ५,००,०००/- |
| ०७ | बहुउद्देशीय हॉलमधील खुर्च्या - | ७,५०,०००/- |
| ०८ | हॉलमधील डेकोरेशन व ध्वनी नियंत्रण व्यवस्था - | ३,००,०००/- |
| ०९ | पुढील बाजुचे स्ट्रक्चरल ग्लिजींग खर्च - | १,५०,०००/- |
| १० | अल्युमिनीएशन पार्टीशन खर्च - | १,००,०००/- |
| ११ | संत तुकारामचे जिवणावरील ग्लास प्युरल खर्च - | १,००,०००/- |
| १२ | बाहेरील बाजुचे डेकोरेटीव्ह काम खर्च | ५,००,०००/- |
| | एकूण रुपये | १,१०,३१,०४७/- |

वरील सुविधा उपलब्ध करुन देणेकामी श्री साईबाबा संस्थान मार्फत निधी उपलब्ध होऊन मिळावा, अशी विनंती केलेली आहे.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष श्री तुळजा भवानी संस्थान तुळजापुर यांनी त्यांचे दि.०६/०२/२००६ चे पत्रान्वये मंदिरास दर्शनास्तव भेट देणा-या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून श्री तुळजा भवानी मंदिर संस्थान तुळजापूरच्या वतीने त्यांना दर्शन अधिक सुलभ व्हावे व अन्य सोयी सूविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने मंदिर ट्रस्ट मार्फत विविध विकास प्रकल्प प्रस्तावीत कले आहेत.

अ) दर्शन मंडप- १००X७० फुट आकाराचा चार मजली दर्शन मंडप, अभिषेक,मुखदर्शन व धर्मदर्शन अशा सर्व सोयींनी युक्त खर्च - रु.६४,००,०००/-

ब) श्री कल्लोळ तिर्थ नुतनीकरण - तिर्थात प्रवेश करण्यासाठी एकच गेट असल्याने भक्तांना प्रवेश करणे किंवा बाहेर पडणे त्रास होतो म्हणून नव्याने एक गेटचे बांधकाम - रु.१,०८,८७७/-

क) सँड ब्लास्टींग - श्री तुळजाभवानी मंदिराचे भिंती , शंकर सभामंडपाच्या भिंती व मंदिर परिसरातील भिंती - रु.२,५०,०००/-

ड) श्री तुळजाभवानी मंदिरातुन नव्याने केलेला बाहेर पडण्याचा मार्ग मातंग मंदिराजवळुन जातो. मातंगी मंदिराजवळ अत्यंत कमी जागा आहे. मंदिरातुन बाहेर पडणा-या लोकांना मातंगी मंदिरापाशी रस्ता मोठा करुन मातंगी मंदिराचे नुतनीकरण करणे - रु.५,००,०००/-

ई) धार्मिक कार्यालयालगत भुमिगत मार्ग - मंदिर परिसात दर्शनरांगेमुळे अत्यंत गर्दी होते. म्हणून भुमिगत मार्गाचे बांधकाम करणे-२८,००,०००/-

ई) सैनिक शाळा इमारत बांधकाम - श्री तुळजाभवानी अभियांत्रीकी महाविद्यालयाशेजारी बांधकाम करण्याचे प्रस्तावीत आहे. - रु.५४,३०,२३६/-

उ) उद्यान परिसर सुशोभिकरण- घाटशील,पापनाश,व मंदिर पश्चिमेकडील परिसरात उद्यान सुशोभिकरण करणे - रु.२०,००,०००/- एकुण खर्च रु.१,७४,८९,११३/- खर्च होणार आहे.

तरी वरील कामासाठी एकूण रुपये १ कोटीची मदत संस्थानकडून मिळावी अशी विनंती केलेली आहे.

यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०३/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६२ अन्वये "महाराष्ट्राचे दैवत असलेले श्रीक्षेत्र पंढरपूर व श्रीक्षेत्र तुळजापूर हे तिर्थक्षेत्र अत्यंत अल्प उत्पन्न असलेली असल्याने त्यांना त्यांचे देवस्थानांचा व गावाचा विकास करता येत नाही. याकरिता या देवस्थानांना त्यांचा विकास करणेसाठी श्रीक्षेत्र पंढरपुर व श्रीक्षेत्र तुळजापुर यांना प्रत्येकी रुपये १ कोटी मदत देण्यात यावी, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी." असा पारित झालेला आहे.

यास अनुसरुन जा.नं.वशी-३/४७६२/२००६, दि.११/०४/२००६ अन्वये श्रीक्षेत्र पंढरपुर व तुळजापुर यांचे प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविले असता विधी व न्याय विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.संकिर्ण २००५/६४१/ (८६)/ का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.०५ मे २००६ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

शासन निर्णय :- "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या विश्वस्तनिधीतून महाराष्ट्राचे अराध्य दैवत असलेले व सामान्य लोकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर,पंढरपूर, जि.सोलापूर व श्री तुळजा भवानी संस्थान,तुळजापूर जि.उस्मानाबाद या दोन देवालयांना त्यांच्या विकासकामांकरीता प्रत्येकी रुपये एक कोटी असे एकूण रुपये दोन कोटी अर्थ सहाय्य करण्यास एक विशेष बाब म्हणून शासन मंजुरी देत आहे.

कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना कळविण्यात येते की, सदर बाबीकरिता येणारा खर्च सन २००६-२००७ च्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था निधीतुन करण्यात यावा. तसेच उपरोक्त देवस्थानांना सदर निधी कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात यावा व त्यांना अदा करण्यात आलेल्या निधीचे उपयोजन प्रमाणपत्र तपशिलासह प्राप्त करुन त्याची प्रत शासनास सादर करावी."

तरी उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीविठ्ठल रुख्मिणी मंदीर समिती, पंढरपुर यांचेकडील प्रस्तावित काम पूर्ण झालेले असल्यास त्यांचेकडून तसे प्रमाणपत्र घेऊन, दिनांक ७.७.२००६ रोजी येत्या आषाढी एकादशीच्या दिवशी त्यांना रक्कम अदा करावी. तसेच श्रीतुळजा भवानी संस्थान, तुळजापुर यांना आवश्यक ती पूर्तता झालेनंतर रक्कम अदा करावी, असें ठरलें. (कार्यवाही -प्रशासन शाखा, वशी-०३)

**विषय नं.४४. ॲड.प्रशांत बावके, ॲड.एस.डी.कुलकर्णी, ॲड.मिलींद गुजराथी, ॲड.आर.एस.जपे यांच्या संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका होणेबाबत.**

**निर्णय क्र.३७०.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी,फौजदारी,तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत. सदरचे कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने खालील प्रमाणे ॲडव्होकेटस् च्या ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**०१) कोपरगांव कोर्ट :-**सर्वश्री.ॲड.,पी.डी.गुजराथी, डी.डी.कुलकर्णी, डी.व्ही. वझे, जे.के.गोंदकर, रमेशचंद्र ठोळे, श्री. एस.एम.वाघ,राजेश नाईक,बाळासाहेब कोते (विनामोबदला)

**०२) अहमदनगर कोर्ट :-** सर्वश्री.ॲड.अशोक पाटील, एन.जी.तांबोळी, ए.आर.गाडेकर,प्रसन्ना बिंगी,संजय सलालकर,अविनाश बोठे

**०३) मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद ) :-** सर्वश्री. ॲड. आर.एन.धोर्डे, अनिल बजाज, विनायक होन,राजेंद्र रघुवंशी,नितीन भवर, बाबासाहेब वाघ,संदीप गोंदकर,

**०४) मुंबई हायकोर्ट :-** सर्वश्री ॲड.कुलदिप एस.पाटील, ॲड.विनोद शहा (करीया), मुंबई आता,ॲड.प्रशांत बी.बावके,साकुरी, ॲड. मिलींद पी.गुजराथी, कोपरगांव, ॲड. संजीव डी.कुलकर्णी तसेच ॲड.आर.एस.जपे कोपरगांव यांनी अर्ज सादर करुन वरिल प्रमाणेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधात न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत विनंती केलेली असून सदर अर्जावर विधी विभाग यांनी "श्री मिलींब पी.गुजराथी हे कोपरगांव कोर्टात वकीली व्यावसाय करीत असून, संस्थानचे पॅनॉलवरील ॲड.श्री पी.गुजराथी यांचे ऑफीसमध्ये कामकाज पहात आहेत. बऱ्याच वेळा त्यांचे सहकार्य झालेले आहे. व त्यांना कोर्ट कामकाजाची माहिती आहे. त्यांना पॅनॉलवर घेणे उचित होईल. त्यांचेबरोबर श्री संजीव डी.कुलकर्णी ॲडव्होकेट हे संस्थानचे ॲडव्होकेट पॅनवर असलेले श्री डी.डी कुलकर्णी ॲडव्होकेट यांचे ऑफिसला काम करणारे ॲडव्होकेट आहे. त्यांचेही मार्गदर्शन घेण्यात येत. त्यांनाही पॅनॉलवर घेता येईल" असे अभिप्राय दिलेले आहे.

तरी विधी विभाग यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता, ॲड. मिलींद पी.गुजराथी, कोपरगांव, ॲड. संजीव डी.कुलकर्णी यांची तसेच ॲड.प्रशांत बी.बावके व ॲड.आर.एस.जपे कोपरगांव यांच्या वरिल प्रमाणेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधीत न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूकीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस मा.विश्वस्त श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी ॲडव्होकेट श्री.मच्छिंद्र सुकदेव खिल्लारी, कोपरगाव यांचीही पॅनेलवर नेमणूक व्हावी अशी केलेली विनंती मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४५. अ) डॉ.दिपक सिंग सरदार, वैद्यकीय अधिकारी (जनरल ड्युटी),डॉ.अभय वसंत अनुरकर (भूल तज्ञ), डॉ.अमोल रविद्र हरताळकर, (जनरल मेडिसिन), डॉ.विलास नामदेव कुरुडे (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ) यांना यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**ब) कु.संगिता मुरलीधर अंदुरेकर, पुर्णवेळ सहाय्यक शिक्षिका (माहिती तंत्रज्ञान) यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.३७१.** अ) डॉ.दिपकसिंग सरदार,यांची वैद्यकीय अधिकारी (जनरल डयुटी) या पदावर रु.८,०००-१३,५०० या वेतनश्रेणीत, डॉ.अमोल रविंद्र हरताळकर यांची वैद्यकीय अधिकारी (जनरल मेडीसिन) व डॉ.विलास नामदेव कुरुडे,वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) यांची रु.१०,०००-१५,२०० या वेतनश्रेणीत संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात एक वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.त्यांचेबाबतचा सर्वसाधारण तपशील खालील प्रमाणे

| अनं. | कर्मचाऱ्यांचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | वेद्यकीय पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ.दिपकसिंग सरदार वै.अधिकारी (जनरल डयुटी) | एम.बी.बी.एस | ०१/०४/२००५ | ३१/०३/२००६ | दि.१२/०७/२००५चे दाखल्यानुसार पात्र |
| २. | डॉ.अमोल र.हरताळकर वै.अधिकारी (जनरल मेडीसिन) | एम.डी. (मेडीसिन) | १८/०६/२००५ | १७/०६/२००६ | दि.०८/०७/२००५चे दाखल्यानुसार पात्र |
| ३. | डॉ.विलास नामदेव कुरुडे (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) | एम.डी. (स्त्रीरोग व प्रसुती) | ३०/०६/२००५ | २९/०६/२००६ | दि.०८/०७/२००५चे दाखल्यानुसार पात्र |

उपरोक्त अ.नं.०१ ते ०३ वरिल वैद्यकीय अधिकारी यांचे काम तसेच त्यांची वर्तणूक समाधानकारक आहे.त्यांचे बाबत कोणतेही प्रकरण चालू अथवा प्रस्तावीत नसून त्यांना संस्थान सेवेत

कायम करण्यास हरकत नाही.असे अभिप्राय वैद्यकीय अधिक्षिका व प्रशासकीय अधिकारी रुग्णालये यांनी दिलेले आहेत.

वैद्यकीय अधिक्षिका व प्रशासकीय अधिकारी,रुग्णालये यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेता, डॉ.दिपकसिंग सरदार,यांना दि.०१/०४/२००६ पासून, तसेच डॉ.अमोल रविंद्र हरताळकर यांना वैद्यकीय अधिकारी (जनरल मेडीसिन) या पदावर दि.१८/०६/२००६ पासून व डॉ.विलास नामदेव कुरुडे,यांना वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीतज्ञ) या पदावर दि.३०/०६/२००६ पासून संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही असे मत आहे.

तसेच.....

ब) कु.संगिता मुरलीधर अंदुरेकर,यांची पुर्णवेळ सहा.शिक्षिका (माहिती तंत्रज्ञान) या पदावर श्री साईबाबा कन्या विद्यामंदिराकडे रु.७२२५-११०५० या वेतनश्रेणीमध्ये दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी त्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.त्यांचा सर्वसाधारण तपशील खालील प्रमाणे.

| अनं. | कर्मचाऱ्यांचे नांव व हुद्दा | शिक्षण | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | वैद्यकीय पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| १. | कु.संगिता मुरलीधर अंदुरेकर पुर्णवेळ सहा.शिक्षिका (माहिती तंत्रज्ञान) | एम.एस्सी. (कॉम्पु.सायन्स) | ०१/०७/२००४ | ३०/०६/२००६ | दि.१८/०८/२००४चे दाखल्यानुसार पात्र |

कु.अंदुरेकर सहाय्यक शिक्षिका यांना संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.असे अभिप्राय मुख्याध्यापिका श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर व प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेले आहेत.

दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स,कंडीशन्स ऑफ सर्व्हीस रेग्युलेशन ॲक्ट,१९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ मध्ये कायम करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

CERTAIN OBLIGATIONS OF MANAGEMENT OF PRIVATE SCHOOL.

(2) Every person appointed to fill a permanent vacancy shall be on probation for a period of two years. Subject to the provisions of sub sections on (3) & (4) he shall,on completion of this probation period of two years,be deemed to have been confirmed.

(3) if in the opinion of the Management, the work or behaviour of any probationer during the period of his probation,is not satisfactory, the Managment may terminate his services at any time during the said period after giving him one month's notice (or salary of one month in lieu of notice.)

उपरोक्त नियमातील तरतूद व मुख्याध्यापिका, श्रीसाईबाबा कन्या विद्यामंदिर तसेच प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेता,उपरोक्त कु.संगिता मुरलीधर अंदुरेकर,पुर्णवेळ सहा.शिक्षिका (माहिती तंत्रज्ञान) यांना दि.०१/०७/२००६ पासून संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त "अ" व "ब" प्रस्तावास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.४६. श्री.सुरेंद्रकुमार पाण्डे, अकौंटंट यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.३७२.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०३/२००६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/२२८९/२००६ दि.१७/०२/२००६ अन्वये श्री सुरेंद्रकुमार पांडे यांची एकत्रीत रु.५,०००/- मात्रचे मानधनावर सहा महिन्यांकरीता अकौटंट या पदावरा श्री साईबाबा हॉस्पीटलकडे तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०४/११/२००५ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

त्यांची सदरची मुदत दि.०३/०५/२००६ अखेर संपुष्टात आलेली असून त्यांनी दि.२/०५/२००६ रोजी अर्ज करुन त्यात," I am working in Shri Saibaba Hospital as a Accountant since 3rd Nov.2005. As per my appointment order no ws-1/2289/2006 my post was on temporary basis getting discontinued on 3rd May 2006 I would like to continue my services in the Shri Saibaba Hospital and hence.I would be highly obliged if you give me as opportunity to do so.Kindly consider my application for regularization of my service." अशी विनंती केलेली असून त्यावर ,"सदर कर्मचाऱ्याचे काम समाधानकारक आहे व त्यांना मुदतवाढ देण्यात हरकत नाही." असे अभिप्राय वैद्यकीय प्रशासक रुग्णालये यांनी दिलेले आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री पांडे यांनी केलेली विनंती व त्यावरील वरिष्ठ प्रशासक रुग्णालये यांचे अभिप्राय विचारात घेवून श्री सुरेंद्रकुमार पांडे यांची मुदत त्यांना दि.१७/०२/२००६ रोजी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीस अनुसरुन दि.०४/०५/२००६ पासून पुढे सहा महिन्यासाठी वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४७. डॉ.स्नेहल कोठारी (भूलतज्ञ) यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३७३.** डॉ.स्नेहल एन.कोठारी,एम.बी.बी.एस.डी.ए.मु.पो.आश्वी यांनी दि.०६/०५/२००६ रोजी रुग्णालयाकडे अर्ज सादर करुन (भूलतज्ञ) या पदावर नोकरी मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.त्यावर

वैद्यकीय अधिक्षिका,श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.०८/०५/२००६ रोजी टिपणी सादर करुन त्यात," श्री साईनाथ रुग्णालयात भूलतज्ञांची ०४ पदे मंजूर असून ०३ पदे भरलेली होती.व ०१ पद रिक्त होते.डॉ.सोनिया नायक (भूलतज्ञ) यांनी त्यांचे दिनांक ३०/११/२००५ रोजी त्यांचे पदाचा राजीनामा दिलेने श्री साईनाथ रुग्णालयात भूलतज्ञांची ०२ पदे रिक्त आहेत.सध्या श्री साईनाथ रुग्णालयात ऑपरेशन थिएटरमध्ये खालील प्रमाणे वैद्यकीय अधिकारी (भूलतज्ञ ) कार्यरत आहेत.

०१. डॉ.मृणालिनी गोंदकर, ०२. डॉ.अभय अनुरकर ०३. डॉ.सचिन खोचीकर, पैकी डॉ.सचिन खोचीकर यांची नेमणूक श्री साईबाबा हॉस्पीटलकडे झालेली आहे.परंतु सध्या ते श्री साईनाथ रुग्णालयाकडे काम करतात.श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु झालेवर डॉ.सचिन खोचीकर यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे पाठवावे लागेल.सध्या रुग्णालयात दररोज २५ ते ३० ऑपरेशन होतात.ऑपरेशन थिएटरमध्ये ०६ टेबल आहेत.भूलतज्ञ यांची कमतरता असलेने बाहेरील भूलतज्ञ बोलविण्यात येतात.श्री साईनाथ रुग्णालयात ऑपरेशनची संख्या दिवसें दिवस वाढत असलेने भूलतज्ञाची आवश्यकता भासत आहे.

डॉ.स्नेहल एन.कोठारी रा.आश्वी हे श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा गांधी इंन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स,सेवाग्राम (वर्धा ) यांचे मार्फत दि.२८/०१/२००२ ते दि.१८/१२/२००३ अखेर आर.एम.ओ.म्हणून कार्यरत होते.व त्यांना आपले रुग्णालयाचे गरजेनुसार सेवेत घेता येऊ शकते.डॉ.स्नेहल कोठारी यांनी Diploma in Anesthesia पास केले असून त्यांना श्री साईबाबांची सेवा करण्याची इच्छा आहे.सदर शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र तपासणी करुन डॉ.कोठारी यांना भूलतज्ञाचे काम देता येईल.

डॉ.स्नेहल एन.कोठारी यांना घेणेबाबत मा.विश्वस्त सौ.डॉ.एकनाथराव बी.गोंदकर यांनी दि.०७/०५/२००६ चे शिफारस पत्रान्वये कळविले आहे.तरी डॉ.कोठारी यांना भूलतज्ञ म्हणून श्री साईनाथ रुग्णालयात मानधन तत्वावर रु.१८,०००/- घेणेस मर्जीनुरुप आदेश होणेस विनंती आहे." असे नमूद केलले असून त्यावर प्रशासकीय अधिकारी (रुग्णालय) यांनी भूलतज्ञांची अत्यंत आवश्यकता आहे.तरी मान्यता असावी.व्यवस्थापन मंडळाची कार्योत्तर मान्यता घेणेत येईल." असे अभिप्राय दिलेले आहे.(डिप्लोमा सर्टीफिकेट येणे आहे.)

श्री साईनाथ रुग्णालय १९९९ चे आकृतीबंधानुसार रुग्णालयाकडे भूलतज्ञांची ०४ पदे मंजूर आहेत पैकी सध्या ०२ पदे रिक्त आहेत.वैद्यकीय अधिक्षिका यांची मागणी ,कामाची निकड, व प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेवून जा.नं.एसएसएस/वशी-०१/७५/२००६ दि.०७/०१/२००६ रोजीचे आदेशानुसार (एम.बी.बी.एस. व त्यापुढील पदवीकाधारकास) डॉ.स्नेहल एन. कोठारी,एम.बी.बी.एस. डी.ए.आश्वी यांची प्रतिमहा रु.१८,०००/- (अक्षरी रु.अठरा हजार) मात्र मानधनावर डिप्लोमा सर्टिफिकेट जमा करणेचे अटीवर जा.नं.एसएसएस/वशी-०१/६४९२/२००६ दि.२०/०५/२००६ अन्वये करण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४८.** **डॉ.के.एन.टिंगरे, मेडिकल डायरेक्टर, डेप्यूटी मेडिकल डायरेक्टर व इतर वैद्यकीय अधिकारी यांच्या मासिक मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.३७४.** श्री साईबाबा हॉस्पीटल सुरु होत असून निवड झालेल्या उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात येत आहे.सदर हॉस्पीटलसाठी तयार केलेल्या कर्मचारी आकृतीबंधास शासनाची मान्यता येईपर्यंत मानधन तत्वावर घेण्याचे दि.०५/११/२००५ रोजीच्या सभेत निर्णय क्र.६६७ नुसार ठरले आहे.त्यानुसार सध्या रुजु होणारे वैद्यकीय अधिकारी,तंत्रज्ञ व कर्मचारी यांना एकत्रीत दरमहा मानधन स्वरुपात नेमणूक आदेश देण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी आवश्यक असलेला वैद्यकीय अधिकारी /पॅरामेडीकल स्टाफबाबतचा पॅटर्न पदनिहाय वेतनश्रेणीसह इत्यादीबाबी नमूद करुन शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या पुढे मुलाखती झालेल्या खालील वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडीकल स्टॉफला नेमणूक आदेश देण्यात आलेले असून त्यांना द्यावयाचे वेतन / मानधन हे ठरलेले नाही.

तथापी श्री साईबाबा हॉस्पीटल साठी कर्मचारी नेमणूकीबाबत प्रस्तावीत पदनिहाय वेतनश्रेणी वेतनश्रेणी व दरमहा तसेच वार्षीक अर्थिक बोजा नमूद करुन मा.विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविलेला असून सदरचा प्रस्तावित आकृतीबंध मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर केला होता. त्यावेळी श्री साईबाबा रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिकारी, तंत्रज्ञ व इतर स्टाफ नेमणूका इत्यादी बाबत सविस्तर चर्चा होऊन याकामी सल्ला देण्यासाठी डॉ. आगाशे,श्रीरामपूर ,डॉ.कांडेकर अहमदनगर,डॉ. प्रदिप पवार नाशिक, डॉ. बी. सदानंद, प्रवरा मेडीकल कॉलेज विळदघाट,अ.नगर डॉ.वसंत कटारिया अहमदनगर व स्थानिक सदस्यांची सुकाणू समिती स्थापन करण्यात आली.

दि.२४/०४/२००६ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीतून नियुक्तीसाठी निवड करण्यात आलेल्या खालील वैद्यकिय संचालक व इतर वैद्यकिय अधिकारी तसेच पॅरामेडीकल स्टॉफला फक्त हजर होणेकामी नेमणूक पत्र देण्यात आलेली आहेत.शासन मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधामध्ये खालील पदांसाठी वेतनश्रेणी व दरमहाचे एकूण वेतन प्रस्तावीत केले आहे.

| अ.नं. | नांव व पदनांम | हजर तारीख | प्रस्तावीत आकृतीबंधानुसार वेतनश्रेणी व वेतन |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ.के.एन.टिंगरे,<br>वैद्यकीय संचालक | दि.०३/०५/२००६. | रु.१२०००-३७५-१६५०० (०४ वेतनवाढीसह)<br>प्रतिमहा एकूण देय रक्कम रु.३४,२२३/- |
| ०२. | डॉ.आर.पी.पाटील<br>सहा. वैद्यकीय संचालक | ----- | रु.१२०००-३७५-१६५००<br>प्रतिमहा एकूण देय रक्कम रु.३०,४२०/- |
| ०३. | डॉ.संजय खुराना<br>आर्थोपेडीक सर्जन | दि.१७/०४/२००६. | रु.१००००-३२५-११५२०० (०५ वेतनवाढीसह)<br>प्रतिमहा एकूण देय रक्कम रु.२९,४७१/- |
| ०४. | डॉ.मंगेश तरटे<br>ज्यु.रेडीओलॉजीस्ट | दि.१४/०४/२००६ | रु.१००००-३२५-१५२००<br>प्रतिमहा एकूण देय रक्कम रु.२५,३५०/- |
| ०५. | डॉ.पुजा मिश्रा, क्लिनिकल असि.<br>(Gyan &Obst.) | दि.२२/०४/२००६. | रु.१००००-३२५-१५२००<br>प्रतिमहा एकूण देय रक्कम रु.२५,३५०/- |
| ०६. | डॉ.एस.एस.करमरकर<br>प्लॅस्टीक सर्जन | दि.०९/०५/२००६. | रु.१००००-३२५-१५२०० ( ५ वेतनवाढीसह)<br>प्रतिमहा एकूण देय रक्कम रु.२९,४७१/- |
| ०७. | श्रीमती थोरात मंदा संजय<br>सहाय्यक अधिसेविका | दि.०६/०५/२००६. | रु.५५००-१७५-९००० (३ वेतनवाढीसह)<br>प्रतिमहा एकूण देय रक्कम रु.१२,३३६/- |

पैकी वैद्यकीय संचालक डॉ.टिंगरे यांनी त्यांचे दि.१६/०५/२००६ चे अर्जान्वये न्युरो सर्जरीचा अनुभव, १० वेतनवाढी एम.एस.सुपरस्पेशालिटी पदवीसाठी दोन वेतनवाढी व एल.एल.बी. कायद्याचे पदवीबद्दल दोन वेतनवाढी इत्यादीचा वेतननिश्चितीसाठी विचार व्हावा असे नमूद केलेले आहे.याबाबत इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांना रु.१०,०००-३२५-१५,२०० ही वेतनश्रेणी असून वैद्यकीय संचालकासाठी रु.१२,०००-३७५-१६,५०० हि उच्च वेतनश्रेणी असून शासनास आकृतीबंध सादर करतांना ४ वेतनवाढी देऊ केलेल्या आहेत.

तसेच श्रीमती मंदा संजय थोरात सहा.अधिसेविका संस्थान सेवेत असून साईनाथ रुग्णालयाकडे रु.५०००-८००० वेतनश्रेणीमध्ये परिचारीका म्हणून कार्यरत असून त्यांचे सध्याचे मूळवेतन रु.६२००/- आहे.त्यांचे नवीन रु.५५००-१७५-९००० वेतनश्रेणीमध्ये नियमानुसार वेतन निश्चित करावे लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.टिंगरे यांना रुपये ३५,०००/-, डॉ.आर.पी.पाटील यांना रुपये ३१,०००/-, उर्वरित स्टाफला त्यांच्या वेतनश्रेणीतील इतरांना देऊ केलेले वेतन द्यावे. तसेच श्रीमती मंदा संजय थोरात यांची वेतन निश्चिती करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.४९. डॉ.अनिर्बन बंदोपाध्याय,यांना Intensivist पदावर नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.३७५.** डॉ.अनिर्बन बंडोपाध्याय यांनी त्याचा वैयक्तीक माहितीचा अर्ज व त्यासोबत त्यांचे शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेचे सर्टीफीकेटच्या प्रती मा.अध्यक्ष रुग्णालय निवड समिती तथा विश्वस्त मा.श्री पी.एल.तिवारी सो.यांचेकडेस सादर केलेल्या आहेत त्यावर मा.तिवारी सो.यांनी "To be appointed as Intensivist from 1st June 2006. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

याबाबत मेडीकल डायरेक्टर,श्री साईबाबा रुग्णालय यांची दि.१३/०५/२००६ रोजीची टिपणी प्राप्त झाली असून त्यात,"मा.वैद्यकीय प्रशासक यांना मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी दूरध्वनीद्वारे डॉ.अनिर्बन बंडोपाध्याय यांना श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये Intensivist या पदावर नियुक्तीचा आदेश देण्यात यावा तसेच याकामी त्यांना दरमहा रु.३०,०००/-(अक्षरी तीस हजार) मात्र इतके मानधन देण्यात यावे असे सांगीतले आहे."असे नमूद करुन," सध्या डॉ.विजय नरोडे हे इंटेन्सिव्हिस्ट म्हणून काम करत आहे.तीन पदांची मंजूरी प्रस्तावीत आहे.इस्पितळाची गरज पाहता दुसरे पद भरण्यास हरकत नाही." असे अभिप्राय दिलेले आहेत.

नविन रुग्णालयाकरीता आवश्यक असलेल्या पदांचा आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला असून त्यात Senior Intensivist या पदांच्या एकूण तीन जागा प्रस्तावीत असून अद्यापपावेतो सदर आकृतीबंधास शासनाची मान्यता येणेवर आहे.शासनाकडे मान्यतेसाठी पाठविलेल्या आकृतीबंधात Senior Intensivist या पदासाठी रु.१०,०००-१५,२०० या वेतनश्रेणीत ५ पगारवाढीसह रु.२९,९४८/- व ज्युनियर इंटेन्सीव्हीस्ट या पदासाठी रु.१०,०००-१५,२००/- या वेतनश्रेणीत रु.२४,९००/- इतके वेतन दर्शविलेले आहे.

तथापि,संस्थान रुग्णालयाची कामाची निकड व आवश्यकता लक्षात घेता यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने निवड प्रक्रियेतून डॉ.विजय नरोडे यांची जा.नं.एसएसएस/वशी-

०१/१९१६/२००६ दि.११/०२/२००६ अन्वये शासन मान्यतेच्या अधिन राहून रु.३०,०००/- (अक्षरी रु.तीस हजार) एकत्रीत मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून आता सदर पदांच्या दोन जागा रिक्त आहेत.

तरी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचे निर्देश,मेडीकल डायरेक्टर यांचे उपरोक्त अभिप्राय व रुग्णालयातील कामाची निकड व आवश्यकता विचारात घेवून डॉ.विजय नरोडे यांचे प्रमाणेच शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून डॉ.अनिर्बन बंडोपाध्याय,नाशिक यांची प्रतिमहा रु.३०,०००/-या एकत्रीत मानधनावर संस्थानचे श्री साईबाबा रुग्णालयाकरीता Intensivist या पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१.** **गणकयंत्र खरेदी करणेसाठी सिलबंद पाकीटातुन मागविण्यात आलेली दरपत्रके उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.३७६.** संरक्षण विभागाकरीता गणकयंत्र खरेदी करणे बाबत दि. ०१ एप्रिल २००६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय क्र. २०९ चे मंजुर प्रस्तावानुसार तसेच सिलबंद पाकीटातुन दरपत्रके मागविण्याच्या दि. ०१.०५.२००६ च्या मंजुर टिपणी नुसार संस्थान जा. नं. एसएसएस/ वशी/ संरक्षण/५९८९/२००६ दि. ०५.०५.२००६ अन्वये दि. १५.०५.२००६ अखेर पर्यंत सिलबंद पाकिटातुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ. नं. | कंपनी |
|---|---|
| ०१ | मॉडर्न सिक्युरिटी, कोलकत्ता |
| ०२. | ॲपेक्स ॲटोमेंशन ॲण्ड सिक्युरिटी सिस्टम,नागपूर |
| ०३ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनीक्स, चेन्नई |
| ०४ | रिलायंस इलेक्ट्रॉनीक्स, नाशीक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही- संरक्षण अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२.** **व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेसाठी सिलबंद पाकिटातून मागविण्यात आलेले दरपत्रके उघडणेबाबत**

**निर्णय क्र.३७७.** संरक्षण विभागाकडे असलेल्या व्यायामशाळेकरीता व्यायामशाळा साहित्य खरेदी करणे बाबत दि. ०१ एप्रिल २००६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय नं. २८ निर्णय क्र. २०७ चे मंजुर प्रस्तावानुसार तसेच सिलबंद पाकीटातुन दरपत्रके मागविण्याच्या दि. ०१.०५.२००६ च्या मंजुर टिपणी नुसार संस्थान जा. नं. एसएसएस/वशी/संरक्षण/६४०४ /२००६ दि. १८.०५.२००६ अन्वये दि. २५.०५.२००६ अखेर पर्यंत सिलबंद पाकिटातुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ. नं. | कंपनी |
|---|---|
| ०१ | विशाल इक्वीपमेंट,नाशिक |
| ०२ | अशोका इंजीनीयर्स, मुंबई |
| ०३ | डेक्कन फेब्रीकेटर्स, नाशिक |
| ०४ | संतोष एन्टरप्रायजेस, कोपरगांव |
| ०५ | वडाळीकर हेल्थ इक्युपमेंट, ठाणे |
| ०६ | सरोदे जिम,सिन्नर |
| ०७ | सातपुरकर फिटनेस वर्ड, नाशीक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही- संरक्षण अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३.** **स्कॅनर मशिन साहित्य खरेदी करणेसाठी सिलबंद पाकिटातून मागविण्यात आलेले दरपत्रके उघडणेबाबत**

**निर्णय क्र.३७८.** संरक्षण विभागाकरीता डिपसर्च व सर्च मिरर खरेदी करणे बाबत दि. ०१ एप्रिल २००६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय नं. ३१ निर्णय क्र. २१० चे मंजुर प्रस्तावानुसार तसेच सिलबंद पाकीटातुन दरपत्रके मागविण्याच्या दि. ०१.०५.२००६ च्या मंजुर टिपणी नुसार संस्थान जा. नं. एसएसएस/वशी/संरक्षण/५९९१/२००६ दि. ०५.०५.२००६ अन्वये दि. १५.०५.२००६ अखेर पर्यंत सिलबंद पाकिटातुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ. नं. | कंपनी |
|---|---|

| | |
|---|---|
| ०१ | मगनुम इलेक्ट्रॉनीक्स, बेंगलोर |
| ०२ | मॉडर्न सिक्युरिटी, कोलकत्ता |
| ०३ | ॲपेक्स ॲटोमेशन ॲन्ड सिक्युरिटी सिस्टीम, नागपुर |
| ०४ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनीक्स, चेन्नई |
| ०५ | होप, दिल्ली |
| ०६ | पी. एम. जी. सिस्टीम, हैद्राबाद |
| ०७ | सेफगार्ड सिक्युरीटी सिस्टीम, पुणे |
| ०८ | सेक्युर बेन्ड्झ, मुंबई |
| ०९ | रिलायंस इलेक्ट्रॉनीक्स, नाशीक |
| १० | हायटच असोसीएटेड, कोलकत्ता |

तसेच अल्फा सिक्युरिटी यांचे कोटेशन इकडील कार्यालयास उशीरा प्राप्त झालेले आहे. त्यांचे उशीरा प्राप्त झालेले कोटेशन उघडण्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही- संरक्षण अधिकारी )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४. डिपसर्च व सर्च मिरर साहित्य खरेदी करणेसाठी सिलबंद पाकिटातून मागविण्यात आलेले दरपत्रके उघडणेबाबत**

**निर्णय क्र.३७९.** संरक्षण विभागाकरीता डिपसर्च व सर्च मिरर खरेदी करणे बाबत दि. ०१ एप्रिल २००६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय नं. ३३ निर्णय क्र. २१२ चे मंजुर प्रस्तावानुसार तसेच सिलबंद पाकीटातुन दरपत्रके मागविण्याच्या दि. ०१.०५.२००६ च्या मंजुर टिपणी नुसार संस्थान जा. नं. एसएसएस/वशी/संरक्षण/५९९०/२००६ दि. ०५.०५.२००६ अन्वये दि. १५.०५.२००६ अखेर पर्यंत सिलबंद पाकिटातुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ. नं. | कंपनी |
|---|---|
| ०१ | मगनुम इलेक्ट्रॉनीक्स, बेंगलोर |
| ०२ | मॉडर्न सिक्युरिटी, कोलकत्ता |
| ०३ | ॲपेक्स ॲटोमेशन ॲन्ड सिक्युरिटी सिस्टीम, नागपुर |
| ०४ | युनिव्हर्सल इलेक्ट्रॉनीक्स, चेन्नई |
| ०५ | होप, दिल्ली |
| ०६ | पी. एम. जी. सिस्टीम, हैद्राबाद |
| ०७ | सेफगार्ड सिक्युरीटी सिस्टीम, पुणे |
| ०८ | सेक्युर बेन्ड्झ, मुंबई |
| ०९ | हायटच असोसीएटेड, कोलकत्ता |
| १० | रिलायंस इलेक्ट्रॉनीक्स, नाशीक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आली. या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही- संरक्षण अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५. दक्षिणा पेटीत पडलेले मंगळसूत्र परत करणेबाबत.**

**निर्णय क्र.३८०.** श्रीमती हंसा मुकेश सत्रा, जटाशंकर अपार्टमेंट, बी/२२, महात्मा फुले रोड, डॉ.चिंतामणी गार्डन समोर, मुलुंड पूर्व, मुंबई यांनी दिनांक १२/५/२००६ रोजी संस्थानकडे अर्ज केलेला आहे. सदर अर्जात त्यांनी असे म्हटलेले आहे की,

आज दि.१२/५/२००६ रोजी सकाळी श्री साईबाबांचे दर्शन घेतले व मंदिर परिसरात थोडावेळ मन:शांतीसाठी वेळ घालवून परिसर सोडतेवेळी बाबांना दक्षिणा टाकणेची आठवण झालेने, आपले समाधी मंदिर परिसरातील मंदिराचे उत्तर बाजू बाहेरील दक्षिणा पेटी नं.१८ मध्ये पैसे टाकताना सदर दक्षिणा बरोबर माझे हातात असलेले मंगळसूत्र देखील पेटीत पडले गेले.

महोदय सदर मंगळसूत्राचे ऐवजी जर एखादा कुठलाही किंमती दागीना आत अनावधानाने पडला असता तर मी परत मिळण्याची आस धरली नसती. परंतु सदर दागीना हा मंगळसूत्र असलेने त्याबरोबर माझ्या जीवनाच्या भावना निगडीत आहेत व आपल्या हिंदु संस्कृतीत मंगळसूत्राचे महत्व आपणा सर्वांना माहितच आहे. त्यामुळे जास्त भावना प्रकट करु शकत नाही.

माझ्या मंगळसूत्राचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

वजन - अंदाजे १४ ग्रॅमचे जवळपास, दोन सरीत असून त्यात काळे मोती व मधून सोनेरी मोती अशी जडण आहे. पॅंडलचे मध्यभागात सफेद डायमंड असून त्याखाली २ ते ३ घुंगरु आहेत.

तरी महोदयांना माझी नम्र विनंती आहे की, आपण ज्यावेळेस दक्षिणा पेटया उघडतात त्यावेळेस सदर दक्षिणा पेटी नं.१८ मध्ये वरील वर्णनाप्रमाणे मंगळसूत्र आढळून आलेस, मला त्वरीत वरील पत्यावर अथवा खालील टेलीफोन नंबरवर किंवा मोबाईल नंबरवर कळविलेस मी शिरडी येथे येवून सदर मंगळसूत्र ताब्यात घेवू शकेन. तरी माझ्या मागणी अर्जाचा साईबाबांच्या दरबारात साईभक्त या नात्याने माझ्या मागणीचा आदर ठेवला जाईल अशी आशा करते.

अशाप्रकारे श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांनी अर्ज केलेला आहे.

संस्थानचे दक्षिणा पेटयांमध्ये मिळणारी दक्षिणा प्रचलीत पध्दतीनुसार सर्वसाधारणपणे दर बुधवारी होत असते. त्याप्रमाणे श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांचे मंगळसूत्र दि.१२/५/२००६ रोजी दक्षिणा पेटी क्र.१८ मध्ये पडलेले आहे. त्यामुळे दि.१२/५/२००६ नंतर प्रथम येणारी दक्षिणा पेटी मोजणी दि.१७/५/२००६ बुधवार रोजी होती. सदर दक्षिणा पेटी मोजणीचे वेळी दक्षिणा पेटी क्र.१८ उघडली असता अर्जदार श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांनी त्यांचे अर्जात वर्णन केले प्रमाणे मंगळसूत्र आढळून आलेले आहे. सदरचे मंगळसूत्र व्यवस्थित पॅक करुन परत दक्षिणा पेटीमध्ये टाकणेत आलेले आहे.

संस्थानचे प्रचलीत पध्दतीनुसार दक्षिणा पेटीत मिळणारी रक्कम नोटा व नाणी, परकीय चलनातील नोटा व नाणी, चेक व डी.डी., सोने-चांदी अलंकार वस्तु, खडे व मणी, कापड, तांबा-पितळाच्या वस्तू तसेच घडयाळ, चष्मे, किरकोळ वस्तू आदी सर्व प्रकारची दक्षिणा मोजणी करुन संबंधित हिशोब रजिष्टरमध्ये समाधी मंदिर हुंडीमध्ये मिळालेली दक्षिणा म्हणून नोंद केली जाते. दक्षिणा पेटयांमध्ये मिळणारी दक्षिणा गुप्तदान असल्याने दक्षिणा पेटीत जरी नावानिशी दक्षिणा अर्पण केलेली असेल तरी वैयक्तीक नांवाने पावती बनविली जात नाही. तसेच दक्षिणा पेटीत अर्पण केलेली दक्षिणा आजपर्यंत कुणीही परत मागणी केलेली नाही.

नमुद केलेप्रमाणे दि.१२/५/२००६ रोजी त्यांचे हातून दक्षिणा पेटीमध्ये इतर दक्षिणा अर्पण करताना त्यांचे मंगळसूत्र पडले आहे. हिंदु संस्कृतीत मंगळसूत्र व दागीन्यास अनन्यसाधारण महत्व आहे. सदर महत्व लक्षात घेवून तसेच सदर श्रीसाई भक्ताच्या भावना लक्षात घेता त्यांनी त्यांचे अर्जात वर्णन केल्याप्रमाणे मंगळसूत्र बुधवार दि.१७/५/२००६ रोजी झालेल्या दक्षिणा पेटी मोजणी करताना आढळून आलेले आहे. सदर मंगळसूत्र सदर भक्तास परत करावयाचे किंवा कसे याबाबत निर्णय होईपावेतो व्यवस्थित पॅक करुन परत दक्षिणा पेटीमध्ये टाकणेत आलेले आहे.

श्रीमती  हंसा सत्रा, मुंबई यांचेकडून दक्षिणा पेटीत दक्षिणा अर्पण करताना दक्षिणा पेटीत पडलेले मंगळसूत्र श्रीमती हंसा सत्रा, मुंबई यांनी परत मागणी केलेले आहे. दक्षिणा पेटीत पडलेली दक्षिणा परत मागणी करणेची घटना प्रथमच घडत आहे.

श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेप्रमाणे हिंदु संस्कृतीत मंगळसूत्र या दागीन्यास अनन्यसाधारण महत्व आहे. सदर महत्व लक्षात घेता तसेच श्रीसाई भक्ताच्या बरोबर जीवनाच्या भावना निगडीत आहेत. या बाबींचा विचार करता एक खास विशेष बाब म्हणून त्यांनी त्यांचे अर्जात मागणी केलेप्रमाणे सदर मंगळसूत्र श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांना परत करणे योग्य राहील. मात्र गुप्तदान पेटीतील दक्षिणेतील एक अनन्यसाधारण असा दागीना खास बाब म्हणून परत करावयाचा असलेने श्रीमती हंसा मुकेश सत्रा, मुंबई यांचेकडून मंगळसूत्राचे किंमती इतकी (संस्थान नियुक्त अधिकृत सोनाराकडून ठरविलेली किंमत) रोख रक्कम दक्षिणा म्हणून जमा करुन घेण्यात यावी व अपवादात्मक विशेषबाब म्हणून त्यांचे मंगळसूत्र त्यांना परत करण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६.** **शिर्डी विकास योजनामधील आरक्षण क्र.४८,४९ व ५० करीता भूसंपादन मंडळ म्हणून शिर्डी नगरपंचायत,शिडी, यांचेऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी असा बदल करणेबाबत व सदर जमीन भूसंपादनाने अथवा खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.३८१.** मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारात गट नंबर ८० व ८५ या दोन्ही गटांमध्ये नियोजित प्रसादालय (भोजनगृह) इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे. या नियोजित प्रसादालय इमारतीचे दक्षिणेस शिर्डी शिवारात खालीलप्रमाणे आरक्षण असलेली जमिन आहेत.

| अ.न. | आरक्षण क्रमांक | सर्व्हे नंबर | क्षेत्र | आरक्षणाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४८ | १६८ पैकी, १६४ पैकी | ०२ हे ०३ आर | कॅम्पिंग गाऊंड |
| ०२ | ४९ | १६८ पैकी | ०० हे ८७ आर | वाहनतळ |
| ०३ | ५० | १६४ पैकी | ०० हे २३ आर | सार्वजनिक स्वच्छतागृह |

उपरोक्तपैकी, कॅम्पिंग गाऊंड आरक्षणाचा हेतु गावांचे यात्रेसाठी व उत्सवासाठी मोकळे मौदान उपलब्ध असणे, हा आहे. प्रसादालयाकडे येणाऱ्या साईभक्तांच्या वाहनासाठी कॅम्पिंग गाऊंडचा उपयोग होईल, मात्र या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे पक्के बांधकाम करण्यास परवानगी मिळणार नाही. या जमिनिच्या लगत पुर्व बजुस

आरक्षण क्र. ४९ असून, हे क्षेत्र वाहनतळासाआरक्षित आहे. त्याचाही उपयोग साईभक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळ म्हणून होईल.

आरक्षण क्र.५० तील क्षेत्र हे स्वच्छतागृहासाठी आरक्षित आहे. हे क्षेत्र संस्थानने घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन स्वच्छतागृहाचे योग्य प्रकारे बांधकाम करता येणे शक्य होईल तसेच सांडपाणी व पाणीपुरवठयाची व्यवस्था चांगली करता येईल. सांडपाण्याचा निचरा करणेसाठी संस्थानमार्फत योग्य प्रकारची व्यवस्था करण्यात आल्याने, या भागातील वातावरण दुषित होणार नाही. पर्यायाने या भागात येणाऱ्या साईभक्तांना स्वच्छ व निर्भेळ वातावरणाचा लाभ होईल.

वरील सर्व बाबींचा विचार करता, आरक्षण क्र. ४८,४९ व ५० ची जागा संस्थानने संपादीत करणे आवश्यक आहे. सदर आरक्षणसाठी भुसंपादन मंडळ (संस्था) म्हणून, " शिर्डी नगरपंचायत, शिर्डी" ही संस्था शिर्डी विकास आराखडयात दाखविली आहे. त्या ऐवजी भूसंपादन मंडळ (संस्था) म्हणून, " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी" असा बदल होणे आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आरक्षण क्र. ४८ प्रयोजन कॅम्पिंग ग्राऊंड, आरक्षण क्र. ४९ वाहनतळ व आरक्षण क्र. ५० सार्वजनिक स्वच्छतागृह यासाठी शिर्डी विकास आराखडयात भूसंपादन मंडळ (संस्था) म्हणून, सध्या "शिर्डी नगरपंचायत, शिर्डी" असे दाखविले आहे. त्याऐवजी, भूसंपादन मंडळ (संस्था) म्हणून, " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी" असा बदल करणेबाबत_मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना प्रस्ताव पाठविणेस व सदर फेरबदल मंजुर झालेनंतर उपरोक्त आरक्षणाखालील जमिनी भुसंपादनाने घेणेबाबत कार्यवाही करणेत यावी असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७. श्री संदिप अशोक सालकर यांचे बीलाबाबत.**

**निर्णय क्र.३८२.** श्री. संदिप अशोक सालकर यांच्या पत्नी सौ. कांचन सालकर हया गर्भवती असताना नाशिक येथे आई वडीलाकडे गेल्या होत्या तेथे त्यांना अचानक बाळंतपणाचा त्रास होऊ लागल्यामुळे त्यांनी ताबडतोब नवजीवन हॉस्पिटल, नाशिक येथील डॉ. लाड यांना दाखविले होते. डॉ. लाड यांनी तपासणी केल्यानंतर गर्भाशयातील बाळा भोवतालचे पाणी कमी झाल्यामुळे अ‍ॅडमीट होण्याचा सल्ला दिला होता व नंतर त्यांनी कलर डॉपलरची तपासणी केल्यानंतर त्यामध्ये असे समजले की, बाळाच्या गळयाभोवती नाळ गुंडाळला असल्यामुळे लवकरात लवकर सिझर करावे लागेल, त्यानुसार दि. २३/०२/२००६ रोजी सिझर करुन बाळंतपण केले.

श्री. संदिप अशोक सालकर यांच्या वैद्यकिय बीलाच्या परताव्याबाबत वैद्यकिय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये नियम क्र. १३ अ.नं.२ नुसार खालीलप्रमाणे तरतुद आहे.

आकस्मिक आजारामध्ये स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र संबंधित आकस्मिक आजार असे नमुद केले आहेत. त्यात सामान्यपणे सिझरीयन शस्त्रक्रिया व प्लाझंटा प्रिवाया तसेच सर्वसामान्य प्रसुति वगळून इतर उद्‌भवणारे आजार असू शकतात. या प्रसुती शास्त्रातील इतर आजाराबद्दल आकस्मिकतेचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिल्यास त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती नियमानुसार अनुज्ञेय राहील. मात्र या संदर्भात खालील गोष्टींचे बंधन राहील.

अ) स्त्री कर्मचारी अगर कर्मचाऱ्याच्या पत्नीने संस्थान रुग्णालयात अगर शासकिय रुग्णालयात उपचार घेतल्यास प्रसुतिसाठी येणारा सर्व खर्च प्रतिपुर्तीसाठी अनुज्ञेय राहील.

ब) संस्थान रुग्णालयात प्रसुतिपुर्व नोंदणी केल्यास प्रसुतिच्या वेळी आकस्मिक परिस्थितीत खाजगी रुग्णालयात औषधोपचार घेतल्यास त्यावरील त्यावरील खर्चाची रु. १०,०००/- मर्यादित प्रतिपुर्ती मिळू शकेल.

क) संस्थान रुग्णालयात प्रसुतिपुर्व नाव नोंदणी केलेली नसल्यास पुर्ण कालावधीच्या प्रसुतिसाठी (सिझरीयन शस्त्रक्रिया इत्यादी) खाजगी रुग्णालयात उपचार घेतल्यास त्यावरील खर्चाची प्रतिपुर्ती मिळू शकणार नाही.

वैद्यकिय देखभाल नियमावलीचा विचार करता श्री. सालकर यांनी प्रसुतिपुर्व आपल्या रुग्णालयात नोंदणी केलेली नव्हती. त्यामुळे त्यांना वैद्यकिय बीलाचा परतावा देय होत नाही. त्यांचे बीलाची रक्कम रु.४२,७०३/- मात्र इतकी आहे.

तथापी सदर बीलाच्या परताव्याबाबत विशेष बाब म्हणून मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी व मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर यांनी अदा करण्याबाबत शिफारस केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८. श्री राजू मारुती भोसले, वाहनचालक यांचे वैद्यकीय उपचाराबाबत.**

**निर्णय क्र.३८३.** राजू मारुती भोसले, वाहन चालक- वाहन विभाग, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा दि. १६.०४.२००६ रोजी मोटार सायकल अपघाताने बेशुध्द अवस्थेत नाशिक येथील अ‍ॅपेक्स रुग्णालयात दि. ०६.०४.२००६ ते दि. २१.०४.२००६ पर्यंत अ‍ॅडमिट होते. त्यांच्यात सुधारणा न झाल्यामुळे त्यांना जहांगिर रुग्णालय, पुणे येथे हालविण्यात आले होते.

दि. २८.०५.२००६ रोजी वैद्यकिय संचालक (न्युरोसर्जन) यांनी स्वत: पुणे येथे जाऊन रुग्णाची तपासणी करुन आवश्यक त्या सुचना उपचाराविषयी दिल्या आहे. तसेच उपचार करणारे डॉ. सांगळे यांची भेट घेऊन चर्चा केलेली आहे.

वरील पुणे भेटीतील रुग्ण तपासणी व न्युरो सर्जन यांच्या भेटीचा अहवाल खालीलप्रमाणेः-

०१. श्री. भोसले अद्याप व्यक्ती ओळखत नाही व त्यांना समजत नाही,

०२. उजव्या हातात शक्ती १५% व अजव्या पायात ४०% पर्यंत आहे.

०३. वैद्यकिय शास्त्रातील संकेताप्रमाणे शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली रुग्ण असणे जास्त फायदेशीर आहे.

०४. सबब त्यांना आणखी दोन आठवडे तेथेच राहून उपचार घेणे फायदेशीर होईल असे वाटते.

०५. संबंधीत न्युरोसर्जनंना कमीत कमी बील आकारणीबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

श्री. भोसले यांना वरील उपचारार्थ आत्तापर्यंत रु. २,७५,०००/- जहांगिर रुग्णालयास ॲडव्हॉन्स म्हणून दिलेली आहे. श्री. भोसले यांनी पुन्हा रु. १,००,०००/- इतक्या रकमेची मागणी केलेली आहे. आत्तापर्यंत सुमारे रु. ३,७२,७००/- इतका खर्च झालेला आहे. रुग्णालयाचे वैद्यकिय संचालक यांनी दि. २८.०५.२००६ रोजी समक्ष भेट देऊन रुग्णांस समक्ष पाहिलेले आहे.

श्री. भोसले यांचे वैद्यकिय उपचाराबाबत वरीलप्रमाणे माहिती मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केली होती, तिची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.९. मोफत झालेल्या शस्त्रक्रियांबाबत.**

**निर्णय क्र.३८४.** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये दि. ०७.०५.२००६ रोजी आयोजित पत्रकार परिषदेनिमित्त दि. ०६.०५.२००६ व दि. ०७.०५.२००६ रोजी खालील शस्त्रक्रिया प्रायोगिक तत्वावर करण्यात आलेलया आहेत.

०१. श्रीमती वर्षा मेने- Closure of ASD

०२. श्रीमती शितल सोनवणे- Closure of ASD

०३. श्री. एकनाथ मैड- Angiography & Bypass Surgery

तसेच,

०१. श्रीमती सुंदराबाई गायकवाड- Angiography

०२. श्री. सुरेश अभंग- Angiography

०३. श्री. वसंत पगारे- Bypass Surgery

या ०३ शस्त्रक्रिया पुढे करण्याचे ठरविले होते व त्या पूर्ण करण्यात आलेल्या आहेत.

मा. विश्वस्त डॉ. पी.एल. तिवारी साहेब यांनी दूरध्वनीद्वारे वरील ऑपरेशन्स संपूर्णपणे मोफत करण्याचे आदेश दिले होते व त्याला अनुसरुन पुढील कार्यवाही करण्यात आली आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना आकारावयाचे रुग्णालय संवांदे दरांची अद्याप निश्चिती झालेली नाही. तथापि, रुग्णालयात रुग्णालय सेवांचे दर निश्चित होणेकामी यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर केलेल्या प्रस्तावित दरानुसार खालीलप्रमाणे रक्कम संस्थानचे खाली जमा झाली असती.

| | |
|---|---|
| Closure of ASD | Rs 1,40,000/- (दोन शस्त्रक्रिया) |
| Bypass Surgery | Rs 1,20,000/- (दोन शस्त्रक्रिया) |
| Angiography | Rs 12,000/- (दोन शस्त्रक्रिया) |
| Angiography | Rs 50,000/- |

वरील ०६ ऑपरेशन्स मोफत झाल्यामुळे एकूण रु. ३,२२,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख बावीस हजार मात्र) ची रक्कम वसुली झालेली नाही. सदरहू खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०. फिलीप्स कंपनीच्या मॉनिटर्ससाठी सर्व्हर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.३८५.** श्रीसाईबाबा रुग्णालयात कार्डीयाक रिकव्हरी रुममध्ये ठेवण्यासाठी लागणाऱ्या मॉनीटर्ससाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०७.२००५ मंजुरी अन्वये मे.फिलिप्स मेडीकल,मुंबई यांना इकडील पत्र क्र.८३७३ दि.०८.०८.२००५ अन्वये १२ नग बेडसाईड मॉनिटर्सचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदर पुरवठा आदेशान्वये मे.फिलिप्स मेडीकल,मुंबई यांनी १२ नग मॉनिटर्सचा पुरवठा करुन ते रुग्णालयात बसवुन कार्यान्वीत करुन दिलेले आहेत.

सदर मॉनिटर्सला केबल जोडण्यासाठी सर्व्हरची आवश्यकता असते. दि.०८.०५.२००६ च्या पत्रान्वये मे.फिलिप्स इलेक्ट्रॉनिक्स , मुंबई यांनी सदर सर्व्हरचे कोटेशन पाठविले असून त्यावर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांच्या स्वाक्षरी ने खरेदी करण्याचे आदेश देण्यात आलेला आहे.

त्याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे.

| Sr. No. | Particulers | Qty | Rate Per | Total Amt. in Rs |
|---|---|---|---|---|
| 1. | Multimeasurement Servers<br>Capnography measurement facility includes Copnography server. 04 nos. | 4 | 190000.00 | 760000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Capnography Transducer-04 | | | |
| | Reusable adult adapter -04 | | | |
| | Reusable Paediatric adapter - 02 | | | |
| 2. | Dual Invasive/ Temp measurement facility | | | |
| | includes. | 4 | 145000.00 | 580000.00 |
| | Dual Invasive pressure channel-04 | | | |
| | Single Temperature Channel - 04 | | | |
| 3. | Dual Invasive / Temp Measurement facility | | | |
| | includes: | 2 | 156000.00 | 312000.00 |
| | Dual invasive Pressure channel-02nos. | | | |
| | Dual Temperature channel -02 nos. | | | |
| | Total Price | | | |
| | Special 25% discount | | | 1652000.00 |
| | for Destination Price | | Sub Total | 413000.00 |
| | Optional Battery Upgrade for Intellivue | 1 | Rs.- | 1239000.00 |
| | MP 20 | | 34000.00 | 34000.00 |
| | 1.Battery Upgrade | | | |
| | Includes : | | | |
| | Hardware upgrede in the Monitor Li-Ion fast | | | |
| | charge battery | | | |
| | Battery management Software | | | |
| 1 | Skin Temperature Probe | | 9500.00 | 9500.00 |
| | FOR Destination Price | | | |
| | Total Amount Rs. | | | 12,82,500.00 |

कार्डियाक रिकव्हरी रुममध्ये मे.फिलीप्स मेडिकल,मुंबई यांचेकडील बेडसाईड मॉनिटर बसविलेले असल्यामुळे फिलीप्स कंपनीचेच सर्व्हर बसविण्याची आवश्यकता असल्याने वरील प्रमाणे सर्व्हरच्या रु.१२,८२,५००/- च्या खर्चास व खरेदीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांच्या बीलाबाबत.**

**निर्णय क्र.३८६.** श्री साईबाबा हॉस्पिटलचे दि.१५/०५/२००६ रोजी उदघाटन होउन त्यातील काही विभाग सुरुही करण्यात आले आहेत.

श्रीसाईबाबा हॉस्पिटीमध्ये रुग्ण दाखल झाल्यास खालील बाबतीत अधिकार वैदयकीय संचालक व वैदयकीय प्रशासक यांना देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**अ) अपघात विभाग -**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये अनेक वेळा अत्यवस्थ वा गंभीर जखमा झालेले रुग्ण येऊ शकतात. असा रुग्ण दाखल झाल्यास लागणा-या खर्चाचा अथवा इतर सामुग्रीचा विचार न करता त्याची तब्येत स्थिर करण्यासाठी जे उपाय आवश्यक असतील ते मोफत करण्याचे अथवा अशा रुग्णाचे आवश्यकतेनुसार काही प्रमाणात बील माफ करण्याचे अधिकार वैदयकीय संचालक व वैदयकीय प्रशासक यांना असावेत.

**ब)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दाखल होउ इच्छिणा-या रुग्णांस भरती करण्यासाठी खालीलप्रमाणे दोन पर्याय असावेत.

१. संपूर्ण रक्कम रोख स्वरुपात ॲडव्हान्स घेउन.

२. काही प्रमाणात रक्कम ॲडव्हान्स घेउन व उर्वरित रक्कम भरण्याची जबाबदारी घेण्याबद्दल रुग्णाचे /नातेवाईकांचे लिखित वचन पत्र घेउन.

**क)** रुग्णाचे बिल काही प्रमाणात वा पूर्णपणे माफ करण्यासंबंधीचे धोरण निश्चित होउन मिळावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांचे बिलाबाबत नियमावली तयार करण्यात येऊन ती सर्व विश्वस्तांना पुरविण्यात यावी. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.५.२००६ चे सभेतील निर्णय क्र.३०८ अन्वये प्रत्येक ब्रँचमध्ये २० % चॅरिटी देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अधिन राहून दारिद्र्य रेषेखालील कार्डधारक रुग्णांना संपूर्ण सवलत देण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. श्री साईबाबा रुग्णालयातील प्लॅस्टिक सर्जरीसाठी मशिनरी,साहित्य, हत्यारे इत्यादी खरेदीबाबत**

**निर्णय क्र.३८७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. उशा खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.३८८.** श्री साईबाबा हॉस्पिटलच्य लिनन डिपार्टमेंट मध्ये ज्या उशा उपलब्ध आहेत. त्यामध्ये खालील उणीवा आहेत.

०१.उशीची लांबी व रुंदी कमी आहे. व मध्येच फुगीर असून कडेने प्रमाणापेक्षा जास्त निमुळत्या आहेत. त्यामुळे एकावर एक ठेवणे अवघड जात आहे.
०२.उशांचे वजन फारच असल्याने रुग्णांच्या थोडयाशा हालचालीनेही त्या डोक्याखालून सरकतात.
०३.कमी लांबी असल्यामुळे पेशंट एका कुशीवरुन दुसऱ्या कुशीवर वळल्यानंतर डोके खाली जाते.
०४. उशीसाठी स्पंज वापरला असल्यामुळे काही वेळाने पेशंटला उष्णता जाणवते.
०५.वरील उणीवांमुळे पेशंटच्या झोपेवर परिणाम होत आहे. व त्यांना आराम मिळणे अवघड होत आहे.
०६. Semi propped position देणे परिचारीकांना अवघड जात आहे. Orthopedics च्या दृष्टीने,
**अ)** Proper spine alignment.
**ब)** Relaxation of neck ligaments & muscles अशा महत्वाच्या बाबींवर परिणाम होत आहे.
०७. तात्पर्य सदर उशा हॉस्पिटल उपयोगाच्या दृष्टीने Unfit आहेत.

या उशांना पर्याय म्हणून Latex Material कंपनीच्या उशा बाजारात उपलब्ध आहेत आणि बहुतेक मोठया हॉस्पिटल मध्ये Latex कंपनीच्याच उशा वापरल्या जातात.

तरी अशा ४०० नग उशा विहीत पध्दतीने खरेदी करणेस व सदरकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४.** **पाणीपुरवठा विभागासाठी ब्लिचिंग पावडर खरेदी बाबत.**
**निर्णय क्र.३८९.** संस्थानचे पाणीपुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक असणारी ब्लिचींग पावडर-२५ टन, फेरीक ॲलम (तुरटी)-५० टन व क्लोरीन गॅस सिलेंडर-२० नग खरेदीस व त्याकामी येणारे रु.५,७७,८००/-चे खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.१२.२००५ मधील निर्णय क्र.७५४ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०९.०१.०६ ते दि.१९.०१.२००६ अखेर शिरडी व मुंबई कार्यालयात निविदा विक्री करणेत आलेली होती. मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मध्ये उघडणेत येवून संबंधितांना त्याच सभेत वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले होते. निविदाधारकांशी झालेल्या चर्चेअंती निर्णय क्र.४२ नुसार ब्लिचींग पावडरसाठी मे.हितू-जितू एन्टरप्राईजेस, मुंबई यांचे दर न्युनतम असल्याने त्यांना जा.क्र.२३३२ दि.२०.०२.२००६ अन्वये २५ टन ब्लिचींग पावडर खरेदीकामी प्रती टन रु.१४,०००/-अधिक १२.५% व्हॅट टॅक्स या वार्षिक दराने पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

मे.हितु-जितू एन्टरप्राईजेस, नाशिक यांना संस्थान पत्र क्र.३०२२/०२.०३.२००६ अन्वये मार्च २००६ साठी २.५ टन ब्लिचींग पावडर पुरविणेकामी आदेश देणेत आलेला होता. मात्र वाहनाअभावी सदरचा माल त्वरीत पोहोच करणेबाबत त्यांनी असमर्थता दर्शविल्याने संस्थानची गाडी पाठवून त्यांचेकडे उपलब्ध असलेला १.६७५ टन माल आणणेत आला होता. सदरील मालाची पाणीपुरवठा विभागाने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर येथे तपासणी केली असता, या पावडरमध्ये आवश्यक असलेले क्लोरीनचे प्रमाण ३४% न आढळता, २८.८१% प्रमाण आढळले. याबाबत त्यांना दूरध्वनीवरुन विचारणा केली असता, जुना स्टॉक पाठविणेत आलेने क्लोरीनचे प्रमाण कमी झालेले असून दुसरा माल त्वरीत पाठवित येत असल्याचे सांगितले. त्यानुसार पाठविणेत आलेल्या मालाची जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अ.नगर येथे तपासणी केली असता त्यामध्ये क्लोरीनचे प्रमाण ३४.२१% याप्रमाणे योग्य असल्याचे निदर्शनास आले. सदरची क्लिनींग पावडर प्रत्यक्ष वापरुन पाहिली असता, त्याची परिणामकारकता मात्र योग्य दिसून न आल्याने, पावडरमधील क्लोरीनचे प्रमाणाबाबत शंका निर्माण झाली त्यामुळे मालाचे गुणवत्तेसाठी पाणीपुरवठा विभागाने मे.हितू-जितू एन्टरप्राईजेस, यांचेशी संपर्क साधून त्यांचेकडून प्राप्त झालेले नमुने आपण स्वत: तपासून पहाणेस सुचविले असता, त्यांचे प्रतिनिधीने दोन्ही बॅचमधील नमुने नाशिक येथील शासकीय आरोग्य प्रयोगशाळेत तपासणी केले असता त्यात क्लोरीनचे प्रमाण २७.६९% व २९.८२% असल्याचे आढळले म्हणजेच मागणीप्रमाणे क्लोरीनचे प्रमाण ३४% नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

पाणी शुद्धीकरणासाठी ब्लिचींग पावडर अत्यंत महत्वाची व आवश्यक असल्याने क्लोरीन प्रमाणयुक्त ब्लिचींग पावडर खरेदी करणे गरजेचे असल्याने, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांनी सिन्नर येथील ॲलम उत्पादीत तसेच ग्रासीम/डिसीएम कंपनीच्या ब्लिचींग पावडरचे अधिकृत विक्रेते "विक्रम केमिकल्स" या कंपनीकडे प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांचेकडून १ टन ब्लिचींग पावडर प्रायोगिक तत्वावर आणून वापरुन पाहिलेली आहे. सदर पावडर आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक येथे तपासून घेतली असता त्यामधील क्लोरीनचे प्रमाण ३४% योग्य असल्याचा रिपोर्ट प्राप्त झालेला आहे. वार्षिक पुरवठयाबाबत कंपनीस विचारणा केली असता, त्यांनी ब्लिचींग पावडरसाठी प्र.मेट्रीक टन रु.१४,६००/- अधिक १२.५% व्हॅट टॅक्स असा दर दिलेला असून त्यांनी तसे पत्र दिलेले आहे. मात्र संस्थान वाहनाने डिलेव्हरी घ्यावी लागेल अथवा वाहतुक खर्च वेगळा दयावा लागेल असे त्यांनी सूचीत केलेले आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णयानुसार ब्लिचींग पावडर २५ टनसाठी खालीलप्रमाणे न्युनतम दर आलेले होते.

| न्युनतम दरधारक | निविदाधारकाचे नांव | दर प्रती टन | ब्रॅण्ड |
|---|---|---|---|
| प्रथम | हितु-जितू एंटरप्राईजेस, मुंबई | १४०००/-+१२.५%व्हॅट = रु.१५,७५०/- | ग्रासीम मेक |
| द्वितीय | एस.व्ही.एस.केमिकल कार्पोरेशन, पुणे | १४३५०/-+१२.५%व्हॅट = रु.१६,१४४/- | ग्रासीम मेक |
| तृतीय | गणेश-वैजापूर/स्वानंद-लोणी | १५६००/-+१२.५%व्हॅट = रु.१७,५५०/- | ग्रासीम/रॉयलसिमा |

**प्रस्तावित दर**

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | दर प्रती टन | ब्रॅण्ड |
|---|---|---|---|
| ०१. | विक्रम केमिकल्स, सिन्नर | १४६००/-+१२.५%व्हॅट= रु.१६,४२५/- डिलेव्हरी- सिन्नर | ग्रासीम/डिसीएम मेक |
| ०२. | गौरव मेडीकल ॲण्ड जनरल, श्रीरामपूर | रु.१६,४४०/- ( व्हॅटसह) डिलेव्हरी- श्रीरामपूर | डिसीएम मेक (श्रीराम ब्रॅण्ड ) |

द्वितीय न्युनतमदरधारक मे.एस.व्ही.एस.केमिकल्स, पुणे यांनी ॲलमचा पुरवठा करणेस असमर्थता दर्शविलेली असल्याने त्यांना ब्लिचींग पावडर पुरवठयाचा आदेश देता येणार नाही. तसेच मे.गणेश एजन्सीज-वैजापूर व मे.स्वानंद ट्रेडर्स, लोणी यांचे दर प्रस्तावित केलेल्या दरापेक्षा तुलनेने फारच जास्त आहेत.

तरी पाणीपुरवठयाची पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक असणारी ब्लिचींग पावडरची निकड पहाता, मे.हितू-जितू एन्टरप्राईजेस, मुंबई यांनी योग्य मालाचा पुरवठा न केल्याने त्यांचा पुरवठा आदेश रद्द करणेत यावा व प्रस्तावित केलेल्या वरील दोन्ही पुरवठाधारकांना आजचे सभेपूढे चर्चेसाठी निमंत्रित करण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेल दर |
|---|---|---|---|
| ०१. | विक्रम केमिकल्स, सिन्नर | १४६००/-+१२.५%व्हॅट= रु.१६,४२५/- डिलेव्हरी- सिन्नर (ग्रासीम/डिसीएम मेक) | १४६००/-+१२.५%व्हॅट= रु.१६,४२५/- डिलेव्हरी- सिन्नर (ग्रासीम/ डिसीएम मेक) |
| ०२. | गौरव मेडीकल ॲण्ड जनरल, श्रीरामपूर | रु.१६,४४०/- ( व्हॅटसह) डिलेव्हरी- श्रीरामपूर (डिसीएम मेक (श्रीराम ब्रॅण्ड ) | रु.१६,४२१/- ( व्हॅटसह) डिलेव्हरी- श्रीरामपूर (डिसीएम मेक (श्रीराम ब्रॅण्ड ) |

यावर सविस्तर चर्चा होऊन गौरव मेडीकल ॲण्ड जनरल, श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५.** **श्रीसाईबाबा दैनंदिनी-२००६ चे संस्थानव्दारे शैक्षणिक संकुलातील शालेय विद्यार्थ्यांना मोफत वाटप करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९०.** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६.** **नगर मनमाड रोडवर हायमास्ट पोल उभे करणेबाबत तसेच पोलवर मेटल हॅलाईट लॅम्प बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.३९१.** मा.अध्यक्ष महोदय व मा.विश्वस्त श्री.कैलास बापू कोते यांचा नगर-मनमाड रोड व रथ-पालखी रस्ता याठिकाणी राऊंड झाला. नगर-मनमाड रोडवर असलेल्या स्ट्रीट लाईट पोलवरील सध्याचे सोडीअम लॅम्प हे कमी क्षमतेचे असल्याने त्यांचा प्रकाश अंधूक पडतो. त्यामुळे वाहतूकीवर परिणाम होतो व वातावरण प्रसन्न वाटत नाही, याकरिता नगर-मनमाड रोडवर हाय-मास्ट पोल उभे करून त्यावर पांढऱ्या प्रकाशाचे मेटल हॅलाईड लॅम्प बसविणे तसेच सध्याच्या जुन्या पोलवरही सोडीअम लॅम्पऐवजी मेटल हॅलाईड लॅम्प बसविणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांचेशी मा.विश्वस्त श्री.कैलास बापू कोते यांची खालीलप्रमाणे चर्चा झाली आहे.

०१)नगर-मनमाड रोडवर साईप्रसाद पार्किंग गेट्पासून ते ५०० रुमपर्यंत खालीलप्रमाणे एकुण ०६ ठिकाणी हायमास्ट पोल उभारण्यात यावेत.

(अ) नगर-मनमाड रोड -साईप्रसाद पार्किंग गेट्समोर

(ब) नगर-मनमाड रस्ता मनोजकुमार पथ चौक

(क) नगर-मनमाड रस्ता सेवाधाम -पालखी रस्ता - शिरडी नगरपंचायत कार्यालय -कनकुरी रस्ता चौक

(ड) नगर-मनमाड रस्ता नांदुर्खी रस्ता चौक

(इ) नगर-मनमाड रस्ता एस.टी.स्टॅंड चौक

(फ) नगर-मनमाड रस्ता ५०० रुम भक्त निवास समोर

०२) या हायमास्ट पोलची उंची १२.५ मीटर असावी.

०३)या हायमास्ट पोलवर २५० वॅट पांढ-या प्रकाशाचे मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग ०४ नग बसविण्यात यावे.

०४)हे हायमास्ट लॅम्प फिटींग फिलीप्स कंपनीचे असावेत.

०५)या हायमास्ट पोल उभारणीचा खर्च संस्थानने करावा.

०६)हे हायमास्ट पोल व लॅम्प बसविलेनंतर त्याचे मेन्टेनन्स शिर्डी नगरपंचायतने करावे. व हे हायमास्ट पोल उभे केल्यानंतर व त्यांचेवरील लाईट फिटींग चालू केल्यानंतर येणारे दरमहा वीजेचे बील शिर्डी नगरपंचायत यांनी भरावे.

०७) या हायमास्ट व्यतिरिक्त उत्तर बाजूचे ओढयापासून ते जोशी हॉस्पीटलपर्यंत सध्या लावलेल्या स्ट्रीट लाईट पोलवरील सोडीअम लॅम्प हे कमी क्षमतेचे असल्याने त्यांचा प्रकाश अंधूक पडतो. त्यामुळे वाहतूकीवर परिणाम होतो.व वातावरण प्रसन्न वाटत नाही. म्हणून या जुन्या पोलवर पांढ-या रंगाचे १५० वॅटचे मेटल हॅलाईड लॅम्प व फिटींग बसविण्यात यावेत. हे मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग संस्थानने खरेदी करुन बसवून दयावेत. लॅम्प बसविलेनंतर व चालू केल्यानंतर त्याचे मेन्टेनन्स शिर्डी नगरपंचायतने करावे व येणारे दरमहा वीजेचे बील शिर्डी नगरपंचायत यांनी भरावे.

०८) जोशी हॉस्पीटल पासून ते ५०० रुमपर्यंत स्ट्रीट लाईट पोल उभे करण्यात आलेले नाही. संस्थानमार्फत याठिकाणी आवश्यक तितके स्ट्रीट लाईट पोल उभे करुन एका पोलवर दोन्ही बाजूला दोन मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग बसवून दयावेत. हे मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग संस्थानने खरेदी करुन बसवून दयावेत. लॅम्प बसविलेनंतर व चालू केल्यानंतर त्याचे मेन्टेनन्स शिर्डी नगरपंचायतने करावे व येणारे दरमहा वीजेचे बील शिर्डी नगरपंचायत यांनी भरावे.

०९) उत्तर बाजू ओढा ते जोशी हॉस्पीटल पर्यंत शिर्डी नगरपंयायतीमार्फत उभे करण्यात आलेल्या स्ट्रीट लाईट पोलपैकी काही पोल हे वाहनांचे अपघातामध्ये तुटलेले असून या तुटलेल्या पोलचे जागी नवीन पोल संस्थानचे मार्फत उभे करण्यात यावेत.व त्यावरही दोन्ही बाजूला दोन मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग बसवून दयावेत. हे मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग संस्थानने खरेदी करुन बसवून दयावेत. लॅम्प बसविलेनंतर व चालू केल्यानंतर त्याचे मेन्टेनन्स शिर्डी नगरपंचायतने करावे व येणारे दरमहा वीजेचे बील शिर्डी नगरपंचायत यांनी भरावे.

तसेच दिनांक :- १७-०५-२००६ रोजी शिरडी नगरपंचायतींने पत्र पाठविले आहे. यात खालीलप्रमाणे नमूद आहे.

शिर्डी नगरपंचायत हद्दीत शहरातील प्रमुख रस्त्यांवर नागरीकांची तसेच साईभक्तांची मोठया प्रमाणात वर्दळ असून सदर रस्त्यांच्या चौकात खालील हायमॅक्स लाईट बसविणेबाबत चर्चा झाली आहे.

०१) नगर-मनमाड रस्ता मनोजकुमार पथ चौक

०२) नगर-मनमाड रस्ता नांदुर्खी रस्ता चौक

०३) नगर-मनमाड रस्ता ५०० रुम भक्त निवास समोर

०४) नविन पिंपळवाडी रस्ता पुष्पांजली चौक.

०५) पालखी रस्ता बाबांची चावडी समोर

०६) ताजीमखान बाबा चौक

वरील सहा ठिकाणी साईभक्तांच्या व नागरीकांच्या सोईसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचेमार्फत हायमॅक्स लाईट बसविणेबाबत शिर्डी नगरपंचायतीची हरकत नाही. सदरहु हायमॅक्स लाईट बीलाच्या खर्चासाठी येणा-या सभेत मंजूरीसाठी विषय ठेवण्यात येणार आहे. तरी सभेच्या निर्णयास अधिन राहून वरील सहा ठिकाणी संस्थानमार्फत हायमॅक्स लाईट बसविणेस ना हरकत देण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७(१) :-

राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अनुसरुन अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

वरिल नमूद केलेल्या प्रयोजनानुसार हा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(१) सहा नग हायमास्ट लॅम्पसाठी प्रत्येकी रु.९५,०००.०० प्रमाणे एकुण रु. ५,७०,०००.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

(२) तसेच जोशी हॉस्पीटल पासून ते ५०० रुमपर्यंत च्या स्ट्रीट्लाईटचे काम शिरडी नगर पंचायतीमार्फत करण्यात येणार आहे,असे शिरडी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी सांगितले आहे.

(३) नगर मनमाड रस्त्याच्या उत्तर बाजूचे ओढयापासून ते जोशी हॉस्पीटलपर्यंत सध्या लावलेल्या ३१ स्ट्रीट लाईट पोलवर १५० वॅट मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग - ६२ नग बसविणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या डी.एस.आर. रेटनुसार रु.४,०३,९९२.०० इतका खर्च अपेक्षित आहे.तसेच पूर्वी एकुण ३४ पोल होते. यातील २ पोल अपघातात तुटलेले आहेत, त्याजागी २ नविन पोल उभे करून त्यावरही ०४ नग मेटल हॅलाईड लॅम्प फिटींग लावाव्या लागतील. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या डी.एस.आर. रेटनुसार रु. ४८,२५४.०० इतका खर्च अपेक्षित आहे. नगर मनमाड रस्त्याच्या उत्तर बाजूचे ओढयापासून ते जोशी हॉस्पीटलपर्यंत एकुण खर्च रु.४,०३,९९२.०० + रु. ४८,२५४.०० = रु. ४,५२,२४६.०० इतका अपेक्षित आहे.

उपरोक्तकामी एकुण खर्च रु.५,७०,०००.००+रु.४,५२,२४६.०० =रु.१०,२२,२४६.०० इतका अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७.** **रोटेगांव (वैजापूर) रेल्वे स्टेशनवर रेल्वे थांबणेबाबत.**

**निर्णय क्र.३९२.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०४/२००५चे सभेतील निर्णय क्रं.१५९ अन्वये उपलब्ध ०८ बसेस पैकी श्री साईभक्तांचे सोयी करीता एस.टी.बसचे प्रचलित दरात १०% सुट देऊन दि.०६/०८/२००५ पासून भक्तनिवास कडील ०२ बसेस शिरडी-नगरसुल रेल्वेस्टेशन- शिरडी करीता सवलतीचे दरात प्रति सिट रू.२५/- इतका सेवाआकर घेऊन सुरू करण्यात आलेल्या आहेत.

मा.श्री सी.एच.मोहन, अॅडिशनल डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर, नांदेड डिव्हिजन यांनी संदर्भिय पत्राने श्री साईभक्तांचे मागणी नुसार नगरसुल रेल्वे स्टेशन ऐवजी रोटेगांव रेल्वे स्टेशन (वैजापूर) येथे खालील वेळात रेल्वे थांबणार असून, श्री साई भक्तांना दर्शना करीता ने-आण करणे कामी रोटेगांव (वैजापुर) येथे एस.टी. महामंडाळाच्या ०४-०६ बसेस ठेवणे बाबत त्यांनी एस.टी. महामंडाळाला कळविलेले आहे. तसेच आपले कडून चार बसेसची व्यवस्था करावी. अशी मागणी केलेली आहे.

| Sr.No. | Train | Day's | Buses required to/ From shirdi |
|---|---|---|---|
| 01. | 7064 (Kachiguda- Manmad Express) | Everyday | To be at Rotegaon Railway Station by 07:00 AM |
| 02. | 7063 (Manmad- Kachiguda Express) | Everyday | From Shirdi to Reach Rotegaon Railway Station by 06:00 PM |
| 03. | 1406 (Kakinada- Manmad Express) | Thursday Sunday | To be at Rotegaon Railway Station by 06:00 AM |
| 04. | 1405 (Manmad- Kakinada Express) | Thursday Sunday | From Shirdi to Reach Rotegaon Railway Station by 07:45 PM |

नगरसुल रेल्वेस्टेशन येथे रेल्वे थांबणे बंद होत नाही तो पर्यंत श्री साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन दोन बसेस पैकी एक बस नगरसुल येथे चालु ठेवण्यात येईल. व एक बस परिवहन कार्यालयाचे परवाना अटीचे पालन करुन एस.टी. बसेसच्या प्रचलित दरात १०% सुट देऊन रोटेगांव रेल्वेस्टेशन येथे चालु ठेवता येईल.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२००६रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४७अ ने नवीन दोन बसेस खरेदीच्या प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे. सदर बसेस खरेदी केले नंतर आवश्यक्ते नुसार तसेच बसेस उपलब्धते नुसार रोटेगांव रेल्वेस्टेशन करीता चालु करता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८.** **वाहनांसाठी टायर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.३९३.** वाहन विभागात एमएच-१७-९३७१, या बसचा वापर श्री साईभक्तांना शिरडी- नगरसुल रेल्वेस्टेशन-शिरडी असा साईभक्तांना ने-आण करणे करीता होत आहे. एमएच-१७/सी-९०१६ या बसचा वापर इंग्लिश मिडीयमची मुले ने-आण करणे करीता होत आहे. तसेच एमएच-१७/एच-२८४या ट्रॅक्टरचा वापर बगीचा विभाग, बांधकाम तसेच इतर विभागाकडे होत आहे.

उपरोक्त तिन्ही वाहनांची टायर्स खराब झालेली असल्याने खालीलप्रमाणे ६ टायर्स, टयुब, फ्लॅपसह नामांकित कंपन्यांकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | वाहन क्रं. | वापर | एकूण | टायर साईज | टायर नग |
|---|---|---|---|---|---|

| | | | कि.मी. | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७/के-९३७१ | नगरसुल बस | ४८,७१४ | ९-००-२० टायर, टयुब, फ्लॅपसह | २ |
| ०२ | एमएच-१७/सी-९०१६ | स्कुल बस | ३८,००० | ९-००-२० टायर, टयुब, फ्लॅपसह | २ |
| ०४ | एमएच-१७/एच-२८४ | ट्रॅक्टर | ३७७८ तास | ६-००-१६ पुढील चाकाचे टायर, टयुब, फ्लॅपसह | २ |

(कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१९. अपंगांना तीन चाकी सायकल वाटपाबाबत.**

**निर्णय क्र.३९४.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ निर्णय क्र.८७ नुसार संस्थानमार्फत अहमदनगर जिल्हयातील अपंगांना ३००० नग तिन चाकी सायकली देणेकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी व त्यासाठीची नियमावली तयार करण्यात यावी असे ठरलेले आहे. इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-३/ ३७१६/ २००६, दि. १५.०३.२००६ अन्वये शासनाच्या मान्यतेकरीता पत्र पाठविलेले आहे.

दि. १५.०५.२००६ रोजी श्री साईबाबा (सुपर स्पेशालिटी) हॉस्पिटलचे उद्‌घाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्र महोदयांचे हस्ते अपंगांना तीन चाकी सायकल वाटप करावयाचे असल्याने २५ तीन चाकी सायकली खरेदी केलेल्या आहेत.

अपंगांना तीन चाकी सायकलचे वाटपाबाबत दि. ३०.०९.२००६ व दि. ०५.०५.२००६ चे वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात आलेली होती. वर्तमान पत्रातील अटी व शासनाचे नियमावलीस अधिन राहून खालील कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या अपंगांना दि. १५.०५.२००६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे हस्ते ११ सायकलींचे वाटप करण्यात आलेले आहे. कागदपत्रांची पुर्तता करुन घेऊन उर्वरित १४ सायकली वाटपाची कार्यवाही चालू आहे.

१.मा. तहसिलदार यांचा सन २००५-२००६ चा उत्पन्नाचा दाखला. (उत्पन्नाची मर्यादा रु. १८,०००/-),
२.अपंग हा दोन्ही पायांनी निकामी असल्याचा जिल्हा रुग्णालयाचा दाखला,
३.अपंगाचे वय १८ वर्ष पूर्ण असलेचा दाखला,
४.रहिवासी दाखला. (ग्रामसेवक, नगरपालिका, महानगरपालिका),
५.जिल्हा समाजकल्याण कार्यालयाकडून सायकल मिळाली नसलेचा दाखला,
६.अपंगाचा पूर्ण फोटो.

तरी शासनाने विहीत केलेल्या वरील नियमावलीस, मा. मुख्यमंत्री महोदयांचे हस्ते केलेल्या ११ सायकलींच्या वाटपास कार्योत्तर मान्यता असावी तसेच अपंगांच्या मागणीप्रमाणे मान्य दराने टप्प्याटप्प्याने सायकली खरेदीस व त्या महाराष्ट्राऐवजी अहमदनगर जिल्हयातील अपंगांना वाटप करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.. २०."वारकरी भवन" श्री विठ्ठल मंदिराचे बांधकामास आर्थिक मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.३९५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१. उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.३९६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-३ )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.. २२. श्री गुरुपौर्णिमा उत्सव २००६ मध्ये रांगोळी काढणेबाबत.**

**निर्णय क्र.३९७.** उपरोक्त विषयानुसार श्री गरुपौर्णिमा उत्सव- २००६ हा सोमवार, दि. १०.०७.२००६ ते बुधवार दि. १२.०७.२००६ अखेर तीन दिवस साजरा होणार असून सदरचे उत्सवात अल्पना- ए ग्रुप ऑफ क्रिएटिव्ह आर्टिस्ट, द्वारा श्री मुकुंद मा. शिर्के, बरोडा यांनी आपले दि. ११.०५.२००६ चे फॅक्स मध्ये श्री गरुपौर्णिमा उत्सवात तीन दिवस शिर्डी येथे रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्याचे योजिले आहे. सदरची संस्था बडोदे शहरात १९९७ पासून ड्रॉईंग, पेंटिंग व विशेषकरुन रांगोळी पेंटींग इ. बाबतीत दिवाळी, नवरात्री उत्सवात प्रदर्शन करीत असतो. अशाप्रकारच्या प्रदर्शनासाठी प्रवेश फीही आकारली जाते. यामध्ये अंदाजे १५-२० कलाकार असतात, ते साधारणपणे ४ दिवस रात्रंदिवस राबून ६ x ४ फूटाच्या काढत असतात, अशाप्रकारे ते १० रांगोळया काढतात. सदरचे कलाकार हे धार्मिक, सामाजिक, नैसर्गिक इ. प्रकारची रांगोळी काढू शकतात. श्री साईबाबा संस्थानमार्फत त्यांना खालीलप्रमाणे सहयोग अपेक्षित आहे.

०१. साधारण २० फूट बाय ६० फूट चा मोठा हॉल,

०२. साधारण १० कलाकारांच्या (लेडीज व जेन्टस) यांची ६-७ दिवस निवास व भोजन व्यवस्था,
०३. काढलेल्या रांगोळयांचे फोटो इच्छुक व्यक्तिस विकण्याची ग्रुपला परवानगी.

उपरोक्त प्रमाणे सुविधा उपलब्ध झालेस रांगोळी प्रदर्शन विनामुल्य आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे.

उत्सव कालावधी असलेने गर्दी होण्याची शक्यता आहे. २० बाय ६० फुटचा हॉलसाठी जागा निश्चिती करुन जागा उपलब्ध होऊ शकेल. कलाकारांची निवास व भोजन व्यक्तिस विकण्याची ग्रुपला परवानगी देणेबाबत विचार करावा लागेल, कारण हा व्यवसाय केल्यासारखा होईल, असे नम्र मत आहे.

तथापि, श्री गुरुपौर्णिमा उत्सवात तीन दिवस जागा निश्चित करुन रांगोळी प्रदर्शन विनामुल्य भरविणेस, संबंधीतांची निवास, भोजन इ. व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेस तसेच त्यांनी काढलेल्या रांगोळयांचे फोटो इच्छूक व्यक्तिस विकण्याची ग्रुपला परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. श्रीरामपूर भूसंपादन कक्षास मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.३९८.** संस्थानकरीता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळातील सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा.उपविभागीय अधिकारी महसूल श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे.सदर कक्षाची मुदत वेळोवेळी वाढविण्यात आलेली असून दि.३१/०८/२००५ अखेर कक्षाची मुदत संपल्यानंतर सदरचा कक्ष बंद करण्यात आला होता.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी संस्थानकडील भू-संपादनाबाबत सात प्रकरणे या कक्षामार्फत चालू असल्याने दि.०१/१०/२००५ रोजी मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या संस्थान कमीटीचे बैठकीत सविस्तर आढावा घेवून झालेल्या चर्चेनुसार संस्थानकडील भू-संपादन विषयक कामे पार पाडण्यासाठी स्वतंत्र कक्ष उघडण्यात आलेला असून हा कक्ष यापुढेही चालू ठेवणे आवश्यक आहे.

तरी प्रस्ताव प्रमाणे संस्थानचे कर्मचारी वर्गास दि.३१/०८/२००६ अखेरपर्यंत मुदतवाढ मिळावी असे कळविले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/११/२००५ रोजी झालेल्या सभेमध्ये चर्चा होवून सदर कक्षाची मुदत दि.०१/११/२००५ पासून दि.३०/०४/२००६ अखेर पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

त्यानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६१०/२००५ दि.३१/१०/२००५ अन्वये संबंधीत कक्षाची मुदतवाढ केल्याबाबतचा व या कक्षाकडे काम पहाणेकामी नायब तहसिलदार संवर्गातील रिक्त असलेल्या पदावर श्री डी.व्ही.रायपल्ली,कंत्राटी सल्लागार यांनी काम पहावे.असे आदेशीत करण्यात आलेले आहे.

मा.व्यवस्थापन सभेतील निर्णयानुसार सदर कक्षाची वाढविण्यात आलेली सहा महिन्यांची मुदतवाढ दि.३०/०४/२००६ अखरे संपुष्टात आलेली आहे.

सदर कक्षाकडे अद्याप भू-संपादनाची कामे प्रलंबीत आहेत.तरी सदर कक्षास सहा महिने मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २४. श्री साईबाबा रुग्णालयात अॅनस्थेसियालॉजिस्ट म्हणून डॉ.प्रकाश एस.रेठे यांचे नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.३९९.** डॉ.प्रकाश एस.रेठे यांनी दि.०६/०५/२००६ रोजी अर्ज सादर करुन त्यात, "I the undersigned, Dr.P.S.Rethe am M.D.(Anaesth) from poona University,I passed M.D.in Dec.1983. I have total experience of 22 years as Anaesthesiologist after M.D.I am well conversant with handling Anesthesia for Surgical cases of different surgical specialties except Open Heart Surgery.Expected Salary Rs.35000/- month (Negotiable) Free Accommodation.I am Sending copies of my degree certificates.Expecting earliest response from your side." अशी विनंती केलेली आहे.

या पत्रावर वैद्यकीय संचालक यांनी दि.२७/०५/२००६ चे टिपणीत Dr.P.S.Rethe may be called for Interview as we are in need of anaesthatist.Pay may be decided after negotiation in interview for consideration.At present no anaesthetist available this hospital Dr.Sachin Khochikar appointed to Saibaba hospital.working at Sainath hospital there are ६ Sr.Anaesthetists & १२ Jr.Anaesthetists post.He may be appointed on urgent basis."असे अभिप्राय दिलेले आहेत.

शासनाकडील मंजूरीसाठी पाठविलेल्या आकृतीबंधात सिनि. ॲनास्थेसियालॉजीस्ट या पदासाठी प्रतिमहा रु.२९९४८/- व ज्यु.ॲनास्थेसियालॉजीस्ट या पदासाठी प्रतिमहा रु.२४९००/- मानधन दर्शविलेले आहे.

उपरोक्त अर्जदार डॉ.रेठे,एम.डी.ॲनेस्थेसिया यांची श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी आवश्यकता असल्याने त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मुलाखतीसाठी हजर राहण्यास दूरध्वनीवरुन कळविलेले आहे. त्यानुसार डॉ.रेठे यांची मुलाखत घेण्यात आली व त्यांना प्रतिमहा रुपये ३०,०००.०० एकत्रित मानधनावर ॲनास्थेसियालॉजीस्ट नेमणूक देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५. डॉ.विजय नरोडे ,भूल तज्ञ,यांचा मानधन वाढवून मिळणेबाबतचा अर्ज.**

**निर्णय क्र.४००.** डॉ.विजय शुक्लेश्वर नरोडे यांची संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वैद्यकीय अधिकारी (इंन्टेन्सिव्हिस्ट) या पदावर जा.नं.एसएसएस/वशी-०१/१९१५/२००६ दि.११/०२/२००६ चे आदेशान्वये शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या पदनिहाय वेतनश्रेणी व आकृतीबधाचे अधीन राहून रु.१०,०००-१५,२०० या वेतनश्रेणीत रु.२५,०००/- (रु.पंचवीस हजार) मात्र एकत्रीत मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.१८/०२/२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटलकडे नेमणूकीचे पदावर हजर झालेले आहेत.

आता,त्यांनी दि.२६/०५/२००६ रोजी अर्ज करुन त्यात," मी डॉ.विजय नरोडे श्री साईबाबा हॉस्पीटल येथे १४/०२/२००६ पासून इंन्टेन्सिव्हिस्ट वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे.माझा इंन्टरहयु दि.१२/०१/२००६ रोजी मुंबई येथील कार्यालयात झालेला आहे.मुलाखती दरम्यान मला रु.३०,०००/- मानधन ठरविण्यात आले होते.हया संदर्भात मी येथे कामावर रुजू होण्यापूर्वी आपल्याशी चर्चा करुन व आपल्या संमतीने रु.२५०००/- मानधनावर कामावर रुजू झालो होतो.तरी आपण माझे मानधन रु.३०,०००/- करुन द्यावे." अशी विनंती केलेली आहे.

शासन मान्यतेसाठी पदनिहाय वेतनश्रेणीनुसार पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधामध्ये वरिष्ठ अतिदक्षता तज्ञ (सिनिअर इंन्टेन्सीव्हीस्ट) या पदासाठी शैक्षणिक पात्रता एम.डी./ॲनेस्थेसियालॉजी/ एफ.सी.सी.एम. हि पात्रता नमूद करण्यात आलेली असून सदर पदासाठी रु.१०,०००-१५,२०० (५ वेतनवाढीसह) या वेतनश्रेणीत एकूण पगार रु.२९,९४८/- इतका दर्शविण्यात आलेला आहे.

तसेच सहा.अतिदक्षता तज्ञ (ज्यु.इंन्टेन्सीव्हीस्ट) या पदासाठी शैक्षणिक पात्रता एम.डी./एम.बी.बी.एस./टि.डी.डी.विंथ डी.एस. हि पात्रता नमूद करण्यात आलेली असून सदर पदासाठी रु.१०,०००-१५,२०० या वेतनश्रेणीत एकूण पगार रु.२४,९००/- इतका नमूद केलेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे दि.१०/०१/२००६ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीचे वेळी सिनियर इंन्टेंसिव्हीस्ट या पदासाठी डॉ.विजय नरोडे एम.डी.(ॲनास्थेसियालॉजीस्ट) हे एकच उमेदवार हजर होते

तथापि त्यांची इंन्टेन्सीव्हीस्ट या पदासाठी निवड करण्यात येवून त्यांना सहा महिन्यांसाठी नियुक्ती पत्र देण्यात आले या ६ महिन्याचे काळातील त्यांच्या कामाच्या स्वरुपावरुन पुढील नियुक्तीबाबत विचार करण्यात यावा.असे सभेत ठरलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/११/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ नुसार जा.नं. एसएसएस/वशी-०१/७५/२००६ दि.०७/०१/२००६ वैद्यकीय शास्त्रातील स्नातोकत्तर पदवीधारकास पदवी नंतरचा ५ वर्षांचा अनुभव असल्यास प्रतिमहा एकत्रीत रु.२५,०००/- द्यावेत असे नमूद केलेले आहेत.

सदर मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय, डॉ.विजय नरोडे यांची शैक्षणिक पात्रता व त्या पदावरील कामाचा अनुभव विचारात घेवून त्यांना नेमणूक देतांना रु.२५,०००/- प्रतिमहा एकत्रीत मानधन दिलेले आहे.

तरी सदर पदासाठी शासनाकडे पाठविण्यात आलेल्या आकृतीबधातील पदनिहाय वेतनश्रेणीच्या अधीन राहून डॉ.विजय नरोडे यांना दरमहा रु.२५,०००/- ऐवजी दरमहा रु.३०,०००/- एकत्रीत मानधन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६. हृदय शस्त्रक्रिया/ॲन्जीओप्लॅस्टी/प्लास्टीक सर्जरी व इतर बीलात सवलतीबाबत.**

**निर्णय क्र.४०१.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संचलित सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करण्यात आलेले असून दि. ०६.०५.२००६ रोजी पहिली ओपन हार्ट बायपास सर्जरी व ॲन्जीओप्लास्टी सर्जरी करण्यात आलेली आहे. दि. १५.०५.२००६ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते उद्घाटन झालेपासून मोफत

शस्त्रक्रिया, मोफत सिटी स्कॅन, बिलांत सवलत इ. कामी परिसरातील रुग्णांनी अर्जाद्वारे व समक्ष भेटून वेळोवेळी विनंती केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | अर्जदार/ रग्ण नाव | आजाराचे स्वरुप | येणारा खर्च |
|---|---|---|---|
| १ | सौ. सुमनबाई भाऊराव धोंगडे, अ.नगर | अॅन्जीओपलास्टी | रु. ७६,०००.०० |
| २ | सौ. गिता बबन केदार, शिर्डी | बलून व्हॉल्वोप्लास्टी | रु. २५,०००.०० |
| ३ | श्री. भिमा कृष्णा दाभाडे, नांदुर्खी | हृदय बायपास सर्जरी | खर्च उल्लेख नाही. |
| ४ | श्री. सुहास सयाजी बनसोडे, साकुरी | अॅन्जीओपलास्टी | रु. ५०,०००.०० |
| ५ | श्री. नथुराम दगडु मुंढे, म्हाळादेवी | अॅन्जीओग्राफी | खर्च उल्लेख नाही. |
| ६ | श्री. नाराण निवृत्ती चोळके, अस्तगाव | अॅन्जीओग्राफी | खर्च उल्लेख नाही. |
| ७ | श्री. परशराम तुकाराम साबळे, सात्रळ | अॅन्जीओग्राफी | खर्च उल्लेख नाही. |
| ८ | श्रीमती उषा विलास सोनवणे | सिटी स्कॅन | रु. १,४००.०० |
| ९ | श्रीमती संगिता सोमनाथ सांगळे, गोगलगाव | प्लॅस्टीक सर्जरी | रु. १०,०००.०० |
| १० | श्री. क्षिरसागर कारभारी मनाजी | अॅन्जीओपलास्टी | रु. ५०,०००.०० |
| ११ | श्री. अशोक रामचंद्र गाडेकर, गंगापूर | अॅन्जीओग्राफी | रु. ६,०००.०० |
| १२ | श्री. निलेश रामचंद्र बंगाल, पढेगाव | सिटी स्कॅन | रु. १,४००.०० |

उपरोक्त नमूद अर्जदारांनी नमूद केलेल्या आजारांसाठी सवलत मिळणेकामी अर्ज दाखल केलेले आहे. परंतु हॉस्पिटल नव्यानेच चालू झाले असलेने अद्यापपावेतो बिलांत सवलत देणेकामी नियमावली ठरलेली नसल्याने निर्णय घेता येत नाही. येथून पुढेही अशा प्रकारे सवलती मिळणेकामी अर्ज येत राहतील. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दारिद्र्य रेषेखालील कार्डधारकांनी बिलांमध्ये सवलतीची मागणी केल्यास पूर्ण रकमेपर्यंत माफी देणेत येते. इतर पेशंटला त्यांचेशी आर्थिक क्षमतेबाबत चर्चा करुन सवलत देणेत येते. याबाबत रु. १०००/- पर्यंत सवलत देणेचे अधिकार वैद्यकिय अधिक्षिका, त्यानंतर १ ते ५ हजार पर्यंत प्रशासकीय अधिकारी (रुग्णालये) व त्यानंतरच्या सवलतीचे अधिकार मा. कार्यकारी अधिकारी यांना दिलेले आहेत.

मा.उपसमिती सभा दि.२५.०५.२००६ मध्ये सदर विषयावर चर्चा होऊन शासकीय नियमालीनुसार नियमावली ठरविणेत यावी असे ठरलेले आहे. शासकीय सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची नियमावली अद्याप प्राप्त झालेली नसल्याने दरम्यानचे काळात सवलत देणेकामी तात्पुरती नियमावली करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तबाबत स्थानिक समिती सदस्यांनी याबाबत चर्चा करुन नियमावली ठरवावी तसेच दरम्यानचे काळात दिनांक १५.५.२००६ चे सभेतील निर्णय क्र.३०८ अन्वये प्रत्येक ब्रँचमध्ये २० % चॅरिटी देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अधिन राहून दारिद्र्य रेषेखालील कार्डधारक रुग्णांना संपूर्ण सवलत देण्यात यावी. तसेच इतर रुग्णांना श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांना देत असलेल्या सवलतीचे नियमावलीनुसार बिलामध्ये योग्य ती सवलत देण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७. गरीब व गरजू रुग्णांना संस्थान मार्फत देण्यात येणाऱ्या अनुदान नियमावलीस मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी दिलेल्या मान्यतेबाबत.**

**निर्णय क्र.४०२.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी मार्फत देण्यात येणारे वैद्यकीय आर्थिक अनुदानसाठी संस्थानने एक स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे या नियमावली नुसार देण्यात येणारे वैद्यकीय आर्थिक अनुदान पुर्ववत सुरू ठेवणेबाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचे मान्यतेसाठी खालील संदर्भीय पत्रान्वये पाठविण्यात आलेला होता.

१.जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/८०/२००५ दि.०३/०१/२००५.
२.जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/३२५४/२००५ दि.३१/०३/२००५.
३.जा.नं.एसएसएस/एसएसएच/५८०८/२००५ दि.०१/०६/२००५.
४.जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/१२५१९/२००५ दि.०२/११/२००५.
५.जा.नं.एसएसएस/वशी/अध्यक्ष/स्वीय/५८१०/२००५ दि.०२/०६/२००५.

सदर प्रस्तावास अनुसरून मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई यांनी जा.नं.सासंवि-२००५/३७६/(७६)-का.सोळा,दि.०५/०५/२००६ चे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,(शिरडी)अधिनियम २००४ मधील कलम १७(१) व १७(२) (ण) या तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेने तयार केलेल्या नियमावलीप्रमाणे गरीब व गरजु रुग्णांना संस्थान मार्फत देण्यात येणा-या वैद्यकीय अर्थसहाय्याच्या योजनेस पुढील अटीस अधीन राहून शासन मान्यता दिलेली आहे.

१) विश्वस्त मंडळाने मान्य केलेली,गरीब व गरजु रुग्णांना संस्थान मार्फत देण्यात येणा-या वैद्यकीय अर्थसहाय्याबाबतची नियमावली, संस्थानमार्फत आदेशाच्या स्वरुपात प्रसिध्द करण्यात यावी. त्याच्या प्रती संस्थानच्या विविध विभागांसह सर्व संबधिताना निर्गमित कराव्यात.
२) सदर नियमावली काटेकोरपणे अंमलात आणावी.

३) सदर योजना अंमलात आणण्याकरीता निधीची तरतुद त्या त्या वर्षीच्या अंदाज पत्रकात करावी, व त्यास शासन मान्यता घेण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत या तरतूदीपेक्षा जास्त खर्च होवू देऊ नये.
४) सदर योजना राबविण्याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिरडी), अधिनियम २००४ मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता नाही.
५) सदर योजनेच्या नियमावलीतील अटींमध्ये व्यवस्थापन समितीच्या सहमतीने सुधारणा करण्याचे अधिकार शासनास आहेत.

या अटीच्या अधीन राहुन शासनाने पुर्ववत अनुदान सुरू ठेवणेस मान्यता दिलेली आहे. मात्र त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांनी तयार केलेली वैद्यकीय अर्थिक अनुदान नियमावली व शासनाने घालून दिलेल्या अटी यांचे काटेकोरपणे पालन करणे अत्यावश्यक आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, येथूनपूढे या नियमावलीनुसारच वैद्यकीय अनुदान मंजूर करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८. श्री.आवारे गोरख रखमाजी,वाकड, यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४०३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९. मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथे संस्थानतर्फे सुरु करण्यात आलेल्या बांधकाम प्रकल्पांकडे जाणाऱ्या जोड रस्त्याचे खडीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.४०४.** मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील शेती महामंडळाकडून ताबा घेतलेल्या जमीनीसाठी रस्ते विकसीत करणे कामांसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १८.१२.२००५ चे सभेतील निर्णय क्र. ७४२ अन्वये मे. पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगाव यांची निविदा मंजूर करण्यात आलेली आहे.

सदर रस्त्यांची कामे संस्थानचे निधीतून हाती घेणेसाठी मान्यता मिळणे कामाचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पत्र क्र. १०५४०, दि.२२.०९.२००५ द्वारे मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय- मुंबई-३ यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. सदरचे प्रस्तावास अद्याप मंजूरी मिळालेली नाही.

सध्या गट नं. ८०,८५ मध्ये नविन प्रसादालय इमारत व गट नं. १६९ मध्ये वर्ग- ४ कर्मचारी निवासस्थाने यांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सदर भुखंडांना नगर-मनमाड रस्त्याशी जोडणारे रस्ते कच्च्या स्वरुपाचे आहे. सध्या पावसामुळे सदर रस्त्यावर चिखल होऊन ठेकेदार यांची वाहने साईटवर नेणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे सदर चालू असलेले बांधकामांना अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर रस्त्यांपैकी बांधकाम साईटपर्यंतचे लांबीमध्ये किमान खडीरकणाचे काम त्वरेने करणे गरजेचे आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| ०१ | नगर-मनमाड रस्ते गट नं. ८७,८८ रस्ता डांबरीकरण करणे. (लांबी ४४० मी. रुंदी ३.७० मी.) | २,८८,६०२.०० |
| ०२ | नगर-मनमाड रस्ता ते साईप्रसाद हौसिंग सोसायटी रस्ता रुंदीकरणांतर्गत खडीकरण करणे. (लांबी ४९५ मी. रुंदी ३.७० मी.) | ३,११,३७४.०० |

उपरोक्त प्रकल्प वेळेत पूर्ण करणेसाठी सदर रस्त्यांचे खडीकरण सत्वर करणेचे आहे. त्यासाठी ठेकेदार मे. पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगाव यांचेकडून त्यांचे मंजूर निविदा दरानुसार ते सदर कामापैकी वरील रस्त्यांची कामे करण्यास तयार असतील तर त्यांचेकडून करुन घेता येतील. अथवा प्रसादालय व कर्मचारी निवासस्थाने बांधकामांचे ठेकेदार अनुक्रमे आय.व्ही. आर. सी. एल. व अस्मिता कन्स्ट्रक्शन यांचेकडून त्यांचे संबंधित निविदादराने करुन घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावित रस्त्यांची कामे ठेकेदार मे.पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,, कोपरगांव यांचेकडून त्यांचे मंजूर निविदादरानुसार डांबरीकरणासह करुन घेणेस व त्यासाठी येणारे योग्य खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३० नविन प्रसादालय इमारत बांधकाम व्यवस्थापन सल्लागार टी.सी.ई. कन्सल्टींग इंजिनिअर्स लि., पुणे यांचे मागणीबाबत.**

**निर्णय क्र.४०५.** संस्थानमार्फत मौजे निमगाव-कोऱ्हाळे गट नं. ८०,८५ मधील जागेत बांधण्यात येत असलेल्या नविन प्रसादालय इमारतीचे बांधकामाचे काम मे. आय.व्ही. आर. सी. एल. इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि., पुणे यांना देण्यात आलेले असून सदरचे कामस सुरुवात झालेली आहे.

उपरोक्त प्रकल्पासाठी संस्थानचे वतीने प्रत्यक्ष कामावर दैनंदिन देखरेख ठेवणे, गुणवत्ता व बिले तपासणे, नियोजीत वेळेत प्रकल्प पूर्ण करुन घेणे इ. कामे टी.सी.ई. कन्सल्टींग इजिनिअर्स लि., पुणे यांची मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २४.०४.२००६ मधील निर्णय क्र. २६१ नुसार बांधकाम व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जा.नं.६४१५, दि. १८.०५.२००६ चे पत्रान्वये त्यांना नेमणूक आदेश देणेत आलेला आहे.

बांधकाम व्यवस्थापन सल्लागार मे. टी.सी.ई. कन्सल्टींग इजिनिअर्स यांनी त्यांचे दि. ०४.०५.०६ चे प्रस्तावानुसार सदर सेवा पुरविणेसाठी प्रती व्यक्ती महिना (man month) रु. ९२,०००/- मात्र याप्रमाणे एकूण २० महिन्याकरीता (man month) कालावधी रु. १८,४०,०००/- इतकी फी अधिक १२.२४% (प्रचलीत दराने) सर्व्हिस टॅक्सची मागणी केलेली आहे. सदर फी मध्ये प्रतीपूर्ती व काही आस्थापना खर्चाचा समावेश आहे. वरीलपैकी मेकॅनिकल इंजिनियर्सची आवश्यकता पडणार नाही. कारण त्यासाठी स्वतंत्र सल्लागार नेमण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर कामासाठी एकूण १६ व्यक्ती महिने काम होईल.

उपरोक्त दर दि. ३१.०५.२००६ अखेर लागू राहतील व त्यानंतर वार्षिक ८% वाढ मिळणेबाबत कळविले आहे. तसेच सल्लागार यांचे शिर्डी येथील साईटवरील कर्मचारी/ अधिकारी यांना संस्थानमार्फत खालील सुविधा मोफत मिळाव्यात असे कळविले आहे.

१. सल्लागार यांचे कर्मचारी/ अधिकारी यांना स्थानिक वहातूक सुविधा,
२. निवासव्यवस्था,
३. फर्निचरसह कार्यालय (पिण्याचे पाणी, विद्युत व स्वच्छतागृह इ. सुविधांसह)
४. साईट कार्यालयामध्ये दुरध्वनी, संगणक, ई-मेल, इंटरनेट, फॅक्स, झेरॉक्स इ. सुविधा,
५. याव्यतिरिक्त संस्थानने बांधकाम व्यवस्थापक यांचे मदतीसाठी पात्र पर्यवेक्षकिय मनुष्यबळ पुरवावे.

सदरचा प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाल्यास त्या कालावधीमध्ये वरील सुविधा वाढीव कालावधीही संस्थानमार्फत पुरविण्यात याव्यात. साईटवरील कर्मचारी/ अधिकारी सदर प्रकल्पाच्या कामाकरीता बाहेरगावी गेल्यास त्याचा प्रवास खर्च तसेच रहाण्याच्या खर्चाची प्रतिपूर्ती संस्थानने करावी.

मा. विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी दि. २७.०५.२००६ रोजी दुरध्वनी संदेशाद्वारे सल्लागार यांचे शिर्डी कार्यालयासाठी स्टील कपाट, दोन टेबल, १ कॉन्फरन्स टेबल, संगणक टेबल, संगणक व खुर्च्या इ. खरेदी करणेकामी योग्य तो प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेबाबत कळविले आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे सल्लागार मे.टी.सी.ई. कन्सल्टींग इंजिनिअर्स, पुणे यांना १६ व्यक्ती महिन्यांसाठी (man month) त्यांचे मागणीप्रमाणे रु. ९२,०००/- प्रती व्यक्ती महिना + १२.२४% सर्व्हीस टॅक्स+वर नमुद केलेल्या सुविधा तसेच फर्निचर व संगणक इ. साहित्य सल्लागार यांचे शिर्डी कार्यालयास देणेकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा विषय नं.३१.**
**निर्णय क्र.४०६.**

**श्री.प्रताप शंकरराव जगताप, शिर्डी यांची जमिन स.नं.११५ क्षेत्र २ हेक्टर ९ आर भू-संपादनाने घेणेबाबत**

श्री. प्रताप शंकरराव जगताप, शिर्डी यांनी त्यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. ११५ मधील ०२ हेक्टर ०९ आर जमीन संस्थानला विकत देणेबाबत दि. १८.०८.२००५ रोजीच्या अर्जाने प्रस्ताव दिला आहे.

स. नं.११५ चा ७/१२ उतारा पहिला असता ०२ हे.०३ आर जमीन अधिक खराबा ० हे.०६ आर असे २ हे.०९ आर. आहे.

**अ)** मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचेकडील पत्र क्र.न.पं.बांध./ कावि-५/ ६८४/ २००५, दि. १९.०९.२००५ अन्वये कळविले आहे की, विकास यांजनेनुसार स.नं. ११५ हा ना विकास विभाग (शेती विभाग) मध्ये समाविष्ट आहे. म्हणजे सदर जमीनीचा वापर फक्त शेतीच्याय कामासाठी होणार आहे.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यानी सदरचा स.नं. हा रहिवासी झोनमध्ये घेणेबाबत शसनाकडे प्रस्ताव पाठविला व शासनाने मंजूरी दिली तरच हया जमिनीचा वापर बिनशेती कारणासाठी करण्यात येईल.

**ब)** भविष्यात सदर जमिनीचा वापर शैक्षणिक संकुल तसेच संस्थानच्या विविध लोकोपयोगी कामासाठी होणार आहे. उपरोक्त जमिन भुसंपादन कायदा १८९४ च्या तरतुदीनुसार कन्सेन्ट ॲवार्डने घेणे उचित राहिल. भुसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे पाठविणेपूर्वी मा. सहाय्यक संचालय, नगररचना, अहमदनगर यांचा अभिप्राय घेणेत येत आहे.

**क)** किंमतीबाबत:- सर्व्हे नंबर ११५ हा ना विकास विभागत येत असून विभाग क्र.१/६४ आहे. त्याचा प्रती चौरस मीटरला दर ५५०/- रुपये आहे. त्याप्रमाणे ०१ आरचा दर रु. ५५,०००/- येत आहे. जमिन बागाईत असल्यास त्याचा दर दुप्पट असतो. जमिनीत विहीर आहे व पिकपहाणीमध्ये पेरुची झाडाची नोंद आहे. यावर सदर जमिन बागाईत आहे. याप्रमाणे प्रत्येक आरची किंमत रक्कम रु. १,१०,०००/- होत आहे. अर्जदार याची मागणी रु. ७५,०००/- प्रती गुंठा म्हणजे जवळजवळ प्रती आरला आहे. खालील बाबतीत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

श्री. प्रताप शंकरराव जगताप, शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. ११५ मधील ०२ हेक्टर ०३ आर अधिक पोट खराबा ० हे. ०६ आर. अशी एकूण ०२ हे. ०९ आर. जमीन शैक्षणिक संकुल व संस्थानचे इतर लोकोपयोगी कामासाठी भुसंपादन प्रक्रियेतून कन्सेंट अॅवार्डने घेणेत यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२. श्री.प्रताप शंकरराव जगताप व धनंजय शंकरराव जगताप,शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील स.नं. १५४,१५५,१५६ व १५८ भू क्षेत्र ८ हेक्टर ९० आर जमिन भू-संपादनाने घेणेबाबत**

**निर्णय क्र.४०७. अ)** श्री. प्रताप शंकरराव जगताप व श्री. धनंजय शंकरराव जगताप, रा. शिर्डी यांनी त्यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १५४,१५५,१५६ व १५८ मधील जमीन संस्थानला मिळणेबाबत दि. १४.०७.२००५ रोजीच्या अर्जाने प्रस्ताव दिला आहे. प्रत्येक खातेदारांच्या जमिनीबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र<br>हेक्टर - आर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. प्रताप शंकरराव जगताप | १५४/१ | ०- ८८<br>०- ०२ पो. ख.<br>०- ९० |
| | | १५६/८ | २- ४४ |
| | | १५८/१ | १- ७४<br>२- ०२ पो. ख.<br>०- ७६ |
| | | १५८/२ | ०- ३३<br>०- ०१ पो. ख.<br>०- ३४ |
| | | **एकूण:** | **४- ४४** |
| ०२ | श्री. धनंजय शंकरराव जगताप | १५५ | ३-९८-००<br>०-०४-००<br>२-०२-०० |
| | | १५६/७ | २-४४-०० |
| | | **एकूण:** | **४-४६-००** |

**ब)** सदरच्या जमिनी सध्या शेती विभागत आहेत असे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी कळविले आहे. उपरोक्त जमिनी रहिवासी विभागामध्ये घालणेबाबत शिर्डी नगरपंचायतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. सदर जमिनीचाउपयोग संस्थानच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधणे व साईभक्तांच्या सोयीसाठी तसेच इतर लोकोपयोगी कामांसाठी उपयुक्त आहेत.

उपरोक्त जमीन वरील कारणांसाठी भुसंपादनाने घेता येईल किंवा कसे? याबाबत अभिप्राय घेणेत येत आहे.

**क)** जमिनीच्या किंमतीबाबत:-

रेडीरेकनर मध्ये सर्व्हे नं. १५४ चा दर प्रती चौ. मी.ला रक्कम रु. २३०/- दाखविलेला आहे. त्याप्रमाणे प्रती आर रु. २३,०००/- दर येत आहे. स.नं. १५५,१५६,१५८ चा दर प्रति चौ. मी. ला २१० आहे. याप्रमाणे प्रती आर दर रु. २,१००/- येत आहे.

वर नमुद केलेल्या जमिनीमध्ये फक्त स.नं.१५६/८ ही जमीन जिराईत आहे. बागायती जमीनचा दर हा रेडीरेकनर मध्ये दर्शविलेल्या दराच्या दुप्पट असतो. म्हणजे सर्व्हे नं. १५४ चा दर रु. ४६,०००/- प्रती आर व सर्व्हे नं.१५७ व १५८ चा दर रु. ४२,०००/- प्रती आर आहे.

उपरोक्त सर्व जमिनी लगतच आहे. दर रु. ४२,०००/- ते रु. ४६,०००/- असा रेडीरेकनर प्रमाणे येत आहे. सर्व्हे नं. १५५ मध्ये विहीर आहे. अर्जदार यांची मागणी प्रत्येक गुंठ्याला रु. ५०,०००/- मात्रची केली आहे. याबाबत वाटाघाटी होऊन दर निश्चित होणे आवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. २३-२४.०७.२००२ रोजीच्या झालेल्या सभेत उपरोक्त जमिनबाबत निर्णय क्र. ३५७ खालीलप्रमाणे झाला आहे.

" श्री. प्रताप शंकरराव जगताप व श्री. धनंजय शंकरराव जगताप, यांचे मालकीची सर्व्हे नं. १५४,१५५,१५६ व १५८ मधील एकूण २२ एकर जमीन संस्थानला विकत देणार असलेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. परंतु सदरहू क्षेत्र हे 'ग्रीन झोन' मध्ये येत असल्यामुळे ते खरेदी करण्यात येऊ नये, असे ठरले."

उपरोक्त जमीनी संस्थान कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, साईभक्तांसाठी निवासस्थाने व इतर लोकोपयागी कामासाठी उपयुक्त आहे. याच कारणासाठी जमीन संपादन करणेबकाबत नगररचना खात्याने मंजूरी दिली तर भुसंपादनाने घेणे योग्य राहिल.

खालील बाबतीत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

मौजे शिर्डी येथील श्री. प्रताप शंकरराव जगताप व श्री. धनंजय शंकरराव जगताप, त्यांच्या जमिनी सर्व्हे नं. १५४/१, १५६/८, १५८/२, १५५ व १५६/७ क्षेत्र ८ हे. ९० आर. जमीनी हया संस्थानच्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, साईभक्तांच्या सोयीसाठी तसेच संस्थानच्या विविध लोकोपयागी कामासाठी उपयुक्त असल्याने भुसंपादनाच्या माध्यमातून कन्सेंट अॅवार्डने घेणेत यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३३.** **शिरडी नगर पंचायत शिरडी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदुषण नियंत्रण कर (पथकर ) बाबत**

**निर्णय क्र.४०८.** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिरडी येथे दररोज हजारोंच्या संख्येने भक्त येत असतात. त्यातील बरेचशे साईभक्त स्वतःचे खाजगी वाहनाने प्रवास करतात. मात्र शिरडी येथे प्रवेश करण्यापूर्वी शहरातील दोनही बाजूस असलेल्या नाक्यांवर नगरपंचायतीमार्फत भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर (पथकर ) वसूल केला जातो.मात्र साईबाबा संस्थानकडूनच अशा प्रकारचा कर वसूल केला जातो.असा साईभक्तांचा गैरसमज होतो.त्यामुळे भक्तांच्या भावना दुखावतात.

उपरोक्त बाबी विचारांत घेऊन शिरडी येथे साईबाबांच्या भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून पथकर वसूल करण्यांत येऊ नये,अशी विनंती नगरपंचायतीकडे संस्थानचे पत्र क्रं.एसएसएस/वशी-०२/१३२१०/०४ दि.३१/१२/२००४ चे पत्रान्वये करण्यात आली आहे. याबाबत शिरडी नगरपंचायत यांनी दि. ११/०७/२००५ चे पत्रान्वये टोल नाक्यापासून प्रती वर्षी मिळणा-या रक्कमे एवढी रक्कम त्यांना मिळावी,सन २००४-२००५ साली रु.-४५,६१,९९०/-एवढी रक्कम त्यांना मिळाली,तेवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यांत २०% वाढ करण्यात यावी,५ वर्षाची आगाऊ रक्कम भरावी अशा आशयाचे पत्र इकडेस पाठविले आहे. संस्थानकडून निश्चित धोरण त्यांना कळविल्यास मंजूरीसाठी शासनास त्यांनाही प्रस्ताव पाठविता येईल असेही त्यांनी कळविले आहे. सदर प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ व दि. १८/०९/२००५ चे सभेत निर्णय क्रं. ४३८ झालेला आहे. शिरडी नगरपंचायतीस निव्वळ होणारे उत्पन्न हिशोबी धरुन त्याबाबतची माहिती प्राप्त करुन घेऊन त्या आधारे निव्वळ येणारे उत्पन्नाचे अनुसंधाने अनुदान ठरवावे लागेल. असा प्रस्ताव दि.१८/०९/२००५ चे सभेत मांडण्यात आला होता. त्याबाबत सविस्तर चर्चा होऊन विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगरपंचायत शिरडी यांना द्यावयाचे अंशदानाबाबत प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपंचायत यांनी द्यावयाचे रक्कमेबाबत मा.जिल्हाधिकारी,अ.नगर व स्थानिक विश्वस्त यांचे संमतीने याबाबत अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले आहे.

उपरोक्त ठरांवास अनुसरुन दिनांक ०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेत सदरचा विषय सादर करण्यात आला होता.त्यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास खालील प्रमाणे तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांकडून शिरडी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर आकारु नये ,याकरीता शिरडी नगरपंचायत यांनी मागणी केलेली रक्कम प्रतिवर्षी रु.३९,६१,९९०/- पुर्णांकित रुपये- ४०,००,०००/- (अक्षरी रुपये- चाळीस लाख ) मात्र प्रती तीन महिन्यास रुपये- १०,००,०००/- (अक्षरी रुपये- दहा लाख ) मात्र याप्रमाणे आगाऊ रक्कम शिरडी नगरपंचायतीस देण्यात यावी, असे मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांनी सांगितले. सर्वानुमते त्यास मान्यता देण्यात आली. सदरहू विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करावा, त्यानंतर याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी,शासनाचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे ठरले. यांस दि.०५/११/२००५ च्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक ६५१ (६) अन्वये मान्यता देण्यात आली आहे.शासनाचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे ठरले. यांस दिनांक ०५/११/२००५ च्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमांक ६५१ (६) अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी अधिनियम-२००४ चे कलम २१ (२) (सी ) चा विचार करता नगरपंचायत शिरडीस अनुदान देणेबाबत शासनाची पुर्व परवानगी घेणे जरुरीचे आहे. व त्याप्रमाणे संस्थानने जा.क्र.एसएसएस/वशी-०२/१३०५४/२००५ दि. ०९/११/२००५ चे शासनाची परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. अद्याप सदर परवानगी प्राप्त होणेवर आहे.

मा. श्री कैलास (बापू ) कोते पाटील,अध्यक्ष,शिरडी नगरपंचायत यांनी नगरपंचायतीचे टोलनाका बंद केला असून **संस्थानने फेब्रुवारी / मार्च / एप्रिल -२००६ रुपये- १० लाख (अक्षरी रुपये-दहा लाख )** मात्र रक्कम अदा करावी अशी आज रोजी विनंती केलेली आहे. त्याबाबत शासनाकडे टोलनाका रक्कम नगरपालिकेस देणेबाबतचे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला असल्याचे सांगण्यात आले.

०१) शासनाची मंजूरी प्राप्त होणेबाबत ते प्रयत्न /पाठपूरावा होत आहे.

०२)  शिरडी नगरपंचायत यांनी टोलनाका बंद केला ,तसेच रक्कम मिळणेबाबत अध्यक्ष, नगरपंचायत, शिरडी यांनी विनंती केली आहे. **फेब्रुवारी /मार्च/एप्रिल -२००६ या ३ महिन्याची रुपये- १० लाख (अक्षरी रुपये-दहा लाख** ) अदा करणेबाबत त्यांची मागणी आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे पूर्वीचे ठरावानुसार शासनाचे मंजूरीनंतर रक्कम अदा करण्याचे ठरविण्यात आले होते. शासनाची मंजूरी प्रलंबित आहे.परंतू शिरडी नगरपंचायतीकडून यापूर्वी रक्कम **रुपये -१० लाखाची** आग्रहाची मागणी केली होती व सदर रक्कम **दिनांक १०/०४/२००६** रोजी अदा केली आहे. आताही रक्कम **रुपये- १० लाखाची** मागणी आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता ,शिरडी नगरपंचायत शिरडी यांना पथकर अनुदानाची **फेब्रुवारी/ मार्च / एप्रिल -२००६ या ३ महिन्याची रुपये- १० लाख (अक्षरी रुपये-दहा लाख )** मात्र ची करण्यात आलेली मागणी मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४. श्रीसाईबांबाचे जीवनचरीत्रावरआर्ट गॅलरी तयार करणेबाबत..**

**निर्णय क्र.४०९.** श्रीसाईबांबाचे जिवनचरीत्रावर आर्ट गॅलरी तयार करणेकामी आर्टिस्ट श्री. व्ही.व्ही.सपार, सोलापूर व सुनिल शेगावकर, पुणे व श्री हेमंत वाणी, शिर्डी यांनी सुचविलेल्या विषयावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०३/२००६ निर्णय क्र. ११९ अन्वये चर्चा हाउन सुनिल शेगावकर यांनी ८'x५' साईजचे पेटींगसाठी दिलेल्या रु. ५०,०००/- प्रती पेटींग दर कमी स्वरुपाचा असल्याने ४० पेंटीगपैकी २० पेटींग श्री.शेगावकर व उर्वरीत २० पेंटीग पैकी दहा पेंटीग सपार १० पेंटीग हेमंत वाणी यांचेकडून श्री शेगावकर यांनी देऊ केलेल्या ८'x५' साईज व दरात करुन घेणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना तसे कार्योदेश देण्यात आले आहेत.

दि. १८/०५/२००६ चे पत्रान्वये श्री शेगावकर व दि. ०३/०६/२००६ चे पत्रान्वये श्री व्ही.व्ही. सपार यांनी खालील कारनामुळे प्रती चित्रास त्यांनी ५०,०००/- ऐवजी १ लाख रुपये मिळावे अशी विनंती केली आहे.

"साईबाबांच्या जिवनावरची चित्रे ऐतीहासिक असल्याने चरित्र वाचून त्यावेळचा काळ, पोशाख तसेच वास्तुंचा अभ्यास करुन चित्रण करणे व त्यावेळची परिस्थिती लक्षात घेउन चित्र काढणे हे संशोधनाचे तसेच श्रमाचे काम आहे. या कामासाठी जिवंत माणसे उभी करुन चित्रण करावे लागते. त्यामुळे या माणसांना येणारा खर्च त्यांचा पहेराव त्यांची वेशभुषा, प्रकाश योजना व त्याकाळातील ऐतीहासीक परिस्थिती निर्माण करणे यावर खूप खर्च येणार आहे. प्रत्येक चित्र सुंदर आणि जिवंत व्हावे करीता श्री.शेगांवकर यांनी प्रत्येक चित्रामागे एक लाख वीस हजार व श्री सपार यांनी प्रत्येक चित्रामागे एक लाख रुपये मिळावे अशी विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होउन, पूर्वीच्या निर्णयाप्रमाणे प्रसंग चित्रांची साईज ८' x ५' ठरली होंती. परंतु भिंतीवर लावण्याच्या दृष्टीने ही साईज फारच मोठी वाटत असल्याचे श्री.सपर व श्री.शेगावकर यांनी समक्ष चर्चेत सांगितले. प्रसंग चित्र तयार करणेसाठी खर्च मोठ्या प्रमाणावर येत आहे. तसेच आमचे कलाकौशल्याचे मानधन त्यामुळे आम्हास योग्य प्रमाणात मिळत नाही ते वाढवून मिळावे अशी विनंती केली. याबाबत समक्ष चर्चा होऊन,रुपये ९० हजार प्रती प्रसंग चित्रास देण्यात यावे व प्रसंग चित्रांची साईज ६' x ४' अशी करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३५. श्री साईबाबा मंदिर परिसरात कास्ट आयर्न गेट बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.४१०.** समाधी मंदिर परिसरातील चार महाव्दारांना कास्ट आयर्न गेट बसविणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१ एप्रिल,२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १९५ अन्वये रक्कम रुपये ४.६० लाख मात्रचे अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. दरम्यानचे काळात, पोलिस विभागाने मंदिर परिसरात चार महाव्दारांसहित, मंदिर परिसरात करण्यात आलेल्या कंपाऊंड वॉलसाठी आपत्कालीन प्रवेशव्दार, मंदिराचे दक्षिण बाजूकडील दोन प्रवेशव्दारांना सुरक्षेच्या दृष्टीने कास्ट आयर्न गेट बसवून घ्यावेत, अशा वेळोवेळी सुचना केलेल्या आहेत. त्यादृष्टीने संस्थान परिसराचे आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांच्या प्रतिनिधी सौ.सोनिया काप्रे यांनी संस्थान परिसरात वर नमूद केलेल्या ठिकाणी कास्ट आयर्न गेट बसविणेबाबतचे कामाचे अंदाजित खर्च पूर्णांकित रक्कम रुपये १७.८५ लाखाचे अंदाजपत्रक सादर केले. त्यानुसार कास्ट आयर्न गेट बसविणेबाबत कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला.

यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर व मंदिर परिसराच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपरोक्त ठिकाणी तातडीने कास्ट आयर्न गेट बसविणे अत्यावश्यक आहे. यासाठी कास्ट आयर्न गेट बसविणेचे कामाची सर्वसमावेशक निविदा तयार करुन, विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा

त्वरीत मागविणेत याव्यात. या कामी प्राप्त होणाऱ्या सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात याव्यात. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६.** **समाधी मंदिरातील चांदीच्या पादूकांवर सोन्याचा पादुकांचा कव्हर बसविणे बाबत**

**निर्णय क्र.४११.** व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.५.२००६ चे सभेतील निर्णय क्र.३२५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय पारित झालेला आहे.

" समाधी मंदीरातील चांदीच्या पादुकांवर सोन्याच्या पत्र्याची पाऊले बसविणेबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक १.४.२००६ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्र.२४७ अन्वये श्री डी.विजय कुमार, हैद्राबाद यांचेकडून सध्या बसविलेल्या चांदीच्या पादूका तशाच ठेवून फक्त चांदीच्या पाऊलांवर सोन्याच्या पत्र्याची पाऊले तयार करुन देणगी दाखल बसवून घेण्यात यावे असा निर्णय पारित झालेला आहे. तथापि, श्री.डी.विजयकुमार यांनी संपूर्ण सोन्याच्या पादुका बसवुन दिल्यास स्वीकारण्यात याव्यात असे ठरलें."

त्यानुसार सध्याच्या चांदीच्या पादूका बनविणारे टकले सराफ, नाशिक यांचेकडून सोन्याच्या पत्र्याचे आकारमान बाबत चर्चा केलेली असून याकामी २२.५ कॅरेटचे ३ किलो ५०० ग्रॅम सोने लागेल. याकामी लागणारे सोने व मजूरी खर्च श्री.डी.विजयकुमार,हैद्राबाद हे स्वत: करण्यात तयार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३७.** **शिर्डी येथील बसस्थानक विकसित करणेबाबत.**

**निर्णय क्र.४१२** **(अ)** श्री क्षेत्र शिर्डी येथे महान संत श्री साईबाबांचे दर्शन घेणेसाठी देश-विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. या साईभक्तांना विविध सेवा-सुविधा विश्वस्तव्यवस्थे मार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. साईभक्तांचा श्री क्षेत्र शिर्डीचा प्रवास सुखकर व्हावा यादृष्टीने वेळोवेळी विश्वस्तव्यवस्थेमार्फत व राज्य परिवहन महामंडळमार्फत विविध उपाययोजना करण्यात येत असतात. याचा एक भाग म्हणून, श्री क्षेत्र शिर्डी येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे अद्यायवत सेवा-सुविधायुक्त असे बसस्थानक असणे गरजेचे असल्याने आहे. याच अनुंषगाने, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे विविध पत्रान्वये प्रस्तावित केलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०१ एप्रिल, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक २३० अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे :

बसस्थानकाचा बांधकाम आराखडा तपशीलवार अंदाजपत्रकास संस्थान आर्किटेक्ट यांचेकडून तयार करुन घेऊन, साईभक्तांच्या सेवा-सुविधांसाठी बसस्थानकाचे बांधकाम संस्थानमार्फत करण्यात यावे. याकामी विहित पध्दतीने महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयांस अनुसरुन, इकडील पत्र जा.क्र. बांधकाम/७०५४/२००६, दिनांक ३० मे, २००६ रोजी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे शिर्डी येथे सर्व सेवा-सुविधेनेयुक्त असे बसस्थानक संस्थान खर्चाने बांधणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदरील प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

त्याचप्रमाणे मा.उपाध्यक्ष तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांना इकडील पत्र जा.क्र. बांधकाम/६४६७/२००६ दिनांक १९ मे,२००६ नुसार, उपरोक्त निर्णयानुसार संस्थान आर्किटेक्ट यांचेकडून शिर्डी येथील बसस्थानकाचा बांधकाम आराखडा तपशीलवार अंदाजपत्रकासह तयार करुन घेणेबाबत संमती देणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

**(ब)** दरम्यानचे कालावधीत, मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थान आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेकडून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई यांचे पत्र जा.क्र. राप/उपा.व व्य.सं./स्थाअ/२०२५, दिनांक १२ मे,२००६ रोजीचे पत्रासोबत पाठविलेल्या बांधकाम तपशीलांचा व बाबींचा विचार करुन शिर्डी येथील नियोजित सुसज्ज बसस्थानकाचा आराखडा व ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आलेले आहे. त्याचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | बसस्थानक १४६०चौमी X रुपये ७५००/- प्रति चौमी | १,०९,५०,०००/- |
| ०२ | संस्थान करीता धर्मशाळा-तथा-भक्तांकरीता विश्रातीकक्ष<br>पहिला मजला : ६७५ चौमी<br>दुसरा मजला : ६७५ चौमी<br>एकुण : १३५० चौमी X रुपये ६०००/- प्रति चौमी | ८१,००,०००/- |
| ०३ | वाहनचालक व वाहक यांचेकरीता विश्रांती कक्ष<br>६७५ चौमी X रुपये ६०००/- प्रति चौमी | ४०,५०,०००/- |
| ०४ | पाणपोई (प्रवाशांकरीता पिण्याचे पाण्याची व्यवस्था ) | १,००,०००/- |
| ०५ | बसस्थानक परिसर कठिणीकरण व डांबरीकरण | ४२,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | ७०००चौमी X रुपये ६००/- चौमी | |
| ०६ | बसस्थानक परिसर संरक्षक भिंत<br>१२२५ चौमी X रुपये ७००/- प्रति रनिंग मीटर | ८,५७,५००/- |
| ०७ | प्रवेशव्दाराजवळ एच.पी.कल्व्हर्ट ९००एमएम व्यासाचे पाईप | १,००,०००/- |
| ०८ | भूमिगत जलकुंभ व सांडपाणी व्यवस्था | ४,५०,०००/- |
| ०९ | विकसन शुल्क | ३,००,०००/- |
| १० | विद्युतजनित्र व विद्युतीकरण | १५,५०,०००/- |
| ११ | बाग-बगीचा व पार्किंग व्यवस्था | २,००,०००/- |
| १२ | सध्याचे बसस्थानक पाडणे | २,५०,०००/- |
| १३ | वास्तुरचनाकार यांचे शुल्क (२ टक्क्याप्रमाणे ) | ६,२२,१५०/- |
| | **प्रकल्पाची एकुण अंदाजित रक्कम रुपये** | **३,१७,२९,६५०/-** |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी येथील नियोजित सुसज्ज बसस्थानकाचा बांधकाम आराखडा व बांधकामासाठी येणाऱ्या खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक मान्यतेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केले.

**(क)** उपरोक्त प्रमाणे, नियोजित बसस्थानकाचा आराखडा व ढोबळ अंदाजपत्रकाचे सादरीकरणासाठी काबरे चौधरी आर्किटेक्ट, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री. काबरे यांनी समक्ष हजर होते. त्यांनी नियोजित बसस्थानकाच्या बांधकाम आराखडयाविषयी व बांधकाम अंदाजपत्रकाविषयी सभेस माहिती दिली.

यावर साधकबाधक चर्चा होऊन, काबरे चौधरी आर्किटेक्ट, नाशिक यांनी सादर केलेला बांधकाम आराखडा व त्यासाठी येणारे अंदाजित बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक रुपये ३,१७,२९,६५०/- मात्रचे स्वीकारणेत यावे. सदरील बांधकाम आराखडा, बांधकाम खर्चाच्या ढोबळ अंदाजपत्रकासह मान्यतेसाठी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे पुर्वी पाठविलेल्या प्रस्तावास पुरक म्हणून पाठविण्यात येऊन लवकरात लवकर मंजुरी मिळणेसाठी पाठपुरावा करण्यांत यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३८. मोबाईल सर्व्हीसेस प्रात्यक्षिक सादर करणे बाबत.**

**निर्णय क्र.४१३** श्री साईभक्तांना मोबाईल सर्व्हीसेस उपलब्ध करुन देणेबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१एप्रिल२००६ चे सभेतील निर्णय क्र.२१६ अन्वये ठरलेप्रमाणे याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

आजचे सभेत ब्लो युवर माईन्ड प्रॉडक्शन, नाशिक हे उपस्थित होते त्यांनी मोबाईल सर्व्हीसेस (वायरलेस ॲप्लीकेशन) वर संस्थान व श्रीसाईबाबांविषयीची माहिती प्रसारित करण्याबाबतचे प्रात्यक्षिक देण्यात आले. प्रात्यक्षिकामध्ये व्हीडीओ/ऑडिओ रिंगटोन, व्हीडीओ क्लीप्स् श्री साईभक्तांना मार्गदर्शनपर एसएमएस संदेश,ऑन लाईन साईपुजा इत्यादी प्रकारचे प्रात्यक्षिके व सविस्तर माहिती चित्रफितीव्दारे सभेसमोर सादर केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याबाबत जाहिरातीव्दारे मागविण्यात आलेल्या सर्व निविदा व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे उघडून निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३९. मंदिर व मंदिर परिसर सुरक्षिततेकरीता अत्याधुनिक सिक्युरिटी सिस्टिम कार्यरत करणे बाबत.**

**निर्णय क्र.४१४.** श्री साई समाधी मंदिर व परिसराचे सुरक्षिततेबाबत ताहिरन इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम या इस्त्रायल कंपनीचे प्रतिनिधींनी मंदिर व परिसराची सुरक्षिततेच्या दृष्टीने पाहणी करुन प्रोजेक्ट रिपोर्ट सादर केला आहे.

०१. कंपनीने जे सॉप्टवेअर विकसीत केले आहे ते अत्याधुनिक व एकमेव सिक्युरीटी सॉप्टवेअर आहे.

०२. संपूर्ण सुरक्षा व्यवस्था एकसंघ झाल्यामुळे एका सुरक्षा सेंटर (कमान अँड कन्ट्रोल) मधून संस्थानची सुरक्षा यंत्रणेवर देखरेख ठेवता येईल. त्यामुळे एखादी घटना घडली असता तात्काळ पोहचून कार्यवाही करता येईल.

०३. आपल्याकडे असणा-या कर्मचारी वर्गाचा योग्य रित्या व परिणामकारक वापर करता येईल.

०४. एखादी अनियमीत घटना घडत असेल तर ती यंत्रणा या घटनेची माहिती अलार्म देवून सुरक्षा पथकाला देईल

०५. मानवी चूका कमीतकमी करुन ही यंत्रणा सुरक्षा व्यवस्था व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करते.

०६. कंपनी या यंत्रणेबरोबर खालील उपकरणे पुरविते.

अ) गेट स्कॅनर:- हे गेट सर्व प्रकारचे एक्सप्लोझिव्ह शोधून काढते. तसेच शरीरावर लपविण्यात आलेले कोणतेही हत्यार,आरडीएक्स डिटेक्ट करते. या गेटमुळे प्रत्येक माणसाला थांबून तपासण्याची गरज नाही. गेटमधून चालत गेले तरी तपासणी होते.

ब) पॅनिक बटन (वायरलेस,कॅमेरा,सेन्सस):- पॅनिक बटन कोणताही कर्मचारी खिशात घेवून फिरु शकतो. हे बटन दाबताच परिसरात लावलेल्या कॅमेरा जिथे तो माणूस आहे त्या ठिकाणी लक्ष केन्द्रीत

करतो व तो परिसर मध्यवर्ती सुरक्षा यंत्रणेवर दिसू लागतो. त्यामुळे त्या ठिकाणी किती मदत पाठवावी व कुठे पाठवावी याचा निर्णय घेता येतो.
क) मोबाईल सुरक्षा व्यवस्था उपकरणे :- या उपकरणामुळे जिथे घटना घडली आहे त्या घटनेची माहिती संपूर्ण छायाचित्रासह मोबाईल सुरक्षा युनिटला मिळू शकते. त्यामुळे घटनेच्या ठिकाणी परिणाम कारक रित्या काय निर्णय घ्यावा याची कल्पना अगोदरच आल्यामुळे चांगल्या पध्दतीने निर्णय घेता येतो.

ताहिरन इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम यांचे प्रतिनिधी श्री वाघमारे हे आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी चित्रफितीव्दारे सविस्तर माहिती सभेस करुन दिली.यावेळेस पत्रकार तसेच पोलिस खात्याचे अधिकारी उपस्थित होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर यंत्रणा संस्थानसाठी अत्यंत उपयुक्त आहे असे सर्वांचे मत पडले व संस्थानसाठी खरेदीस तत्वत: मान्यता देण्यात आली.सदरहू प्रोजेक्ट बाबत मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शन,अभिप्राय घेवून ताहिरन इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम बाबत संबंधित कंपनीकडून सविस्तर प्रकल्प अहवाल घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवावा असे ठरले. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४०.** **श्री साईबाबा मंदिर परीसरात नूतनीकरण प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असो., प्रा.लि., नवी दिल्ली यांनी सादर केलेल्या दि.१०/०५/२००६ चे प्रस्तावाबाबत..**

**निर्णय क्र.४१५.** श्रीसाईबाबा मंदिर परीसर नूतनीकरण प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असो प्रा.लि.नवी दिल्ली यांचेकडील संचालीका तथा आर्किटेक्ट श्रीमती सोनीया कापरे यांनी दि. १०/०५/२००६ चे पत्राव्दारे श्री साईबाबा मंदिर परीसरात एकवटणाऱ्या गर्दीसाठी नियोजन व उपाययोजना करणेविषयी प्रस्ताव सादर केलेला आहे. श्री साईबाबा मंदिर परिसर नूतनीकरण प्रकल्पासाठी व त्यानंतर करण्यात आलेल्या फेरबदलांसाठी त्यांनी वेळोवेळी शिर्डी येथे भेट दिली. त्या संदर्भाने त्यांनी उपरोक्त प्रस्ताव दिलेला असून त्यातील ठळक तपशिल खालीलप्रमाणे आहे.
**अ)** यापुर्वी करण्यात आलेल्या बहुतांश फेरबदलांचा उद्देश खालीलप्रमाणे होता.
०१.दर्शन रांग व्यवस्था सुनियोजीत करणे.
०२. एका दिवसात प्रत्यक्ष दर्शन घेउ शकणाऱ्या भक्तांच्या संख्येत वाढ करणे. (प्रती दिवशी प्रत्यक्ष दर्शनासाठी क्षमतेमध्ये वाढ करणे )
०३.भक्तांसाठी दर्शनप्रक्रीया ही सुलभ व आरामदायक व्हावी यासाठी योग्य त्या सुविधा निर्माण करणे.
**ब)** गेल्या काही वर्षात जे काही फेरबदल सूचविण्यात आले अथवा करण्यायोग्य वाटले ते फेरबदल परिस्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न म्हणून करण्यात आले. तथापी मंदिर परिसराचे हद्दीत प्रत्यक्षरित्या सामावू शकणाऱ्या भक्तांच्या संख्येला एक ठराविक मर्यादा आहे. त्याचबरोबर एका दिवसात समाधी मंदिरातून दर्शन घेउन बाहेर पडणाऱ्या भक्तांच्या संख्येलाही मर्यादा आहे. उत्सवकाळात तसेच इतर काही ठरावीक दिवशी ही मर्यादा आधी पासूनच गाठण्यात येत आहे.
**क)** समाधी मंदिरात एका संपूर्ण दिवसात दर्शन घेउ शकणाऱ्या भक्तांची संख्या त्यांनी खालील आकडेमोडीच्या आधारे काढली आहे.
१. कालावधी : पहाटे ०५:३० ते रात्री १०:३० प्रती दिवस यामधून प्रत्येकी ३० मिनिटांच्या चार आरत्या, की ज्यावेळी दर्शन बंद असते.
२. दर्शन रांगा : सहा रांगा (तिन रांगा पुरुषांसाठी, तिन रांगा महीलांसाठी )
३. एकूण तास : १७ तास वजा २ तास = १५ तास
४. दर्शनासाठी लागणारा वेळ : ३ सेकंद (प्रत्यक्षात जास्त लागतो ) प्रती भक्त
५. एका दिवसात दर्शन घेउ शकणाऱ्या भक्तांची
एकूण संख्या : (१५ X ६० X ६०)/ ३ X ६=१,०८,००० भक्त

म्हणजेच एका दिवसात सुमारे एक लक्ष साईभक्त प्रत्यक्ष समाधीचे दर्शन घेऊ शकतात. यामध्ये काही त्रुटी जरी असली तरी एका दिवसात एका मर्यादीत संख्येपलीकडे साईभक्त समाधी मंदिरात दर्शन घेऊ शकणार नाहीत.
**ड)** शिर्डी येथे येणारे साईभक्त हे श्री साईबाबांचे समाधीचे दर्शन घेणे या एकमेव उद्देशानेच येतात. गर्दीच्या वेळी मंदिर परिसरातील दर्शनरांगेत न मावणारे भक्त परिसराबाहेर गावात नागमोडी रांगा करतात. या दिवसेंदिवस वाढणाऱ्या गर्दीमुळे निर्माण झालेली परिस्थिती सुसहय करणेबाबत विचार केला असता, ज्या भक्तांना त्या दिवशी दर्शन मिळण्याची शक्यता नाही, त्यांनी मंदिर परिसरात गर्दी करणे उचित नाही.
**इ)** यावर एक स्वाभाविक उपाय म्हणजे मंदिर परिसरालगत असलेली जागा संस्थानने संपादीत करावी. परंतू प्रत्यक्षात ते सहजासहजी शक्य होईल असे दिसून येत नाही. तसेच त्यामुळे फक्त मंदिर परिसरात सामावू शकणाऱ्या भक्तांची संख्या वाढेल. समाधी मंदिरातून दर्शन घेउन बाहेर पडणाऱ्या भक्तांची

संख्या वाढविण्यासाठी त्याची मदत होणार नाही. संस्थानने मंदिरापासून काही अंतरावर जमीनी संपादीत केलेल्या आहेत. त्याठिकाणी साईभक्तांसाठी एक दुसरे आकर्षण केंद्र निर्माण केल्यास मंदिर परिसरातील गर्दी विभागली जाईल.

**ई)** याबाबत सखोल विचार व संशोधन केल्यानंतर मी खालील निष्कर्ताप्रत पोचले आहे.

०१. सामान्य साईभक्तांना श्री साईबाबांचे जीवनचरीत्राविषयी माहिती नसते. शिर्डी येथे आल्यानंतर दर्शनाव्यतिरिक्त त्यांना त्यांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री साईबाबांविषयी माहिती व तपशिल जाणून घेण्याची उत्सुकता असते. मंदिराजवळील सध्याचे म्युझियम काही प्रमाणात त्यांची गरज भागविते तथापी जागेअभावी सदर म्युझियमचे विस्तारीकरण शक्य नाही. अशाप्रकारे श्री साईबाबा यांचे जीवनचरीत्रा विषयीची माहिती सामान्य साईभक्तांना सहजगत्या उपलब्ध होत नाही.

०२. त्यासाठी आमचा असा प्रस्ताव आहे की, एक पर्यायी जागा Landscaped Park Complex म्हणून १५ ते २५ एकर क्षेत्रावर विकसीत करण्यात यावी. सदर ठिकाणाहून मंदिरापर्यंत शटल बस सेवा ठेवावी. याप्रमाणे निर्मित मालमत्तेचे कार्य Shri Saibaba Garden Complex म्हणून चालविण्यात यावे. या पार्कचे मुख्य आकर्षण हे एक स्वयंपूर्ण व समर्पित स्वरुपातील Saibaba Musium & Information Centre असेल . येथे निरनिराळ्या ग्रंथांमध्ये विषद केलेले श्री साईबाबांचे जीवनातील प्रसंग प्रदर्शनाचे स्वरुपातून जिवंत होतील. त्यास ध्वनीमुद्रीत निवेदनाची जोड देता येईल.

०३. या पार्कमधिल दुसरे मोठे आकर्षण म्हणून श्री साईबाबांची भव्य प्रतिमा (haulographic image) करण्यात यावी. या प्रतिमेमुळे सायंकाळी मोठी गर्दी याठिकाणी आकर्षित होईल. म्युझियममधिल प्रदर्शनासाठी आधुनिक तंत्र, लाईटींग टेक्नॉलॉजी व संगणकीय चित्रांचा वापर करता येईल त्यामुळे म्युझियम आकर्षक व आधुनिक होईल. या पार्कमध्ये खुले सभागृह (amphitheatre) साईभक्तांचे सहभागातून आकारण्यात आलेली शिल्पे, मेडीटेशन गार्डन, म्युझीक गार्डन या सुविधा करता येतील . म्युझिक गार्डनमध्ये बसून भक्त भजन ऐकू शकतील.

उपरोक्त प्रस्तावाचे मा. व्यवस्थापन समितीपुढे सादरीकरण करणेस अनुमती मिळणेबाबत श्रीमती काप्रे यांनी विनंती केली होती.

आजचे सभेपुढे सदर प्रस्तावाचे सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. आर्किटेक्ट श्रीमती सोनिया काप्रे यांनी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवी दिल्ली यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे Landscape Park, Saibaba Musium, Information Centre, प्रसंग-प्रदर्शन व त्यास ध्वनीमुद्रीत निवेदनाची जोड तसेच श्रीसाईबाबांची भव्य प्रतिमा (Haulographic Image) आधुनिक तंत्रज्ञानासह, खुले नाट्यगृह, विविध शिल्पे, मेडिटेशन गार्डन, म्युझिक गार्डन इ.बाबींचा सर्व समावेशक असा आराखडा व खर्चाचा तपशील मे.माथुर ॲण्ड काप्रे आर्किटेक्टस्, नवी दिल्ली यांचेकडून तयार करुन घेणेस व यासाठी जागा निश्चित करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच मंदीर परिसरातील सोयी-सुविधांची पुनर्रचना करणे व त्यासाठी मंदीर परिसरसरातील फार आवश्यक नसलेल्या सुविधा, स्टॉल इतरत्र स्थलांतरीत करावेत, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

वरील निर्णय क्र.३२७ ते ४१५ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )